
म. ग्रं. सं. ठाणे.
विषय निबंध
सं. क्र. 3742



REFBK-0024915

मध्य. जिल्हा
3752

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना:—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, केल्यास घटना नियम क्र. ५[८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा भरावी लागेल.

1 MAY 1986
1 JUN 1986
3 AUG 1986
7 AUG 1986
4 SEP 1986
17 SEP 1986
9 OCT 1986
30 JUL 1987
30 AUG 1987
2 SEP 1987
13 SEP 1987
25 OCT 1987
22 NOV 1987
23 OCT 1988
8 JUN 1988




REFBK-0024915

कों ड ले ली म ने

डॉ. मेधा कुमठेकर

चंद्रकला प्रकाशन : क्रमांक सतरा

प्रकाशिका
सौ. शशिकला उपाध्ये
चंद्रकला प्रकाशन
१३८, कसबा पेठ,
पुणे ४११ ०११

© डॉ. मेधा कुमठेकर

प्रथमावृत्ती
फेब्रुवारी १९८६

मुद्रक
सुनील अनंत चिंचणीकर
माधुरी प्रिंटरी
४४३, शिवाजीनगर,
पुणे ४११ ००५

मुखपृष्ठ
सुरेश नावडकर

मुखपृष्ठछपाई
रविराज प्रिंटरी


मूल्य : तीस रुपये

मार्गदर्शनाच्या कामात
सुरुवातीपासून उत्साहाने सहाय्य
करणाऱ्या आदरणीय
डॉ. आनंद मोखले यांस

कोन्सेलरच्या खुर्चीतून...

हया पुस्तकाचे स्वरूप हे नेहमीच्या पुस्तकांपेक्षा फारच वेगळे आहे. अनेक नाटकसिनेमांच्या सुरुवातीला सूचना दिलेली असते की हया कलाकृतीतील पात्रे ही काल्पनिक आहेत. कुणालाही उद्देशून पात्रयोजना केलेली नाही. मी मात्र या हया ठिकाणी बरोबर विरुद्ध म्हणू इच्छिते की, हया पुस्तकातील सर्व पात्रे मी प्रत्यक्षात पाहिलेली आहेत. प्रत्येक लेख एखादे विशिष्ट कुटुंब डोळयांसमोर ठेवूनच लिहिलेला आहे. मात्र मुख्य गाभा त्या कुटुंबातील घेऊन इतर काही गोष्टी तत्सम कुटुंबांमधून घेऊनही त्यात मिसळल्या आहेत.

मार्गदर्शनातील माझे अनुभव पुस्तकरूपाने समोर आणताना, प्रामुख्यानें हेतू हा की समाजातील विविध समस्या समाजासमोर मांडण्याचा आहे ! 'सामाजिक समस्या' या नावाखाली ज्या समस्यांचा सर्वसाधारणपणे सामाजिक पातळीवर विचार केला जातो, चर्चा केल्या जातात, चळवळी केल्या जातात त्या फारच गंभीर, तीव्र स्वरूपाच्या समस्या असतात. परंतु हया ठिकाणी मी मांडलेल्या समस्या हया त्या मानाने फारच सौम्य वाटतील. नव्हे, सर्वसाधारण लोकांना तसे वाटतेच, व 'घरोघरी गॅसच्या शेगडया' हया नावाखाली त्या दुर्लक्षिल्याही जातात. त्यासाठी मानसशास्त्रज्ञांची मदत घ्यावी, तशी मदत मिळू शकते, समस्या सोडवता येईल, किमान तिने रुद्र स्वरूप तरी धारण करू नये, यासाठी प्रयत्न करता येईल ही कल्पनाच आपल्या समाजात अजूनपर्यंत रुजली नाही आणि म्हणूनच मुले अभ्यास करत नाहीत, वयात येणारी मुले व मुली काही समस्या निर्माण करतात, गर्भपाताचा कायदा मंजूर



झाल्यानंतर उघडकीस आलेल्या काही मानसिक समस्या, पालकांच्या विशिष्ट स्वरूपाच्या वागण्यातून निर्माण होणाऱ्या, विवाहेच्छु तरुण-तरुणींच्या गैरसमजातून, पारंपारिक परावलंबनातून निर्माण होणाऱ्या समस्या, प्रौढावस्थेकडे झुकू लागणाऱ्या स्त्रियांच्या समस्यांचे कसे वेगवेगळ्या प्रकारे प्रकटीकरण होऊ शकते, तसेच वृद्धावस्थेतही काही समस्या कशा निर्माण होऊ शकतात, ह्या सर्वांची ओळख ह्या पुस्तकात दिलेली आहे. काही ठिकाणी मी मार्गदर्शन कसे केले ते सांगितले आहे, काही ठिकाणी केवळ माझ्या मार्गदर्शनाची दिशा दिलेली आहे, तर काही ठिकाणी मार्गदर्शन करणे कसे कठीण होते व मीच कशी संभ्रमित झाले तेही सांगितले आहे.

१९८१ साली Broken Homes वरील Ph. D. चा प्रबंध पुणे विद्यापीठात सादर केल्यानंतर ह्या कामाला मी हळूहळू प्रारंभ केला. किंबहुना माझे प्रबंधाचे काम चालू असतानाच मी अशा प्रकारचे काम करावे असे सुचवले, आग्रह धरला व त्यासाठी सर्व प्रकारे स्वत: मदत केली ती डॉ० आनंद गोखले ह्यांनी ! त्यांच्या व डॉ० अनंत साठे ह्यांच्या सक्रिय प्रोत्साहनानेच मी ह्या कामात विशेष रस घेतला. ह्या पुस्तकात दिलेल्या केसेस्च्या जवळपास दुप्पट केसेस् माझ्या आत्तापर्यंत हाताळून झाल्या आहेत. त्यापैकी हाताच्या बोटावर मोजण्याइतक्याच केसेस्च्या बाबतीत संपूर्ण यश येऊ शकले हे येथे प्रांजळपणे कबूल करायलाच हवे. त्याला महत्त्वाचे कारण म्हणजे केवळ मार्ग दाखवण्याचे काम मी करते, त्या मार्गावरून जाण्याचे व स्वत:ची समस्या स्वत:च सोडविण्याचे काम

ज्या त्या व्यक्तीलाच करावे लागते. काही वेळा त्यात
व्यावहारिक, भौतिक अडचणी येतात, तर बरेच वेळा दृढमूल झालेल्या
अभिवृत्ती, कल्पना बदलणे व्यक्तीला शक्य होत नाही. 'कळते
पण वळत नाही' अशी स्थिती होते. परंतु हे पुस्तक वाचणाऱ्यांना
जर असे पटले की, ज्याप्रमाणे ताप जास्त चढण्यापूर्वी, छाती
कफाने भरण्यापूर्वी थोडासा सर्दी-खोकला झाल्यावर जर आपण
डॉक्टरांकडे गेलो तर औषधेही जास्त घ्यावी लागणार नाहीत व बरेही
लवकर वाटेल. तसेच मानसिक समस्यांच्या बाबतीत
शक्यतो लवकर उपाय करणेच इष्ट ठरेल, तर ह्या पुस्तकाने महत्त्वाचे
काम केले असे म्हणता येईल.

माझ्या या मार्गदर्शनातील अनुभवांची विविधता, खोली जाणवून
सौ० मधुराणी भागवत यांनी त्याचे लेखांकन करण्याचा
आग्रह धरला व सौ० शशिकला उपाध्ये ह्यांनी त्याच्या प्रकाशनाचे काम
हौसेने अंगावर घेतले किंबहुना असे प्रयोगस्वरूप पुस्तक छापण्याचे
त्यांनी धारिष्टच दाखवले आहे.


घर उल्लेख केलेल्या चारही व्यक्तींबद्दल, माझ्या कुटुंबियाबद्दल,
हितचिंतकांबद्दल मनःपूर्वक कृतज्ञता व्यक्त केल्याशिवाय माझे हे मनोगत
थांबवणे मला इष्ट वाटत नाही.

—डॉ. मेधा कुमठेकर

सलील सोसायटी,
२१, चिंतामणीनगर
पुणे ४११ ००९

अनुक्रम

- मुलं अभ्यासच करत नाहीत !
- वाढाळू वय
- स्वप्नाळू वय !
- यौवन !
- हे तर बालविवाहच !
- लैंगिक समस्या....
- घर सोडणाऱ्या स्त्रिया !
- लोक काय म्हणतील ?
- घटस्फोट ? की....
- चाळिशी ओलांडताना
- पश्चिम क्षितिजावर...
- वैवाहिक मार्गदर्शन



मुलं अभ्यास च करत नाहीत!

दीपक

पहिलीत शिकणारा दीपक-त्याला सगळा अभ्यास पाठ येत असून, परीक्षेच्या वर्गात गेल्यावर स्वस्थ बसून राहतो. एक अक्षरही लिहीत नाही, आई-वडिलांनी कितीही मारले, धाक दाखविला, किंवा ते गोडीत बोलले. चॉकलेट-कॅडबरीची लालूच दाखविली, बाहेर उभे राहून खाणाखुणा केल्या, परीक्षा देता-देता खायला-प्यायला दिले तरी कशा-कशाला तो बघत नाही. इकडे-तिकडे बघत राहतो. टिवल्या-बावल्या करतो. पण एक अक्षरही लिहीत नाही. पेपर कोराच देतो. त्याच्या आईला तर वाटते की आपल्या हुचा एकुलत्या एका मुलाने इजिनिअर व्हावे. त्यासाठी बारावीच्या परीक्षेत त्याला नव्वद टक्के गुण मिळाले पाहिजेत. म्हणजे पहिलीपासूनच त्याची तयारी पक्की नको का करायला? शिक्षणाच्या सुरवातीपासूनच अभ्यास पक्का व्हायला हवा. म्हणजे आता सर्वच परीक्षात त्याला उत्तम गुण मिळावयास हवेत. सकाळची शाळा संपल्यावर बाराला आजी त्याला घेऊन येते आल्यावर तो आजीला जुमानत नाही, अभ्यास करत नाही व संध्याकाळी आई-बाबा येईपर्यंत खेळतच राहतो, म्हणून दुपारी दोन तास शिकवणी. संध्याकाळी व्यायामशाळा, रात्री आठला घरी आल्यावर त्याला खूप

भूक लागलेली असते, परंतु लगेच जेंवायला वाढले तर तो लवकर झोपतो, रात्री काहीच अभ्यास करीत नाही म्हणून व्यायामशाळेतून आल्यावर अधा१ तास अभ्यास केल्याशिवाय जेवण नाही–असा आईचा दंडक आहे. अशा हया दीपकबद्दल आईची आणखी एक प्रेमळ तक्रार म्हणजे, इतके मी चांगले-चांगले पदार्थ करते तरी हा खात-पीत नाही व अगदी बारीक, अशक्त, तिडतिडया, वळवळया झाला आहे. अत्यंत चंचल, अस्थिर आहे.

'त्याच्या या समस्यात्मक वर्तनाला तुम्ही प्रामुख्याने कारणीभूत आहात.' हे कटु सत्य त्यांना हळूहळू सांगणे आवश्यक होते. त्यासाठी सुरुवातीला त्यांना फक्त एवढाच सल्ला दिला की, 'तुम्ही त्याचा अभ्यास अजिबात घेऊ नका. अभ्यासाची ती वेळ चुकीची आहे. त्याच्या प्रत्येक वागण्याचा संबंध अभ्यासाशी जोडू नका. त्याला भूक लागेल तेव्हा लगेच त्याला खायला द्या. शिवाय अभ्यासाच्या धाकाने मानसिक ताण निर्माण करू नका व महत्त्वाची गोष्ट म्हणजे तुम्ही त्याला इंजिनिअर बनवायचे ठरवून, तो इंजिनिअर होणार नाही. उलट दहावीपर्यंत त्याच्या विविध क्षमतांचे निरीक्षण करणे आवश्यक आहे. त्यासाठी त्याला मोकळेपणाने वाढू-वागू दिले पाहिजे. त्याच्या क्षमता, अभिवृत्ती, आवडी-निवडी हया सर्व गोष्टी ध्यानात घेऊन मग दहावीनंतर त्याने कोणत्या स्वरूपाचा अभ्यासक्रम घ्यावा हे ठरवायचे आहे. (तेसुद्धा तुम्ही नाही. त्याला निवड करायला संधी द्या. परंतु हे तत्त्व हया अवस्थेत हया पालकांना पचले नसते.) शिवाय एक महत्त्वाची गोष्ट लक्षात ठेवा की तो इंजिनिअर झाला म्हणजेच सगळे यश, प्रतिष्ठा, मानमरातब, पैसा मिळवेल असे नाही. असे क्षेत्र त्याला निवडू द्या की ज्या क्षेत्रात यशस्वी होईल. त्या यशामुळे त्याला हया सर्व गोष्टी (मानमरातब, प्रतिष्ठा इत्यादी) मिळणार आहेत. तेव्हा क्षेत्र कोणतेही निवडले तरी हरकत नाही. त्याची प्रतिष्ठा क्षेत्रावर अवलंबून नसून त्याच्या यशस्वितेवर अवलंबून आहे.'

सु जा ता

सातवीत शिकणारी सुजाता. अत्यंत समंजस, शहाणी, लाघवी, खेळ-

कर, हसतमुख मुलगी ! मात्र वर्गात काय किंवा घरी काय अभ्यासाची वेळ आली की, एकदम नर्व्हस होते किंवा चिंताग्रस्त होते. तिचा अभ्यास हा तिला व तिच्या आईला दोघींनाही एक मोठा यक्षप्रश्न असतो. पर्यायाने तिचे वडील, बहीण सर्वांनाच मनस्ताप, भावनिक ताण, विवंचना हयाच अनुभवातून जावे लागते. दरवर्षी ती वरच्या वर्गात जाईलच असेही नाही.

अभ्यासांती असे आढळले की, ती मतिमंद तर निश्चितच नाही. उलट तिची बुद्धिमत्ता सर्वसामान्यांपेक्षा काहीशी अधिकच आहे. मात्र तिची आई हुशार असूनही महाविद्यालयीन जीवनात अयशस्वी झालेली होती, तिला सतत असे वाटे की, आपण मातृत्वाच्या भूमिकेत तरी अपयशी होऊ नये व म्हणून आपल्या पहिल्या अपत्त्याच्या बाबतीत-सुजाताच्या बाबतीत-ती प्रथमपासूनच विशेष जागरूक राहिली. तिचे वागणे, बोलणे, खाणे-पिणे, अभ्यास करणे इ. सर्वच बाबतीत बारकाईने लक्ष देऊन तिचे वर्तन शंभर टक्के चांगले येईपर्यंत ती सुजाताला बोलत राही. सुधारायचा प्रयत्न करी. एकीकड 'तुला काही समजत नाही, येत नाही, मला तुझी काळजी आहे.' इ. वाक्यांचा जप चाले. परिणामत: सुजातामधे अतिरिक्त परावलंबनाची, न्यूनत्वाची भावना निर्माण झाली. आत्मविश्वासाचा फारच अभाव निर्माण झाला. व्यक्तिमत्व-विकासातील सदोषतेचा परिणाम तिच्या अभ्यासावर झाला. त्या दृष्टीने विचार करता बालकांचा शालेय अभ्यास हा फारच संवेदनक्षम असतो. अनेक सामाजिक मानसशास्त्रज्ञांना असे आढळले आहे की, अनिष्ट कौटुंबिक वातावरणाचा पहिला विपरीत परिणाम मुलांच्या शालेय अभ्यासावर होतो. उलट-पक्षी, काही सामाजिक घटकांचा विपरीत परिणाम बालकाच्या अभ्यासावर किंवा वर्तनावर होऊ लागलेला असूनही समाधानी, आनंदी कौटुंबिक वातावरणात लवकरच ते लक्षातही येते व योग्य वेळी त्यावर नियंत्रणसुद्धा घातले जाऊ शकते.

हे मं त

तिसरीत शिकणारा हेमंत. जगाच्या दृष्टीने किती भाग्यवान आहे.

आई-वडील तर सुशिक्षित आहेतच, पण आजी-आजोबाही खूप शिकलेले आहेत. शिवाय घरात सुमारे वीस वर्षांनी लहान मूल, तोही मुलगा, म्हणून आजी-आजोबांचा विशेष कौतुकाचा. शिवाय त्याचे बाबा भल्या मोठ्या पगारावर नोकरी करीत आहेत, तर आई कुठेही बाहेर जात नाही. केवळ 'स्त्रीने नोकरी केली की, मुलांचे हाल होतात, मुले बिघडतात.' हचा तिच्या स्वतःच्या व इतरांच्याही ठाम मतामुळे तिने स्वतःच्या शिक्षणाचा व्यावहारिक अर्थाने काहीही उपयोग करायचा नाही असे पक्के ठरविले होते व त्या शिक्षणाचा उपयोग केवळ मुलांवर संस्कार करण्यासाठीच ती करीत असे.

अशा या हेमंतची आई जेव्हा त्याच्या तक्रारी घेऊन आली व 'कसा बाई हचाला सुधारावा ? तुम्हीच सांगा आता काही मार्ग !' असे म्हणाली तेव्हा मी चकितच झाले. सुमारे दोन तास गप्पा मारल्यावर, बारीक चौकशी केल्यावर माझ्या असे लक्षात आले की, लौकिक अर्थाने भाग्यवान असणाऱ्या हेमंतला स्वतःच्याच घरात भावनिक सुरक्षितता मिळत नव्हती. किंबहुना त्याच्या आईचीही घरात भावनिक कुचंबणा होत होती व त्यामुळे तीही त्याला विश्वासाने जवळ घेऊ शकत नव्हती. कौतुक सगळेच करीत होते. कोणत्याही खेळाचे, खाऊचे किंवा कपडचाचे त्याच्या तोंडातून नाव निघायचा अवकाश की, शब्द झेलायला आजी-आजोबा तत्पर होतेच. त्याच्या बाबांनी काही खेळ तर परदेशातून आणले होते. पण हेमंतला हचा कशाचाच मनाप्रमाणे वापर करता येत नव्हता, म्हणून रागावला की तो सगळचा वस्तू फेकून देत असे, मोठचा माणसांच्या अंगावर थुंकत असे, वेडेवाकडे बोलत असे, सहामहिन्याच्या बहिणीवर सगळचांच्या देखत मुक्यांचा वर्षाव करीत असे. परंतु कुणी नसताना मात्र या मुक्यांचे रूपांतर चावण्यात होत असे, तिच्या डोळचात बोट घाली, पोटावर मोठे खेळणे ठेवी. काही वेळा मित्रांशी खेळता खेळता खूप लांब राहणाऱ्या एखाद्या मित्राच्या घरी न सांगताच निघून जात असे. आईला काळजी वाटत राही. खाण्या-पिण्याच्या अत्यंत तक्रारी, शिवाय अंगठा चोखणे, अंथरूण ओले करणे हचा तक्रारी तर होत्याच.

हेमंतावर जरी कौतुकाचा वर्षाव होत होता, तरी सर्व वस्तू कशा वापरायच्या याला एक पद्धत होती. हचा शिस्तीनेच सगळचा गोष्टी व्हायला पाहिजेत असा आजी-आजोबांचा दंडक होता. मातीच्या पायाने सोफ्यावर

चढायचे नाही हा नियम म्हणजे प्रत्येक वेळी तो अंगणात जाऊन आला की, बाथरूममधे जाऊन हात-पाय धुण्याचा आजी आदेश देई. आपली खेळणी बरोबरीच्या मित्रांना दाखवावित, त्यांचे कौतुक, त्यांच्याकडून प्रतिष्ठा मिळवावी, असे त्याला स्वाभाविकपणे वाटे. परंतु आजीची बंदी, कारण इतर मुले खेळणी मोडतील, घरी घेऊन जातील. शिवाय त्यांच्या मळक्या हाता-पायांमुळे आपल्या वस्तू मळतील, स्वच्छ करायचं काम होईल व त्यांचा दंगा, आवाज सहन होणार नाही ते वेगळेच. आईला वाटे की मूलच ते ! ते असे बागणारच थोडेसे तरी त्याला त्याच्या मनाप्रमाणे वागू दिले पाहिजे. पण आजीने सांगितल्याच्याविरुद्ध त्याला करायला शिकवणे योग्य नाही. असेही वाटे व आजी इतके कौतुक करतीये तर सासूबाईंना तरी असे कसे शिकवणार की, तुम्ही त्याला इतक्या कडक शिस्तीत ठेवू नका. शिवाय हेमंतच्या बाबांना काहीही सांगायची तिला सोय नव्हती. एकतर ते त्यांच्या कामात पूर्णपणे बुडून गेले होते. भरपूर पैसा घरी आणून टाकतोय, तुला नोकरी करावी लागत नाही, म्हणजे मी माझं कर्तव्य बजावतोय ही त्यांची पूर्ण खात्री. शिवाय आई-बाबा का वाईट सांगणार आहेत, त्यांनी सांगितल्याप्रमाणेच वागणे हा त्यांचा नियम.

भावनिक असुरक्षिततेच्या भोवऱ्यात गुंतत जाणाऱ्या हेमंताला वेळीच सावरले नाही, तर त्याच्या वर्तनसमस्या तर वाढतीलच पण त्याचे अभ्यासात तरी कसे लक्ष लागणार ? दिवसेंदिवस तो बाहेरच्या जगात प्रेमाचा ओलावा दिसेल तिथे ओढला जाईल, शाळासुद्धा बुडवील ! या प्रेमाचा ओलावा दर्शवणाऱ्या व्यक्ती सद्वर्तनी असल्या तर ठीक, नाहीतर असा हा मुलगा वाममार्गाला लागण्याची शक्यता काही फार दूर नाही.

ही तीन केवळ बानगीदाखल दिलेली उदाहरणे ! परंतु 'मुले अभ्यास करत नाहीत,' अशी तक्रार करणाऱ्या पालकांनी काहीसे आत्मपरीक्षण करून पहावे व बालकांच्या हट्टी वर्तनाचे मूळ कारण शोधून काढण्याचा प्रयत्न करून त्या कारणांचे निराकरण केल्यास त्याच्या वर्तनात परिवर्तन होण्याची शक्यता ! नुसते सारखे म्हणून किंवा मारून, शिक्षा करून किंवा बळजबरीने हातात पुस्तक धरायला लावून अभ्यास होईलच असे नाही. उलटपक्षी, हेमंतसारखी भावनिक कमतरता निर्माण झाली आहे का, सुजाताच्या आई-

सारखं आपण आपल्या बालकाला परिपूर्ण करण्याचा प्रयत्न करीत आहोत की, दीपकच्या आईसारखं सारासार विचार न करता एखाद्या सामाजिक वावटळीने आपण झपाटले गेलो आहोत व त्याचे बालकावर दडपण आणीत आहोत ? काही वेळा एकुलते एक मूल असल्यावर, बऱ्याच वर्षांनी मूल झाल्यामुळे किंवा जीवनातील इतर कोणत्याही अपयशावर मात करण्यासाठी मुलांवर अशा प्रकारें दडपण आणले जाण्याची शक्यता असते.

एकच गोष्ट या ठिकाणी लक्षात ठेवण्यासारखी आहे की, अभ्यास किंवा शैक्षणिक यश हा व्यक्तित्वविकासातील केवळ एक पैलू आहे. मात्र तो चांगला विकसित झाला तर इतर पैलूंवर निश्चितच अनुकूल परिणाम करेल परंतु जर तो बिघडला तर मात्र आढीतील नासक्या आंब्याप्रमाणे इतर पैलूवर विपरीत परिणाम करायला कमी करणार नाही. आपल्या वर्तनामुळे किमान तेवढे होणार नाही, याची तरी पालकांनी खबरदारी घ्यावी.

वाढाळू वय

केदार

केदार दहावीपर्यंत चांगला हुशार म्हणून नावाजला होता. दहावीला अठ्ठ्याऐंशी टक्के गुण मिळवून पास झाला. तरी बोर्डाच्या परीक्षेत अपेक्षेप्रमाणे गुणवत्ता यादीत त्याचे नाव आले नाही. पण असे पुष्कळांचे होते म्हणून आई-वडिलांनी काहीसे दुर्लक्ष केले. अकरावीच्या वर्षी त्याने फारसा अभ्यास केला नाही. पण अनेक मुले ते विश्रांतीचे वर्ष म्हणून घेतात. बारावीच्या वर्षी करेल अभ्यास अशी आई-वडिलांनी स्वतःची समजूत करून घेतली. मात्र आताशा तो अस्वस्थ असतो, बेचैन असतो, चिडचिडा झाला आहे हेही त्यांच्या ध्यानात आलें होते. तरी आई-वडिलांच्या प्रेमळ नजरेला असे वाटे की, हे त्याचें स्वप्नरंजनाचे, अबोलपणाचे वाढाळू वय आहे. काही दिवसांनी सुधारेल. परंतु बारावीचें वर्ष सुरू झाले तरी त्याच्यात काही बदल होईना. अभ्यासाचे लक्षण दिसेना. तेव्हा मात्र आई-वडील घाबरले व तज्ज्ञ व्यक्ती गाठली पाहिजे, असे त्यांना वाटू लागले.

त्याला मोकळेपणाने बोलते केल्यावर असे लक्षात आले की, दहावीच्या वर्षात त्याची उंची अचानकपणे व झपाटयाने वाढू लागली. सुरवातीला वर्गात कौतुक झाले. परंतु हळूहळू कुचेष्टा होऊ लागली. अभ्यासात त्याचा हेवा करणाऱ्या मुलांनी त्याला मागच्या बाकावर घालविण्याचा चंग बांधला. उंच मुलांनी मागे असावे, हे शिक्षकांनाही संयुक्तिक वाटले परंतु

मागल्या ओळीत गेल्याने त्याचे मित्र बदलले. मागच्या बाकावरच्या मुलांची मनोवृत्ती त्याला न पटणारी होती, पण तोंड दाबून बुक्क्यांचा मार त्याला सहन करावा लागे. तास चालू असताना त्या मुलांच्या घाणेरड्या कोट्या करणे, मुलींची उन्नत चित्रे काढणे, सिनेमाच्या चर्चा करणे, हेमामालिनी काय इश्कभऱ्या नजरेने पहाते इ० शेरे केवळ ऐकावे लागत. इतकेच नव्हे तर त्यांच्याबरोबर वारंवार सिनेमाला जावे लागे. पडद्यावर नटी पाहिल्यावर आम्हाला काय काय होते, वाटते त्याचे ते रसभरीत वर्णन करीत. शिवाय तुला कसं हे सगळं वाटत नाही ? म्हणजे तू मुलगाच नाहीस. मग त्यांनी त्याला हस्तमैथुनाचे धडे दिले. हेतू हा की, त्याच्यातील ही शारीरिक सदोषता नाहीशी होईल.

शारीरिक सदोषता नव्हतीच तर जाणार कुठून ? मानसिक न्यूनत्व मात्र तीव्र प्रमाणात निर्माण झाले. ते काढण्यासाठी मुख्यतः त्याला किशोर-वयातील शारीरिक बदलांची शास्त्रशुद्ध माहिती द्यावी लागली. त्याच्यात जे बदल झालेले आहेत, ते त्याच्या निदर्शनास आणून देऊन शारीरिक वाढ ही सर्वसामान्यांप्रमाणेच आहे. असामान्य स्वरूपाची नाही, हे पटवून दिले. शिवाय शारीरिक वाढीबाबत व्यक्तिभिन्नता कशी निर्माण होते ते सांगावे लागले. म्हणूनच एका वर्गात शिकणाऱ्या समवयस्क मुलांमधे एकाच वेळी बदल होत नाहीत, तर सातवी-आठवीपासून अकरावी-बारावीपर्यंत ही प्रक्रिया वेगवेगळ्या वेळी मुलांच्यात दिसून येते. शिवाय अभ्यास, खेळ इतर क्षेत्रांकडे अधिक लक्ष असलेल्या मुलांचे हया प्रेरणेकडे फारसे लक्षही जात नाही. शिवाय कोणाला नटी पाहून रोमांच उठतात, तर कुणाला कवि-कल्पनेतील अप्सरा, रंभा जाणून रोमांच उठतात, तर कुणाला प्रत्यक्षात सुस्वरूप मुलगी पाहूनच ! प्रत्येकाची सौंदर्याची कल्पना वेगळी असते. तेव्हा त्यांना जे वाटले ते तुला वाटले नाही हयाचा अर्थ तुझ्यात दोष नसून, तुझी प्रकृती, तुझी रुची, तुझी अभिवृत्ती ही त्यांच्यापेक्षा भिन्न आहे.

शिवाय व्यायाम, खेळ, वाचन, अभ्यास यात गुंतलेल्या मुलांना या समस्या मुळीच भेडसावत नाहीत !

कु णा ल

केदारच्या एक वर्ष मागे असलेला, अकरावीत शिकणारा कुणाल पाहिला की वाटतं केदारची समस्या पुष्कळ बरी. कुणालला सातवी-आठवी-पर्यंत पंचाहत्तर-ऐंशी टक्के मार्क पडत होते. मात्र दहावीला बोर्डाच्या परीक्षेत अवघे चाळीस टक्के मार्क पडले. हयाची तर दहावीच्या वर्षीच उंची वाढू लागली. शारीरिक बदलाबद्दल औत्सुक्य निर्माण झाले. आई-वडील आजी-आजोबा स्वभावाने चांगले असले तरी हे काय त्यांना विचारायचे ? बहीण तर पाचवी सहावीतील. तिला विचारायचा प्रश्नच नाही. शेवटी त्याच्या काहीसे आधी वयात आलेले वर्गमित्र त्याला आधारभूत वाटले. त्यांनी काहीशी माहिती दिली. त्यांनी दिलेली चटकदार माहिती वाचायला घरी सोईस्कर जागा व वेळही होता. चटकदार मासिकांमुळे होणारा आनंद थोडयाशा काळातच संपला व कुणालच्या मित्रांनी त्याला दुसरीच चटक लावली... व्हीडिओ खेळातील मजा लुटायला त्याला शिकवले ! शिवाय पैशाची काही घरात कमी नव्हती... केवळ आई-वडील दोघेही नोकरी करत होते म्हणून नव्हे, तर वडीलार्जितही सधनता होती. शिवाय कुणाल हा आजी-आजोबांचा एकटा नातू-वंशाचा दिवा होता. त्याच्या काकांना केवळ दोन मुलीच होत्या. म्हणजे त्याला कुणीच कशाला 'नाही' म्हणत नसे. राजरोस मागितलेले पैसे पुरेनासे झाले तेव्हा त्याने आई-वडिलांच्या नकळत कपाटातील पैसे उचलायला सुरवात केली. रोज दहा-पंधरा रुपये करीत महिन्याचे तीन-चारशे रुपये त्याने बाहेर उडवूनही आई-वडिलांना काही पैसे कमी झालेले जाणवले नाही. शिवाय दहावीच्या वर्षातील डिसेम्बर महिना, पूर्वपरीक्षा जवळ आलेली. त्यानिमित्ताने व पुढे बोर्डाची परीक्षा म्हणून शाळा बंदच. घरी एकटयाने अभ्यास करण्यापेक्षा मित्रांबरोबर करतो, असे सोज्वळपणे सांगून कुणाल सोयिस्करपणे जवळील निरनिराळ्या हॉटेल्सच्या मध्ये दहावीचे नव्हे तर जीवनमार्ग बिघडविण्याचे पाठ घेत होता. रात्रीचे जेवण झाल्यावर अजून आई-बाबा डायनिंग टेबलपाशी आहेत तो-

पर्यंत हळूच कपाटातील पैसे घेऊन वहीत घालून 'आई, मी मकरंदकडे जाऊन येतो ग, वाट पाहू नकोस व काळजीही करू नको!' अशी आरोळी ठोकत रात्री नऊला सायकलवर टांग मारीत असे. आई-वडिलांचा गोड गैरसमज झाल्याशिवाय राहील का? हें उघडकीला आले अकरावीच्या वर्षी सप्टेम्बर-आक्टोबरमधे! ज्यावेळी त्याने तीन-चार महिन्यांची फी भरली नाही म्हणून त्याच्या प्राचार्यांचे पत्र आले तेव्हा! त्यानिमित्ताने शाळेत गेल्यावर वडिलांना कळले की, आपले चिरंजीव शाळेत नसतातच. त्यांचा मुक्काम कुठे असतो हे त्याच्या सख्यासोबत्यांनी सांगितले व त्याचबरोबर कुणाचे पंचवीस, कुणाचे पन्नास रुपये त्याच्याकडे आहेत... ती देणीही त्यांना सांगितली.

किमान वर्ष-दीड वर्षांच्या काळात अभ्यासाशी संपर्क नसलेला, सहजपणे व भरपूर पैसा हातात खेळवायची सवय झालेला कुणाल व त्याचे अतिरिक्त लाड करण्याची सवय झालेले आई-वडील. एकीकडे हवा पद्धतीने मुलगा हाताबाहेर जाईल की काय ही भीती बाळगणारे, तर कडक धोरण स्वीकारताना घरातून निघून तर जाणार नाही ना, जिवाचे बरेवाईट तर करणार नाही ना, ही भीती बाळगणारे आईवडील, सध्या तर केवळ मनः-स्तापाच्या, गोंधळाच्या, अनिश्चिततेच्या भोवऱ्यात सापडले आहेत. कुणालच्या मनात ठसवायचे की, अशी पैसे उचलण्याची सवय तुझे पुढले सगळे आयुष्य बिघडवून टाकेल, जक्कल-सुतारच्या ओळीत जायला तुला वेळ लागायचा नाही. शिवाय स्वकष्टाने, निढळाच्या घामाने मिळालेला पैसा खर्च करण्यात व त्याचा उपभोग घेण्यातही काय मजा असते, तें अनुभवाने बघ. मग तुला वाटेल आपण कोणत्या चिखलात सतत जात होतो आणि त्याच्या आई-वडिलांना पटवायचे की, वंशाचा दिवा झाला तरी तो मागेल ते सगळे देत सुटायचे नाही. त्याच्या उज्ज्वल आयुष्यासाठी वेळप्रसंगी कठोर होऊन परंतु जागृतपणे, डोळसपणें त्याला पैशाची किंमत समजावून देणेच आवश्यक आहे. अर्थात वैचारिक परिवर्तन दोन-चार वेळा भेटून करता येत नाही. त्यासाठी हळूवार हाताने एकेक पदर सुटा करणेच आवश्यक आहे.

के त न

' रिमांडहोममधील एका मुलाची केस आली आहे. तुमच्या मदतीची आवश्यकता आहे.' असा एका मानसतज्ज्ञाचा फोन आल्यावर तातडीने मी त्यांच्या क्लिनिकमध्ये गेले. मुलाचा मोठा भाऊ व आई तिथे बसलेले होते. थोड्याच वेळात त्यांना बोलतें केल्यानंतर आई तर बरीचशी रडत-रडत परंतु मोकळेपणाने सगळे सांगत होती. मधूनमधून मोठा मुलगा मदत करीत होता.

सध्या रिमांडहोममधे ठेवलेला केतन हा त्यांचा मधला मुलगा. सुमारे पंधरा वर्षांचा. मोठा मुलगा बरोबर होता व सगळ्यात धाकटा घरी होता. मुलांचे वडील अत्यंत कडक स्वभावाचे, जमदग्नीचाच अवतार. मुले व बायको त्यांना चळचळा कापत असत. वडील अत्यंत धडाडीचें व कर्तृत्ववान. अत्यंत गरिबीतून, स्वकर्तृत्वावर संपूर्णतः वर आलेले. आता घरात कशाचीही कमी नव्हती. त्यांना वाटते की, जे आपल्याला पैशाअभावी जमले नाही, ते मुलांना द्यावे. मुलांनी शिकावे, स्वतःचें व वडिलांचे नाव मोठे करावे. त्यासाठी त्यांची घरात काही शिस्त होती. तिचे काटेकोरपणाने पालन व्हावे. न झाल्यास ते कडक शिक्षा करीत. वेळप्रसंगी सतरा-अठरा वर्षांच्या मोठ्या मुलालाही मारायला कमी करीत नसत. मुलांची आई त्यामानाने फारच साधी, शांत स्वभावाची- किंबहुना डोक्याने काहीशी थंडच. तिला आपल्या पतीच्या कडक वागण्या-मागची भूमिका कधीही समजली नाही, तिने समजावून घेतली नाही व पतिराजांनीही तिला समजावून दिली नाही. दोघांच्यातील बौद्धिक तफावती-मुळे त्यांचा सुसंवाद कधी होऊच शकला नाही. वडील बाहेर पडल्यावर मुले चिडचिड करीत, तणतण करीत. तर तीही त्यांना साथ देई. ' तुमचे बाबा असेच आहेत.' असे म्हणून ती त्यांची री ओढीत असे. इतकेच नव्हे तर वडील जे देत नसत ते ती देत असे. म्हणजे त्यांना प्रेमाने जवळ घेणे, मिठ्या मारणे, मुके घेणे, इतकेच नव्हे तर ते म्हणतील तेव्हा त्यांना शान-शोकीचे कपडे, सिनेमा, हॉटेलिंग, जत्रा, व्हीडिओ हया सर्वांसाठी पैसेही देत

असे. तिला प्रांजळपणे वाटे की, मुलेच ती-त्यांच्या बरोबरीची मुले जे करतात ते त्यांना नाही का करावेसे वाटणार ! त्यांना किती कडक वातावरणात वाढवायचे ?

जसजशी मुले मोठी होऊ लागली तसतशी त्यांनी आई-वडिलांच्यातील हचा विसंगतीचा पुरेपूर फायदा घ्यायला सुरवात केली. वडील फार थोडा वेळ घरी असत. त्या काळात मुले सोयिस्करपणे बाहेर व वडील घरात नसताना मुले घरात असत. आज ती आई रडत होती की, मुलाने एका संस्थेतील सोळाशे रुपये चोरले म्हणून तेथील पदाधिकाऱ्यांनी त्याला पोलिसांच्या ताब्यात देऊन रिमांडहोममध्ये टाकले आहे. समाजात किती नाचक्की होते. त्यापेक्षा वडिलांनी ते पैसे भरून त्याला सोडवून आणले तर चार माणसात मान खाली तरी घालावी लागणार नाही आणि वडिलांजवळ पैसा नसता तर गोष्ट वेगळी ! पण असून आपल्याच पोटच्या गोळ्यासाठी का नाही खर्च करायचा ? वडिलांचे म्हणणे असे आजपर्यंत त्याने घरातल्या घरात-एवढी उचेलगिरी केली तेव्हा मी त्याला सुधारायला संधी दिली. आता वाटते की, त्यावेळीच त्याला रिमांड होममधे टाकायला हवे होते. निदान आता तरी त्याला सोडवून आणणार नाही. त्याच्या कर्माची फळे त्याला भोगू देत.

आई-वडिलांच्यात वैचारिक समझोता नसल्याने मुलांशी वागताना कसा फरक पडतो, मुलांच्या वागण्यावर त्याचा विपरित परिणाम होतो, बालसंगोपन करताना केवळ त्यांच्या शारीरिक गरजा भागवून चालत नाही, तर मानसिक गरजा, मानसिक परिणाम इत्यादींचाही विचार करणे आवश्यक असते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे आई-वडिलांमधे वैचारिक देवाण-घेवाण होऊन मुलांशी कसे वागायचे त्याची तत्त्वे निश्चित ठरायला हवीत आणि व्यक्ती दोन परंतु मन, विचार एक या पद्धतीने मुलांशी वागणे आवश्यक आहे, तरच मुलांचा विकास निरोगी स्वरूपाचा होईल.

स्व प्ना ळू व य !

क वि ता

'त्याचे नि माझे पूर्वजन्मीचे संबंध गुंतलेले आहेत. ते दूर होणे कदापिही शक्य नाही. वडिलांना ते मान्य नाही. त्याची माझी एक महिन्याचीच ओळख. इतक्या थोडक्या अवधीत 'प्रेम बसतं' याची आईबाबांना यत्किंचितही कल्पना नाही. बाबा रागाने म्हणतात, 'पाहिजे तर त्याच्याबरोबर निघून जा !' परंतु आई फार हळवी आहे. तिचे माझ्यावर विलक्षण प्रेम आहे. बाबा तर जिवापाड प्रेम करतात. 'त्याला कधीही भेटणार नाही-' असं बाबांना मी वचन दिले आहे. त्यांचा त्यावेळचा आनंद असामान्य होता. तो मी कधीच मळवणार नाही. माझे एक घर उभारण्यासाठी तीन घरे उजाड करायची- आई, बहीण व भाऊ यांची ! त्यांचे शाप माझ्या घराला लागतील. ते मला नको आहे. त्यापेक्षा त्याच्या आठवणींवरही जगता येईल !

'हे आपले घर आहे, असं कधीच वाटत नाही. त्यामुळे माझे छोटेसे घरकुल मी कधी वसविन, त्यात माझा चिमणा राजकुमार असेल, त्याला कसे वाढवायचे, त्याचे कसे लाड करायचे याची मी स्वप्ने पहातें आहे.' ग्रॅज्युएट होऊन, नोकरी लागून स्वतःच्या पायावर उभे रहायचे व मगच विवाह करायचा असे एकीकडे म्हणत, अनेकदा पळून जाणारी ही तरुणी नसून एक किशोरी आहे, अवघी सोळा वर्षांची ! कविता अशा तऱ्हेने काव्यात्मक बोलत असताना मला मात्र वाटू लागले की हिने जन्मोजन्मी असेच बोलत रहावे व आपण

कानांचे पारणे फिटेपर्यंत ऐकत रहावे. परंतु काहीसा मागाहून विचार केल्यानंतर तिच्या बोलण्यातील विसंगतीही जाणवू लागे. घरातून हाकलून देणाऱ्या बाबांबद्दल राग व्यक्त करता करता ती लगेच म्हणते की, 'बाबांचे माझ्यावर जिवापाड प्रेम आहे.' विलक्षण प्रेम करणाऱ्या आईबद्दलही रागाने बोलताना 'ती विश्वासघातकी आहे.' असे म्हणून मोकळी झाली. हेच विशेषण तिने एका मैत्रिणीबद्दलही एका क्षणाला काढते, तर दुसऱ्या क्षणाला 'तिची ही मैत्री साधी नसून दैवी मैत्री आहे-' असेही उद्‌गार काढले. 'मैत्रिण हयापेक्षाही तिचे वेगळे स्थान माझ्या मनात आहे.'

खरोखरच कविमन असलेली ही कविता घटकेत फार लहान होते, तर घटकेत तीच म्हणते त्याप्रमाणे बालपण हरवून बसलेली वाटते. पंधरा-सोळा वर्षांपर्यंतच्या वयात अडीचशे-तीनशे कविता तिने रचल्या आहेत व नामवंत कवींना दाखवल्यावर त्यांनीही तिच्या काव्यरचनेची प्रशंसा केली. पण अशी ही भावूक कविता आईवडिलांना, शिक्षकांना वेडी वाटते, ॲब्‌नॉर्मल वाटते ! घरात, शाळेत तिचा फार त्रास होतो. 'असली तर सूत, नाहीतर भूत' असे तिचे थोडक्यात वर्णन केले जाते. फारसा अभ्यास न करताही तिला सत्तर-पचाहत्तर टक्के गुण सहज पडतात. तिला वडिलांनी क्लासला घातले आहे, पण ती काही नियमितपणे क्लासला जाईल याची खात्री नाही. त्याच वेळात ती एखाद्या मित्राबरोबर रिक्षाने बागेत जाऊन हातात हात घालून काव्यात्मक भाषेत बोलत बसेल. निघताना प्रेमिकांना शोभेल असाच निरोप घेईल. त्यामुळे आईला वाईट वाटे की, थोडासा जरी अभ्यास केला तरी तिला खूप चांगले मार्क पडतील तिच्या आईला वाटते की हिला अकराव्या वर्षी म्हणजे जरा लवकरच पाळी आली व म्हणून ही अशी झाली

परंतु कवितेची ही परिस्थिती आज काही अकस्मितपणे निर्माण झाली नाही. बुद्धीने हुशार असलेल्या या मुलीला घरात पोषक वातावरण मिळाले नाही. सनातनी विचाराच्या वडिलांनी मारहाण करून मुलांना, बायकोला नजरेच्या धाकात ठेवण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या इच्छेप्रमाणे कवितेची धाकटी बहीण अगदी आज्ञाधारक झालीही आहे. परंतु खाली मुंडी ठेवणारी मुलगी पाताळ धुंडू शकते ही त्यांना कल्पना नाही. कवितेची आईसुद्धा शांत स्वभावाची, खाली मान घालून वावरणारी. 'त्यांनी मारलं तरी ते प्रेमाच्या

पोटीच मारतात.' असें विश्वासाने म्हणणारी ! मात्र त्यांच्या हया संगोपन पद्धतीला कविताने वेगळचा प्रकारे प्रतिक्रिया व्यक्त केली. साहजिक त्यांनी आपला कडकपणा जास्तच वाढवला. वेळप्रसंगी तिला मारत असत. चामडचाच्या पट्टयानेसुद्धा ! 'घरात राहू नकोस. तू माझ्या घराला कलंक लावतेस !' असे ते वारंवार म्हणत. परिणामतः सहावीपासून दहावीपर्यंत कविता किमान चार वेळा तरी पळून गेली आहे !

पाळी काही विशेष लवकर आली नाही. परंतु त्यासंबंधी निर्माण झालेली तिची जिज्ञासा आईने पुरवली नाही. घरात वडिलांची दंडेलशाही ! आईही वडिलांना घाबरे, म्हणून आईबद्दल अनादर, घृणा व वडिलांबद्दलही मनात राग ! हया सर्वांचा परिणाम म्हणून बाहेर प्रेमाचा ओलावा शोधण्याचा प्रयत्न ! त्यात सारासार, चांगला, वाईट ठरवायची कधी लहानपणापासून संवयच नाही त्यामुळे असल्या अनिष्ट परंतु गोड बोलणाऱ्यांकडे भावूक, भाबडी कविता सहजपणे ओढली गेली व आत्तापर्यंत एक-दोन वेळा कुणाच्या ना कुणाच्या प्रेमात पडली. सध्या तर पोटापाण्याचा काहीही धंदा न करता समाजकार्याच्या उदात्तपणाचा केवळ बडेजाव करणाऱ्या व गावोगाव भटकणाऱ्या एका पस्तीशीच्या लफंग्याने तिच्यावर भुरळ टाकली आहे. जेव्हा तो तिला म्हणतो, 'मला तू फार आवडतेस, माझे तुझ्यावर असीम प्रेम आहे !' तेव्हा तिला लगेच वाटू लागते की, त्याचे-माझे पूर्वजन्मीचे संबंध आहेत.

अशी ही सर्वांना समस्यात्मक वाटणारी कविता सुधारायची म्हणजे काय करायचं ? तिला सांगायचे की तू त्या लफंग्यावर प्रेम करू नकोस. तो लफंगा आहे तुला फसवेल असे तिला सांगायचे ? पटेल ? की तिला घरात कोंडून ठेवायचे ? सतत नजरकैदेत ठेवायचे-त्यामुळे तुटेल त्याच्यापासून ? विरहगीते, प्रेमगीते करणे बंद होऊन पुन्हा पूर्वीसारखी निसर्गगीते ती करू लागेल ? की तिच्या आईवडिलांनाच तिला कशाप्रकारे वागवा याचे प्रशिक्षण द्यायचे ? किती वेळ लागेल त्याला ? व सुचवल्याप्रमाणे हया वयात आपल्या वर्तनात ते बदल करतील ?

कविता सुधारणे अशक्य नाही पण त्यासाठी तिचे कुटुंब आणि समाजानेही तिला मदत करायला हवी !

के त की

एकदा एक आजीबाई आपल्या नातीसह आल्या. नात मान खाली घालूनच बसली होती. म्हणून आजीबाईंना म्हटलं, 'बोला, काय अडचण आहे ?'

'ही काही बोलतच नाही. अशीच मुक्याने गेले दोनतीन महिने तरी बसली आहे.'

'बरं–' म्हणून तिला ताब्यात घेण्याच्या आविर्भावात मी तिच्याकडे मोहरा वळवला व तिला बोलते करायचा प्रयत्न करू लागले. अधूनमधून ती वर पाही, नजरेला नजर भिडवी, भुवई उंचावी, आजीकडे प्रश्नार्थक नजरेने पाही. अधूनमधून आजी म्हणे, 'अग सांग, त्या एवढ्या प्रेमाने विचारत आहे तर !' पण तिचा न बोलण्याचा निर्धार पक्का होता. शेवटी पहिल्याच भेटीत नाही बोलली, हळूहळू बोलेल, असा मनात विश्वास ठेवून आजीबाईंना बाजूला घेऊन मी तसे सांगितले. पण माझा विश्वास जेव्हा खोटा ठरला तेव्हा मी आजीबाईंना एकटीलाच पुढल्या वेळी बोलावले व तेव्हा मात्र माझा प्रयत्न यशस्वी झाला.

बारावीच्या परीक्षेला बसलेली ही केतकी केवढ्या मोठ्या दडपणात वावरते आहे–कसे तिने माझ्यासारख्या तटस्थ स्त्रीजवळ मोकळेपणे बोलावे ? घरची परिस्थिती बेताचीच. ती लहान असतानाच आई वारली होती. वडिलांनी दुसरे लग्न केल्यावर आजीने तिला आपल्या घरी आणले. आजीलाही दुसरा आधार किंवा विरंगुळा काहीच नव्हता. गेली चौदापंधरा वर्षं त्यांनी केतकीला तळहाताच्या फोडाप्रमाणे जपली. पोरगीही गुणी निघाली. अभ्यासात हुशार ! त्यामुळे वर्गात शिक्षकांची तसेच मैत्रिणींच्यातही ती आवडती होती. वागायला विनयशील, लाघवी. तसेच दिसायलाही आईसारखी सुस्वरूप आजीही वेळप्रसंगी कोंडचाचा मांडा करून, स्वत:च्या पोटाला चिमटा घेऊन तिला खायलाप्यायला तऱ्हेतऱ्हेचे पदार्थ अधूनमधून करून घाली. एखादा नवीन पद्धतीचा कपडा शिवत असे. बारावीच्या परीक्षेत चांगले मार्क पडावेत, आपली नात ग्रॅज्युएट व्हावी म्हणून तिच्याच कॉलेजमधील एका

प्राध्यापकांच्या शिकवणीला तिला घातले होते. तिच्या मैत्रिणीही तिथेच जात होत्या. वर्षभर सरांनी मेहनत करून घेतली. चांगले मार्गदर्शन केले. क्लास झाल्यावर कधी त्यांच्या दोन छबकडयांशी पाच मिनिटे खेळावे, बोलावे, घरी यावे, तर कधी त्यांच्या सौ. नी सगळयांसाठी केलेला चहा घेऊन घरी यावे... सगळयाच मुली हया घरगुती वातावरणामुळे विशेष खूष होत्या. बोर्डाची परीक्षा झाली. सगळयांचे पेपर्स चांगले गेले. सरांना सांगायला जाऊ, असा सर्वांचाच विचार होता. आज उद्या करत कुणाची मावशी, कुणाचा आतेभाऊ कुणाकडे घाकटया भावाचा वाढदिवस तर कुणाकडे सगळयांनी एकदम जाऊन सिनेमा पहाणे यात काही एक वेळ ठरेना. असेच पाचसहा दिवस गेले व एक दिवस केतकीला तिचे सरच रस्त्यात भेटले व पेपर दाखवायला आली नाहीस म्हणून त्यांनी जरासे छेडले व 'उद्या दुपारी तीन वाजता ये. सगळयाजणी येणार आहेत.' असे सरांनीच सांगितले. केतकीने खुषीत 'हो' म्हटले.

ठरल्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी त्यांच्याकडे गेली. दहापंधरा मिनिटे झाली तरी कुणीच मुली आल्या नाहीत. त्या दिवशी बाई व मुलेही घरात नव्हती. पंधरा-वीस मिनिटे नेहमीप्रमाणे हसत-खेळत गप्पा मारून झाल्यावर केतकी मैत्रिणींना बोलवायला जायला उठली, तर 'बैस ग, येतील-' असे म्हणून केतकीच्या हाताला धरूनच खाली बसवले. दार लावून घेतले व 'चल आत, कॉफी करतो.' म्हणून घेऊन गेले आणि कसली कॉफी हो, बाई! राक्षस की हो झाला तो! हया पोरीला तर काहीच माहिती नाही. काही कळलेच नाही. त्या दिवशी घरी खूप उशिरा आली. कुठे गेली होती, ते तुम्हीच विचारा तिला. पण आली ती हसणे गमावूनच.

दोन दिवस झाल्यावर जरा सावरली. घरात नेहमीप्रमाणे नाही तरी बरीच चांगली वागू-बोलू लागली. पण महिन्या दीड महिन्यानं हिला ओकाऱ्या की हो होऊ लागल्या. एवढे पावसाळे पाहिलेली मी पण मला काहीही वाईट शंका मनात आली नाही. उन्हाळचाचा त्रास असेल म्हणून मी साध्या डॉक्टराकडेच नेलं. दोन दिवस औषधाने बरे वाटेना. मग तो डॉक्टर भीतभीतच मला म्हणाला, 'हिला बायकांच्या डॉक्टरकडे न्या.' त्याची

शंका खरी ठरली. त्या बाईच्या सांगण्यावरून लगेच तिचे अॅबॉर्शन करून टाकले. मला तर सगळं जग आपल्याभोवती फिरतेय असे वाटायला लागले. इतकी गुणी पोरगी असे शेण खाईल, असे काही कधी वाटले नाही. संध्याकाळी घरी आणली, ती पण गप्प व मी पण गप्प! दुसऱ्या दिवशी कोण काय विचारू लागले तरी हिचे तोंड आपले शिवलेलेच. मग मात्र माझाच तोल सुटला. हातात होते ते लाटणे घेऊनच तिला बेदम मारले. ओरडली, रडली पण काही सांगितले नाही. नंतर मीच विचार करता करता मला वाटले की, तो मास्तरडाच राक्षस असावा. तिच्या मैत्रिणींना बोलावून तुम्ही केव्हा गेला होतात, वगैरे चौकशी केली. तर माझ्या असे लक्षात आले की, केतकीच्या आधी दोन दिवस त्या जाऊन आल्या होत्या. अचानक ठरले, जाऊन आल्या. आणखीही एकदोन मुली आल्या नव्हत्या. 'पण अगदी सगळ्यांनीच कशाला जायला पाहिजे?' असा विचार करून ज्यांचे जमले तेवढ्या जाऊन आल्या.

ऐकून दिङ्मूढ झाले. किती सहजपणे अभावितपणे घटना घडून गेली. परंतु एखाद्या नाटक-सिनेमात शोभावी अशी नाट्यपूर्ण! परंतु मन विचार करू लागले; हा अभावितपणा, अज्ञानच नडले केतकीला. त्या क्षणाला शिप्याच्या दुकानात आपल्या कपड्यांची मापे अंगावरून घेऊ देण्याऱ्या काही निरागस मुली डोळ्यासमोर आल्या. एखादचा लिफ्टमधून जाताना पुरुषांच्या गराड्यात असलेली एखादी तरुणी किंवा केतकीसारखी कुंदकळीही डोळ्यासमोर येऊन गेली. म्हणजे स्त्रियांनी पूर्वीसारखे बंदिवान व्हायचे का? पुरुषांची जातच राक्षसाची का? दोन्ही प्रश्नांची उत्तरे नकारार्थीच आहेत! सर्वच पुरुष असे पाशवी वृत्तीचे नसतात व त्याचप्रमाणे संधी मिळाली तर तिचा फायदा उठविणारी अपवादात्मक का होईना पण ही स्त्री मिळवल्याशिवाय राहात नाही. स्वरूप वेगळे असेल, पण प्रवृत्ती तीच. मात्र हचा निरागस निष्पाप मुलींना शिक्षकाकडे अभ्यासाला जाताना काय, सोनाराकडे किंवा कासाराकडे बांगडीचे माप द्यायला जाताना शास्त्रीय माहिती मिळालेली असणे आवश्यक आहे. विपरीत भावना कशा व्यक्त होऊ शकतात; त्यांची लक्षणे काय, हे वानगीदाखल माहिती असावे. त्याचे प्रात्यक्षिक त्यांना वानुभवातूनच मिळेल, पण तसे मिळताक्षणी त्या जागृत होतील व पुढील

अनर्थ घडणार नाही. 'हा विषय चर्चेचा नाही' असे म्हणून आपली जबाबदारी आईवडिलांनी झटकून चालणार नाही.

कांचन

बारावीच्या वर्गात शिकणारी कांचन दिवाळीच्या सुट्टीत गावी जाऊन आली, तो पहिल्याच दिवशी मला फोन, 'बाई, तुमच्याशी फार महत्त्वाचे बोलायचे आहे, केव्हा येऊ?'

'महत्त्वाच्या गोष्टीला वेळ कशाला दवडायचा? लगेच आजच दुपारी ये.'

दुपारी पहिली दोन चार मिनिटे हवापाण्याच्या, प्रवासाच्या, दिवाळीच्या गोष्टी झाल्यावर, तिने मुद्यालाच हात घातला.

'एका मुलाशी माझी मैत्री आहे. नेहमी तो संध्याकाळी हॉस्टेलवर येतो. आम्ही गप्पा मारत बसतो, बाहेर जातो. काहीही वाईट करीत नाही! दोन मुलींची जशी मैत्री असते, तशीच आमची मुलगा व मुलगी यांची आहे. तरीसुद्धा दिवाळीला जाण्यापूर्वी त्याने मला विचारले की, 'तू माझ्याशी लग्न करशील का? मी आता गावी गेल्यावर माझे वडील मला लग्नाचा आग्रह करतील. तुझा होकार असेल तर मी वडिलांना सांगोन–' पण त्यावेळी मी त्याला झिडकारून टाकले की, 'मी तुझी मैत्रीणच राहणार, बायको होणार नाही.'

'पण बाई, गावी गेले नि मला असे जाणवले की आपल्याला त्याच्याशिवाय राहणे कठीण आहे. सारखी त्याच्या आठवणीने मी बेचैन होत असे. शिवाय लग्न झालेली माझी मोठी बहीण आलेली होती. तिचेही एका मुलावर प्रेम होते. पण आमचे वडील आमदार आहेत. त्यांना असे परजातीयाशी व प्रेमविवाह केलेला आवडणार नाही, हे तिला माहिती होते. मग वडील रागावतील, मारतील, कोंडून ठेवतील, म्हणून तिने त्यांना सांगितलेच नाही व वडिलांनी सांगितलेल्या मुलाशी मुकाट्याने लग्न केले. पण आता सारखी रडत होती. नवरा व सासरची माणसे तिला फार छळतात व मग सारखी

तिच्या मित्राची आठवण येऊन रडत होती. तें पाहून मलाही वाटले की आता मी रमेशला 'नाही' म्हटले आहे, पण माझीही अवस्था ताईसारखीच होईल. म्हणून मग गुपचूप तेथूनच रमेशला त्याच्या गावी पत्र लिहिले की, 'कॉलेज सुरू होण्यापूर्वी चार दिवस पुण्यात ये, मी मावशीकडे राहीन, मला लगेच भेट.' तर तो आज-उद्या येईलच.'

'मग काय लगेच लग्नाचे वचन देऊन टाक. वडिलांना तसे सांगून टाक की झालं ! बारावीची परीक्षा झाली की लग्न करायला मोकळी. पदवीधर व्हायलाच पाहिजे असा कुठें नियम आहे ?' मी मुद्दामच म्हटले.

'नाही बाई. मी ग्रॅज्युएट होणारच. जमले तर त्याही पुढे शिकायची माझी इच्छा आहे. शिवाय हे वडिलांना सांगता येणार नाही. त्याची जात आमच्यापेक्षा खालची आहे. वडिलांच्या पुढारीपणाला आमच्या विवाहामुळें बाधा येईल. त्याच्याशी लग्न करायचे तर मला घरातून पळून जाऊन ते केलें पाहिजे. पण बाई, मी तसेसुद्धा करायला तयार आहे. मला कितीही त्रास झाला तरी हरकत नाही. पण माझें रमेशवर जिवापाड प्रेम आहे, हे मला जाणवलंय व त्यासाठी मी काहीही कष्ट सहन करायला तयार आहे.'

'पण काय ग, तू अशी नेसत्या वस्त्रानिशी बाहेर पडणार, तुझ्या माहेरून काहीही बिदागी मिळणार नाही ही कल्पना त्याला आहे का ? त्याला तसं चालणार आहे का ?'

'नाही, एक तर सुट्टीला जाताना मी झिडकारूनच गेले होते व माझें वडील आमदार आहेत. गावात त्यांचा चांगला वचक आहे ! बंगला, शेती मोठी आहे, हे त्याला माझ्याशी ओळख होण्यापूर्वीपासून माहिती होते.'

'त्याला वाटले असेल पुढारी म्हणजे आधुनिक विचाराचे असतील, त्याच्यासारख्या कनिष्ठ जातीतील मुलालाही जावई म्हणून पत्करतील व तू घरातून काहीही न घेता पळून येणार म्हटल्यावर त्याने विवाहाला नकार दिला तर ?'

'नाही बाई, असं नाही होणार ! त्याचं माझ्यावर खरंच जिवापाड प्रेम आहे ! तो तर नेहमी म्हणायचा, माझ्या बायकोला मी नोकरी करायला लावणार नाही. तिला राणीसारखी आरामात ठेवणार' मी केवळ हसले. मनात आले, हयात बायकोला परावलंबी, परस्वाधीन करून टाकायची,

तिला पांगळी करायची व आपण बाहेर फुलपाखरासारखं फिरत रहायचे, अशीही सुप्त प्रवृत्ती असू शकते. परंतु हे विचार तिला आता पटले नसते, पचले नसते व रुचलेही नसते. ती बोलतच होती, 'तेव्हा मला माहेरून काही मिळाले नाही तरी तो काहीही म्हणणार नाही.'

'ठीक आहे. मला साधारण कल्पना आली आहे. मला त्याच्याशीही बोलावे लागेल व मगच काय ते तुम्हा दोघांनाही सांगावे लागेल.'

'तो येईलच आज. मी त्याला दोन पत्रे टाकली आहेत. तो माझ्यासाठी धावत येईल. लगेच आज संध्याकाळी किंवा उद्या सकाळी मी त्याला तुमच्याकडे घेऊन येते.'

त्यानंतर चार दिवस गेले तरी कांचनचा पत्ता नाही. रोज सकाळ-संध्याकाळ माझी वाट पहाणे चालू होते. शेवटी मला काळजी वाटू लागली. पण रमेश ठरल्याप्रमाणे त्याचे कॉलेज सुरू व्हायच्या दिवशीच आला. कांचनसाठी काही लवकर आला नाही. शिवाय आल्यावरही आरामात दोन दिवसांनी तिला भेटला. भेटल्यावर ती जितकी आतुर झालेली होती, तितकाच तो थंड होता. 'तू जाताना नकार दिलास. आता माझं लग्न ठरलं,' तिच्या चुकीबद्दल तिला केवढी तरी जबर शिक्षा करीत असल्याच्या आविर्भावात म्हणत होता. साहजिकच आपल्याच खोलीत हमसून-हमसून रडणे झाल्यावर कांचन माझ्याकडे हिरमुसली होऊन आली व घडलेला प्रसंग अत्यंत निराश होऊन तिने सांगितला. त्या दिवशी तर केवळ तिची समजूत घालीत तिला शांत करण्याचाच मी प्रयत्न केला व शेवटी जाताना तिला म्हटले, 'ठीक आहे. त्याला तुझ्याशी लग्न करायचे नसले तरी एकदा मला भेटायला काहीच हरकत नाही. निदान तुझा मित्र कसा होता हे तरी मला कळेल.' ती 'हो' म्हणून बाहेर पडली. परंतु दोन दिवसांनी घाईघाईने एकटीच आली व म्हणाली, 'बाहेर दाराशी चला, तुम्हाला तो कोपऱ्यावर उभा असलेला दाखवते. तेवढा तरी तुम्हाला पहाता येईल. कारण तो काही तुमच्याकडे यायला तयार नाही.' तिच्या इच्छेखातर मी बाहेर जाऊन पाहून आले. मनातून चांगलीच हबकले, पण त्याचबरोबर, 'बरं झालं, कांचन वाचली!' असाही निश्वास टाकला. ती मात्र आनंदाने बोलतच होती. 'एकदम अमिताभसारखा दिसतो की नाही? ही पांढरी पँट व फुलाफुलांचा-

गडद निळा पूर्ण बाहूंचा शर्ट घातला की अगदी अमिताभ ! मी त्याला नेहमी म्हणत असे की, तो शर्ट तू खोचत जा आणि पट्टा लावत जा की, अमिताभची डमी म्हणून तुला नक्कीच काम मिळेल.'

आत आल्यावर आम्ही दोघीही काही वेळ शांत बसलो. परंतु कांचनला तो शांतपणा अस्वस्थ करू लागल्यावर ती कळकळीने म्हणाली, 'बाई, सांगा ना आता काय करायचे ?'

'पहिली गोष्ट म्हणजे रमेशचा नाद सोडून द्यायचा. इतक जिवापाड प्रेम घेण्याची त्याची योग्यता नाही. अमिताभशी तुलना करून त्याला जास्त भावही देऊ नकोस व तू काल्पनिक धुंदीतही राहू नकोस. अग, सगळीच तरुण मुले सडसडीत असतात. त्यामुळे अमिताभ हेअरकट केला व त्याच्यासारखे कपडे घातले की झाल्या त्याच्या डम्या तयार ! अशा डम्यांचा गल्लोगल्ली खच पडला आहे. दुसरे असे की चित्रपटात जे अमिताभचे पराक्रम, कर्तृत्व दाखवतात, ते समाजातील हुच्या डमींना व्यवहारात कधीही शक्य नाही. इतकेच काय, प्रत्यक्ष अमिताभलाही शक्य नाही ! कारण ते कर्तृत्व गोष्ट लिहिणाऱ्याने रचलेले असते व प्रत्यक्ष पडद्यावर दाखवितात त्यातील बहुतांशी फोटोग्राफीची किमया असते.

'तुझ्या ताईच्या रडण्याने तू जास्त हेलावलीस व म्हणून हा क्रांतिकारी विचार तुझ्या डोक्यात आला. विचार फार स्तुत्य आहे. खरोखरीच वडिलांनी सांगितलेल्याच मुलाच्या गळ्यात माळ न घालता, तुझ्या आवडीच्या मुलाच्या गळ्यात तू माळ घाल. वेळप्रसंगी गरिबी-श्रीमंतीचा, रूपाचा जातीचाही विचार करू नकोस व तितकीच वेळ आली तर घरातून पळून जाऊनही ! पण ज्याच्यासाठी हे सगळं करायचं ना, ती व्यक्ती तितक्याच योग्यतेची हवी. ते रत्न आपण पारखून घ्यायला हवं. अगं, हा रमेश तुझ्यावर लाईन मारायला लागला-तेसुद्धा तू आमदाराची, पैसेवाल्याची मुलगी म्हणून ! वडिलांनी पैसा देऊन लग्न करून दिलं असतं, तरी त्याने छळायला कमी केले नसते व तू घरातून पळून त्याच्या दारात गेल्यावर तर कदाचित त्याने तुला ! कोण तू ?' म्हणूनही विचारले असते.

'आता घाबरण्याचे काहीही कारण नाही. तुझा विचार चांगला होता; पण ज्या व्यक्तीसाठी केलास तीच तितकीशी चांगली नव्हती. हे चांगले-

वाईट पारखायला तू अजून फार लहान आहेस. आता तुझे यंदाचे वर्ष महत्त्वाचे आहे पुढले दोन-तीन महिने, पूर्णपणे अभ्यासात मन गुंतव. त्यानंतरही ग्रॅज्युएट होईपर्यंत लग्नाचा विचारही करायचा नाही. वडील करायला लागले तर त्याबाबतीत काय विरोध करायचा तो कर, पण ग्रॅज्युएट झालीस की, शिक्षणाने व वयाने तुला परिपक्वता येईल व मग तुझी निवड चुकणार नाही, याची मला खात्री आहे.'



यौ व न !

श ला का

जुलै महिन्यातील धो-धो पावसाचा दिवस होता तो. साहजिकच वर्गात विद्यार्थिनींची संख्या कमी होती. मी वर्गात गेले तर आनंदी-आनंद, हास्य-विनोद, थट्टा-मस्करी हयांमुळे, असलेल्या थोडयाच मुलींनी वर्ग डोक्यावर घेतला होता. साहजिकच त्यांच्या हास्यविनोदात सहभागी होत मी एकंदर गोंधळण्याचे कारण शोधले, तर वर्गातील एका हुशार मुलीचे लग्न ठरले होते, व तिच्या भोवती मैत्रिणींचा गराडा पडला होता, 'हे कसे ग, हे कसे... अगदी लाजून मुरकून चालू असावे.

वर्ग काहीसा स्थिरस्थावर झाल्यावर मी म्हटले, 'खरं तर आपली परिस्थिती ही एका डोळयात आसू व एका डोळयात हासू अशीच आहे. शलाकाचं लग्न ठरलं ही आनंदाची गोष्ट पण ती, बी. ए. चा अभ्यास थांबवेल, आपला वर्ग सोडून नागपूरला सासरी जाणार ही दुःखाची गोष्ट !' त्यावर शलाका एकदम सरसावून उभी राहिली व म्हणाली, 'नाही बाई, असं का म्हणता ? लग्न झालं तरी मी बी. ए. चं वर्ष पूर्ण करणार आहे. इतकी हाता-तोंडाशी अलेली डिग्री सोडून कशी द्यायची ?'

'अग, मला काय विचारतेस ? तुझ्या पतिराजांना विचार.' असे मी हसत-हसत म्हटल्यावर सगळा वर्ग हसू लागला. त्यामुळे पण शलाका अधिकच चेतावून म्हणाली, 'असं मी त्यांना आधीच सांगितलं आहे. तेच म्हणाले की,

शिक्षण पूर्ण करायचं, अर्धवट सोडायचं नाही म्हणून !'

'काय ग शलाका, पण मग लग्न इतक्या घाईने १५ ऑगस्टला का ? तुझी परीक्षा झाल्यावर उन्हाळ्याच्या सुट्टीत का नाही ?'

ती लाजून म्हणाली, 'सासूबाईंची तशी इच्छा आहे. शेखर-माझ मिस्टर त्यांचे एकुलते एक चिरंजीव आहेत. त्यामुळे कुणालाच त्यांचं मन मोडता आलं नाही !'

'सासूबाईंची इच्छा !' ह्या विधानावर माझं मन काहीसे चमकले. परंतु वर्गात जास्त चर्चा नको म्हणून विषयांतर करून अभ्यासाकडे वळले. हळूवार नाजूक वातावरणात वावरणाऱ्या, शलाकाला गाठून बोलते करावे, व्यवहाराची थोडीशी तरी जाणीव द्यावी अशी माझी फार इच्छा होती. सासूबाईंची इच्छा जरूर पूर्ण करावी पण त्यामुळं फार मोठं नुकसान होणार असेल, आपल्या इच्छेच्या पूर्णत: विरोधी वर्तन करणार असले तर सासुबाईंच्या इच्छेला नकार देण्याचा कणखरपणाही ह्या तरुणींच्यात असणं आवश्यक आहे. परंतु त्या दिवसानंतर लग्नाची तयारी, केळवणे, रुखवत करणे ह्यामुळे कॉलेजला यायला शलाकाला फारसा वेळच झाला नाही. जेमतेम प्रॅक्टिकल-पुरती किंवा जमेल तो एखादा तास साधण्याच्या उद्देशाने ती कॉलेजला येत असे. ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात आमंत्रणपत्रिका घेऊन आली तेव्हा म्हणाली, 'बाई, माझी प्रॅक्टिकल्स तेवढी करून घ्याल ना ? कारण नागपूर-पुणे अंतरच इतकं आहे की कितीही मी लगेच यायचं म्हटलं तरी काही तास माझे बुडणारच आहेत.'

'निश्चित पुरे करून घेईन. तू निश्चित रहा !' असे माझ्याकडून आश्वासन मिळाल्यावर ती आनंदाने परत गेली.

विवाहानंतर ती नागपूरला गेली, ती माहेरची मंगळागौर उरकूनच. त्यानंतर तिच्या मैत्रिणी सांगत की, 'आता सासरची मंगळागौर करून ती परत येणार आहे.' प्रत्यक्षात मात्र ती दिवाळीची सुट्टी संपल्यावर दुसऱ्या सत्रातच कॉलेजच्या कॉरिडॉरमधे दिसली. साहजिकच 'काय कसं काय ?' म्हणून मी जुजबी चौकशी केली. परंतु तिचा हिरमुसला चेहरा मी पाहिला आणि म्हटलं, 'चल, आपल्या विभागात जाऊ.' विभागात गेल्यावर पहिल्यांदा तिने आपल्या गंगा-यमुनांना मोकळी वाट करून दिली. काहीशी शांत

झाल्यावर मग बोलू लागली, 'काय सांगू बाई तुम्हाला ? सारखं मला तुमचं त्या दिवशीचं वाक्य आठवतं.'

'कोणतं ग ?'

'मी कॉलेज सोडणार म्हणून ! लग्नाच्या आधी शिक्षण पूर्ण केले पाहिजे असे बजावून सांगणारा माझा नवरा लग्नानंतर एकदम गप्प की ! सासूबाई म्हणत एकटीने एवढ्या लांबचा प्रवास करायचा नाही. तो सोडवायला येईल तेव्हाच जायचं. लग्नाच्या वेळी महिनाभर रजा घेतलेली असल्यामुळे त्याला नंतर रजा मिळत नव्हती. दिवाळीच्या वेळी तरी लवकर येऊन मैत्रिणींकडून वह्या घेऊन नोटस् लिहून काढीन असा विचार होता, तर पुन्हा त्यांची रजा व सासूबाईंचा सारखा उपदेश की, जावई माणसाने सासुरवाडीला जास्त रहायचं नाही. दिवाळीच्या वेळीच जा, दिवाळी झाल्यावरही लगेच त्यांच्या-बरोबरच परत यावं, अशी सासूबाईंची, हयांची इच्छा होती, पण मग बाबांबीच आग्रहपूर्वक सांगितले की, 'मी आणून पोहचविन. पण चार दिवस राहू देत इथं.' म्हणून ! आता कॉलेजमधे तरी येता आलं. पण मला नाही वाटत पुन्हा परीक्षेच्या वेळी येऊ देतील, राहू देतील. आई-बाबांना म्हटलं, तुम्ही तरी सांगा, तर म्हणतात, 'अग, बी. ए. चे काय एवढ घेऊन बसलीस ? पुन्हा केव्हाही होईल. पण एकदा सासरच्यांचीच मर्जी बिनसली की पोरी, काही खरं नाही. ती पहिली सांभाळ. शिवाय आता तू आमची राहिली नाहीस. त्यांची आहेस. आम्ही काहीही मधे बोलणार नाही.'

शलाकाची कात्रीत सापडल्यासारखी अवस्था पाहून मला गलबलून आले. त्याचबरोबर स्त्रीला तुच्छ, कमी लेखण्याची आपल्या समाजाची प्रवृत्ती पाहून रागही आला.

शलाकापेक्षा केवळ तीन वर्षांनी मोठा असलेला शेखर तिला सांभाळून आणू शकतो, पण शलाकाला एकटीला प्रवास करता येईल, यावर सासूचा विश्वास नाही. एकुलता एक मुलगा म्हणून त्याचे लग्न आईच्या इच्छेप्रमाणे व्हायला हवे. पण शलाका हुशार आहे, ती पहिल्या वर्गात बी. ए. व्हावी ही तिच्या वडिलांची इच्छा पूर्ण करण्याचे मात्र सासरच्यांवर बंधन नाही. नव्हे, त्याबद्दलचा खेद तिचे वडीलही मनात ठेवतात व सासूच्याच इच्छेला प्राधान्य देण्याचा उपदेश तिला करतात. यापेक्षा सहा महिने मुहूर्तच उशिरा धरला

असता, तर नागपूर-पुणे खेपा घालायचा प्रश्नच आला नसता. शलाकाचे शिक्षण एकमार्गी पूर्ण झाले असते. तिची, तिच्या वडिलांची इच्छा पूर्ण झाली असती. पण तेवढ्या कारणाने लग्न मोडले तर ? ही वधूपित्याची भीती व आपला अधिकार गाजविलाच पाहिजे, ही वरमाईची भूमिका. शेखर काय किंवा शलाका काय दोघेही लहानपणापासून परावलंबनाचे बाळकडू प्याय-लेले. आई-वडिलांच्या आज्ञेबाहेर कुणालाच जाता येत नाही. त्यांचा अपमान करावा, अनादर करावा असे नाही, परंतु स्वतंत्रपणे विचार करून जे योग्य वाटेल ते मांडायला व वेळप्रसंगी आग्रह धरायला काय हरकत आहे ? एकं-दर विचारांती मला तर शलाकाची फारच काळजी वाटू लागली. आईच्या आग्रहाखातर लवकर लग्न करणारा शेखर, बायकोला शिक्षण सोडायला लावणारा शेखर, पुढेही मुले होऊ देण्याबाबत, दोन मुलीच झाल्यावर बाय-कोच्या प्रकृतीला झेपत नसतानाही हाच शेखर तिसरा चान्स घेईल. आई मुलांचे अवाजवी लाड करत असताना, शलाका तर गप्प बसेलच पण शेखरही आईला कसे दुखवायचे म्हणून गप्प बसेल. शलाकाला सासूची व नवऱ्याची मर्जी संपादन कर म्हणून वडिलांची शिकवण म्हणजे ती तर सतत नमते घेणार-तिनेच कुठेही विरोध केला तर तिला आधार कुणाचा ? वडिलांचा ? नाही. नवऱ्याचा ? नाही. म्हणजे हे तरुण, उमदे जोडपे फुलायच्या ऐवजी दडपणाखालीच जळून जायचं की काय ?

श शां क

'अग त्या शशांकचा ना नर्व्हस ब्रेकडाऊन झाला आहे.'

'होय ? कशामुळं ?'

'त्याला आय. आय. टी. ला प्रवेश मिळाला होता, पण अभ्यास झेपत नाही म्हणून तो सोडून आला. आता त्याला आपल्या येथील सरकारी इंजिनिअरींग कॉलेजलाही प्रवेश मिळत नाही. म्हणून ७००० रु. भरून खाजगी कॉलेजात प्रवेश घेतला. त्याचा मोठा भाऊही खाजगी कॉलेजातच

आहे. त्यामुळे हयाच्यासाठी आई-वडिलांना किती खर्च करावा लागल हे त्याच्या मनाला फार लागलं आहे म्हणे !'

'अग मग त्यात नर्व्हस ब्रेकडाऊन कसला आलाय ? तो डिप्रेस्ड झालाय. फार दडपण आलंय त्याच्या मनावर. आई-वडील जर सारखी दोन मुलांची तुलना करीत असतील तर त्याला वाईट वाटेलच.'

'नाही ग, आई-वडील फार चांगले आहेत स्वभावानं ! ते त्याला काही म्हणणार नाहीत.'

'ते काही सांगू नकोस. इतरांशी चांगले असले तरी मुलांशी तसेच वागतील असं नाही. कारण तिथे पालकांच्या भूमिकेतून त्यांच्या वेगळया अपेक्षा, जबाबदाऱ्या जागृत होतात. तिऱ्हाईताबाबत काहीच अपेक्षा नसतात, त्यामुळे अनेकदा आपल्याला काय करायचंय म्हणून व्यक्ती तिऱ्हाईत व्यक्तीच्या मनासारखं वागते व चांगुलपणा मिळवून जाते. सास्वासुनांची अशी कमी उदाहरणं आहेत का ? बाहेर समाजात दोघीही नावाजलेल्या आहेत. पण त्या दोघी मात्र परस्परांचे तोंड बघत नाहीत तर जोपर्यंत मुलगा शिकतो आहे, आई-वडिलांवर अवलंबून आहे, तोपर्यन्त तरी हे सहज स्वाभाविक आहे.

'शिवाय असं समज की, खरंच तुझ्या म्हणण्याप्रमाणे ते चांगले, सुजाण पालक आहेत. तें मुलाला हा आर्थिक फरक दाखवणार नाहीत, पण तीही माणसंच आहेत, हया त्याच्या फीमुळे त्यांना बराच चिमटा सोसावा लागणार असेल तर कुठेतरी, केंव्हातरी माणूस बोलून जातंच की ग ! आणि संवेदनाशील मुलाला तेवढंच टोचू शकेल.

'-आणि मला असं सांग की, त्याला आय. आय. टी. झेपलं नाही याचा अर्थ काय ? त्यांची तर प्रवेश परीक्षाच फार कठीण असते. त्यात निवड होणेच कठीण ना ? पण म्हणजे ज्यांची निवड झाली, ती मुलं तेथील अभ्यास करू शकली पाहिजेत ! त्यात न झेपण्यासारखं काय आहे ?'

'खरं सांगू का, झेपलं नाही हे कारण सांगायला ! त्याच्या आईलाच त्याचं दूर राहणं सहन होईना. तेथील रॅगिंग, मुंबईचे वातावरण वगैरे असंख्य शंका-कुशंका तिच्या मनात येत असत. त्यामुळे तो वारंवार अशी काही पत्रे लिही की, तो होमसिक झाला आणि परत आला.'

'हं ! म्हणजे बघ, त्याला डिप्रेशन यण्याचं दुहेरी कारण आहे. एक पैशाचं व दुसरं हे अपयशाचं. तसं काही अपयशाचं कारण नसताना त्याच्यावर कायमचा ठपका आला की, त्याला आय. आय. टी. चा अभ्यास जमला नाही, म्हणून तो परत आला. 'अंदरकी बात' तुझ्यासारख्या काही जवळच्यांनाच माहिती. बाकीचे केवळ त्याची कीव करणार व वाईट म्हणजे कीव करण्यासारखी परिस्थिती नसताना, कीव करणार. ती नको म्हणून जर तो खरं सांगायला गेला तरी समाज त्यालाच दोष देणार.'

'आई मायेनं, भावनिक होऊन पत्रं लिहिणारच, ती काय अशी मनावर घ्यायची ?' कुणीही त्या आईला म्हणणार नाही की, तू जरा धीर धरायचास, अशी पत्रं लिहायची नाहीस. पण माझ्या मते तर यात आईवडिलांचाच मुख्यत: दोष आहे. किंबहुना घरापासून पहिल्यांदा दूर गेलेल्या मुलाला उपदेशाचे, धीराचे चार शब्द लिहायचे की, नवीन वातावरणामुळं विचलित झालेलं त्याचं मन आणखी विचलित करायचं ?

हया शशांकवरून मला दुसऱ्या एका तरुण मुलाची आठवण होतेय. तो तर स्वत: मला धाक घालीत असे. तुम्ही मानसशास्त्राज्ञ आहात. लवकरात लवकर माझ्यावर उपाय करा. नाहीतर माझा नर्व्हस ब्रेकडाऊन होईल.

मी मनात म्हणत असे. नर्व्हस ब्रेकडाऊन ही संकल्पनाच मुळी काल्पनिक आहे. प्रत्यक्षात कुणाचाच होत नाही, पण त्याची बाजू समजण्यासाठी हे कटु सत्य दडपून ठेवावे लागते. चांगला इंजिनिअर झालेला मुलगा, एका फॅक्टरीत बडघा पगारावर नोकरी. घरी धाकटा भाऊ व आई. लग्न झालेली. दोन मुलं असलेली बहीण आपल्या घरी सुखात होती. हा मुलगा लहान असतानाच वडील आकस्मिकपणे हार्ट अॅटॅकने वारले. त्यांनी घेऊन ठेवलेल्या प्लॉटवर आईने मोठ्या हिमतीने त्यांच्या माघारी घर बांधले होते. स्वत. नोकरी करून मुलांचं शिक्षण, पालन-पोषणही केलं, घराचं कर्जही फेडलं: नोकरीला दोन वर्षं होईपर्यंत हया मुलाचं आईवर आतोनात प्रेम होतं आणि अचानकपणे हा आईला नावं का ठेवू लागला ? 'ही वाईट आहे. माझ्यावर तिनं कधीच आईसारखं प्रेम केलं नाही.' असं तो का म्हणू लागला कुणालाच कळेना. ती माऊली तर हबकूनच गेली.

त्या मुलाच्या मनातील स्वार्थी विचारांनी त्याला घेरलं व त्यामुळं हा नर्व्हस ब्रेकडाऊनचा धाक तो ज्याला त्याला घालू लागला. त्याच्या लग्नाच्या गोष्टी सुरू झाल्यावर त्याला धाकट्या भावाची लाज वाटू लागली. कारण तो सर्वसामान्यापेक्षा बुद्धीने कमी होता. त्याला एकट्याला हाकलता आलं नसतं म्हणून त्यानं आईशीच वैर धरलं की, आई त्याला घेऊन बाहेर पडेल व राजा-राणीला स्वत:च्या घरात आरामात राहता येईल.

मी त्याला म्हटलं की, 'मग तूच बाहेर पड, तुला मोठा पगार आहे. छोटीशी जागा घेणं कठीण आहे का ? घर आईचं आहे. वडिलांच्या माघारी तर तिचं आहेच शिवाय हे तर तिनं कष्टानं, हिमतीनं उभं केलं आहे. तू तिला घालवू शकत नाहीस.' इस्टेटीची लालसा असणाऱ्याला स्वत: बाहेर पडणं महागात पडू लागलं. त्याच्या मुख्य मुद्यालाच हात घातल्यावर त्याचा नर्व्हस ब्रेकडाऊन एकदम गायब झाला.

तुषार - रेखा

दिघ्यांचा तुषार बरींच वर्षे लग्नच करायला तयार होत नव्हता. एम. टेक्. झाला होता. नोकरी चांगली बडघा पगाराची लागली होती. घरात वडिलांची आई होती. तिची फार इच्छा पणतू पहावा, पण तुषार काही केल्या लग्नाला तयार होईना. शेवटी हो-नाही करताकरता तयार झाला. पण म्हणाला, 'मला बी. ए., बी. कॉम. झालेली मुलगी नको. स्वतंत्र व्यवसायातील हवी.' 'ठीक आहे. तुला हवी तशी बघ ?' लग्नाला तयार झाला यातच घरातल्यांना आनंद झाला. 'तुषार लग्न करतोय' ही बातमी वाऱ्यासारखी पसरली व वधूपित्यांची रीघ लागली. तुषारला पारंपारिक पद्धतीने चहा-पोहघांवर तावही मारायचा नव्हता.

त्यानं त्याच्या अटींमधे बसणाऱ्या दोन-चार मुलींची अनौपचारिक-रित्या व अनपेक्षितपणे गाठ घेतली व त्यातल्या आर्किटेक्ट रेखाशी विवाह करायचं ठरवलं. दोघांनाही परस्परांची पूर्ण ओळख झाल्याशिवाय विवाहबद्ध

व्हायचं नव्हतं व म्हणून किमान सहा महिने तरी विवाहाचा मूहूर्त धरायचा नाही, पण वेळप्रसंगी वर्षसुद्धा जाईल. तुषार-रेखा दोघांचेही आई-वडील फार हौशी होते. त्यांनी ठरविले तुषारच्या आजीच्या समाधानाखातर साखर-पुडा दणक्यात करू व त्यानुसार मोठा हॉल घेऊन दोन्हीकडची भरपूर माणसे बोलावून लग्नाच्या स्वागत संमारंभासारखा साखरपुडा केला.

त्यानंतर तुषार-रेखा बाहेर फिरायला जायचे, सिनेमाला जायचे. काही वेळा तुषारच्या घरी चार माणसात बोलत बसायचे तर कधी रेखाच्या घरी ! त्यानंतर तुषारच्या नोकरीच्या गावी धुळ्याला रेखा आपल्या धाकट्या बहिणीसह जाऊन राहिली. जवळच्या लोकांनी थट्टा केली, आधुनिक काळातही पाठराखीण लागते म्हणून पण उद्देश असा की त्याचे तेथील घर, वातावरण, त्याचे इतरांशी संबंध तिला पाहता येतील व तिच्या मनात काही शंका रहायला नको. मुलगी झाली म्हणून तिने कमीपणा का पत्करायचा ?

ठरल्या दिवशी रेखा धुळ्याहून परत आली, पण चार-सहा दिवस झाले तरी तुषारच्या आईला भेटायला गेली नाही. त्या वाट पहात होत्या हकीकत सांगायला येईल म्हणून ! पहिले ३-४ दिवस त्यांनी स्वत:ची समजूत घातली. प्रवासाचा थकवा असेल, तुंबलेली कामे पूर्ण करीत असेल, पण नंतर मात्र त्यांना रहावेना. त्या स्वत:च तिच्या घरी गेल्या. दार उघडा-यला आलेली तिची आई प्रसन्न चेहऱ्याने, मोकळेपणाने ' या ' पण म्हणाली नाही. खाली मान घालून आत चालू लागली. तशाच तुषारच्या आई त्यांच्या पाठोपाठ आत गेल्या. पण घरातील एकंदर वातावरण सुतकी पाहून त्या जराशा चरकल्याच. पण एकदम तरी कसं विचारायचं ' कोण ?' म्हणून.

त्यांनी, ' रेखा आली ना धुळ्याहून ?' अशीच सुरवात केली त्या-बरोबर रेखाच्या आईनं मानेनंच होकार दिला व त्यांच्या डोळ्यातून गंगा-यमुना सुरू झाल्या. तुषारच्या आई आणखीनच भांबावून म्हणाल्या, ' काही झालंय का तिला ?'

' काही नाही. अवदसा आठवली आहे ?'

' म्हणजे काय ? स्पष्ट सांगा बाई. मला तर काहीच समजेनासं झालं आहे.'

' ती म्हणते मला तुषारशी लग्न करायचं नाही.'

'हो ?' तुषारच्या आईला गले ४-६ दिवस रेखा भेटायला न आल्यामुळे आलेला मानसिक ताण, शिवाय आता हचा घरात पाऊल टाकल्यास पराकोटीला गेलेला मानसिक ताण त्यांच्या मनात अनेक शंका-कुशंका निर्माण करीत होता व त्यामुळे कळल्यावर काहीसे 'एवढंच ना ?' अशा भावाने त्यांच्या 'हो ?' हा प्रश्न आला व चक्रावण्याची पाळी रेखाच्या आईवर आली. त्यांना मोठा प्रश्न पडला होता. 'दिघ्यांच्या घरी जाऊन कशी सांगावित लेकीची मुक्ताफळे ? कळल्यावर किती रागावतील ती मंडळी, त्यांची समाजात बेअब्रू झाली म्हणून ?' पण मिसेस् दिघ्यांच्या 'हो ?' हचा प्रश्नाने त्यांनाही काहीसा दिलासा मिळाला. मिसेस् दिघे पुढे म्हणाल्या,

'आहे का रेखा घरात ? बोलवा बरं तिला बाहेर !' तुषारच्या आईचा आवाज ऐकून रेखा दारामागे उभी होतीच. आईने एक हाक मारताच ती बाहेर आली, पण नेहमीसारखी हसत-खेळत, प्रसन्न चेहऱ्याने नाही, तर रडून-रडून डोळे-चेहरा सुजलेला, केस नुकतेच सारखे केलेले असूनही बरेच विस्कटलेले. तुषारच्या आईने 'बस' म्हणताच, ती त्यांच्या शेजारी बसली.

'मी वाट पहात होते तुझी. आली नाहीस भेटायला ?'

'मी येणार होते भेटायला, पण आईनेच येऊ दिलं नाही.'

'उगाच काय काळं तोंड घऊन जायचंय भेटायला ? मी आई असून माझं ऐकत नाही, तुमचं काय ऐकणार ? रोज सर्व प्रकारे मी प्रयत्न करतेय तिचं मन वळविण्याचा, पण कार्टी आजतागायत तयार झाली नाही. आता मी उलटा विचार करू लागले होते की, आमच्या आणखी दोनचार माणसांना बोलावून हे सांगावे व तुमच्याकडं येऊन सत्य परिस्थिती सांगावी.' त्याबरोबर तुषारच्या आई निर्धारपूर्वक म्हणाल्या, 'नको. आधी कुणाशीही मला बोलायचे नाही. रेखालाच माझ्याकडं पाठवा. तिच्याशी मी आधी बोलेन आणि मगच इतरांशी बोलेन.'

दुसऱ्या दिवशी रेखा त्यांच्याकडं गेली तेव्हा आदल्या दिवशीपेक्षा खूपच उल्हासित, हसतमुख वाटत होती. धुळचाच्या हवापाण्याच्या, प्रवासाच्या गोष्टी करीत मिसेस दिघ्यांनी हळूहळू रेखाला बोलती केली. तुषारबरोबर कुठं कुठं बाहेर गेली, काय काय पाहिले वगैरे बारीकसारीक

चौकशी केली. तुषारच्या आईच्या चेहऱ्यावरचा धीरोदात्तपणा, वागण्या-बोलण्यातील शांतपणा, समंजसपणा रेखाला इतका आवडायचा व त्यामुळेच ती स्वतःच्या आईजवळ कधी बोलली नाही, इतक्या मोकळेपणाने तुषारच्या आईजवळ बोलू शकत असे. किंबहुना ह्या अडचणीच्या काळात त्याच आपल्याला समजावून घेतील, अशी तिला खात्री होती. बोलता बोलता मुख्य विचाराला हात लागला तेव्हा तुषारच्या आईनं रेखाला विचारलं, 'तुषार तिसरटपणानं वागला का? तुझा काही अपमान केला का? इतरांशी तुझी ओळख करून दिली की नाही? त्याचं घर अस्वच्छ होतं का? त्याच्या काही राहण्या-वागण्याच्या सवयी गलिच्छ किंवा तुला न आवडणाऱ्या होत्या का?' ह्या सगळ्या प्रश्नांना तिची नकारात्मक उत्तरे पाहून तुषारच्या आईल वाटले की ह्यापेक्षा काहीसे गंभीर कारण असावे म्हणून त्या म्हणाल्या; 'तुझ्या बहिणीशी जास्त सलगीनं वागला का? का आणखी कुठं त्याच्या चारित्र्याबद्दल तुला शंका आली?' ह्या प्रश्नांना 'छे! हो!' हे तिचे उत्तर ऐकून त्यांना प्रश्नच पडला, 'मग बिनसलं तरी कुठं?'

मग रेखाच बोलू लागली, 'तुषार फारच चांगला आहे स्वभावानं! कोणत्याच प्रकारे त्याच्यात नावं ठेवायला जागा नाही. मी नाही म्हटलं तरी माझ्या अगदी जवळच्या मैत्रिणींनासुद्धा त्याच्याबद्दल खात्रीनं सांगीन... त्याच्या लग्नाला आडकाठी होणार नाही. मला तो मित्र म्हणून चालेल, पण नवरा म्हणून नको.'

'असा काय फरक आहे ग तुझ्या दृष्टीने मित्र व नवरा यात? किंबहुना आता तो तुझा मित्रच आहे, होऊ घातलेला नवरा आहे.'

'हो... पण तो तसा होऊ घातलेल्या नवऱ्यासारखा काही वागला नाही.'

'म्हणजे ग कसं? तुझा हात हातात घेतला नाही, कधी खांद्यावर हात टाकला नाही? की कधी जवळही घेतले नाही!'

'हातात हात घेतलान्. पण पलिकडल्या खांद्यावर हात टाकून काहीसं जवळ ओढणं, तर कधीच केलंन् नाही आणि मावशी तुम्हो रागावणार नसाल

तर सांगते. माझी तर काहीशी अपेक्षा होती की त्यानं एखादेवेळी चोरून चुंबनही घ्यावं. हळूहळू आणखीही थोड पुढं जावं. पूर्ण ओळख झाल्यावर लग्न करायचं, असं तुषारच म्हणत होता की नाही ? त्यामुळे मला खात्री होती हेही अनुभव मिळतील म्हणून ' मिसेस दिघे गंभीर झालेल्या पाहून रेखा म्हणाली, ' मावशी रागावलात ना ? मला वाटलंच होतं.'

' नाही ग. फक्त तुझा राग कसा काढावा याचा विचार करते. तू केवढी अधीर झालीस ? रेखा, तुझा काहीसा हा अधीरेपणा आड आला आहे, असं वाटतंय. बरं मला आता असं सांग की तुझ्या मनातील हे विचार तू तुषारला कधी सांगितलेस का ? त्याची इच्छा विचारलीस का ?'

' हो. पण त्याने स्पष्ट नकार दिला व म्हणाला, ती सगळी मजा विवाहबंधनानंतरच आता फक्त एकमेकांच्या आवडीनिवडी, स्वभाव एवढंच जाणून घ्यायचं आणि ते स्पष्ट एकमेकांना विचारून. मला आवडीनिवडीची फक्त यादी गोळा करायची नाही. तर नेहमीच्या वातावरणात स्वाभाविकपणे वागत असताना आढळणारे गुणधर्म लक्षात घ्यायचे आहेत.'

मिसेस दिघ्यांचा ऊर एकीकडं अभिमानाने भरून आला. आपण दिलेले विचार आपल्या मुलाने विपरीत स्वरूपात ग्रहण केले नाहीत तर योग्य स्वरूपात स्वीकारले ' बरं, काय ग तुझ्या मनात ही कल्पनाच विकसित होण्याचं कारण सांगू शकशील का ?'

' अऽहं ! पण बरेच वर्षांपासून मला असं वाटते की, खरीखुरी ओळख झाल्यावरच लग्न करायचं. तुषारचे आणि माझे विचार जुळण्यासारखे वाटले म्हणूनच मी होकार दिला.'

' पण कुठं तुझी एखादी मोठी बहीण, वहिनी किंवा आणखी कुणी असं काही बोलली होती का ? व ते तुला आवडले... बरे वाटले असं झालं का ?'

' नाही बुवा !'

' बरं. हिंदी सिनेमे किती पाहतेस ?'

' थोडेसे.'

' खूप आवडतात का ?'

' खूप नाही पण आवड आहे.'

'अमेरिकन, ब्रिटिश कादंबऱ्या किती वाचल्या आहेत ?'

'बऱ्याच ... आणि हो मावशी, त्यांच्याकडं नसतं का डेटिंग ! तारखा ठरवायच्या, मैत्री वाढवायची व जो मुलगा आवडेल त्याच्याबरोबर शेवटी लग्न करायचं. मग हनीमूनला जायचं. किती छान आहे ! पायरी पायरीनं पुढं जायचं !'

'हो आणि त्याच्या पुढची पायरी लग्न मोडण्याचीही सहज येते.'

'म्हणून मी लग्न मोडतेय असं तुम्हाला वाटतेय का ?'


'नाही ग, तू अजून लग्न केलंस कुठं ? त्यादृष्टीने आधीच निर्णय केला हे तुला व त्याला दोघांनाही चांगले आहे.

'आता तुषार माझा मुलगा म्हणून सांगत नाही, पण त्याची भूमिका मला माहिती आहे म्हणून सांगते. आपल्याकडील पारंपारिक विवाहात आई-वडील लग्न ठरवतात व मुलं लग्न करतात. त्यांच्या परस्परांच्या आवडी-निवडी विचारातही घेतल्या जात नाहीत. वैवाहिक जीवनाला सुरुवात शारीरिक मीलनापासून होते. पण मनोमीलन झाले नाही तर शारीरिक मीलनही खऱ्याअर्थी होऊ शकत नाही. त्यातच समस्या निर्माण होतात. आपल्याकडं लग्न मोडत नाहीत, पण तसंच तडा गेलेल्या भांड्यासारखं बद्द आवाज करणारे जीवन ओढले जाते. ते तरी चांगलं आहे का ? म्हणून तुषारची अशी विचारसरणी आहे की, दोघांच्या स्वभावाची ओळख आधी झालो पाहिजे. परस्परांबद्दल ओढ वाटावी व मगच विचार करायचा. म्हणजे विशेषत: स्त्रीवर बळजबरी न होता शरीरमीलन होईल. आता तुझ्या म्हणण्याप्रमाणे तोही ओळख आधी करायला काय हरकत आहे ? मग त्यामधे तू पूर्वतयारी व मुख्य कार्य यांची सरमिसळ करीत आहेस. अग, कुणी पाहुणे येणार असतील तर आपण सगळी तयारी करून ठेवतो. पण पाहुणे यायच्या आधी सगळे पदार्थ करून टाकत नाही. केले तरी खाऊन टाकत नाही. काय हरकत आहे ? पाहुण्यांच्या बरोबर तरी खायचेय. मग थोडे आधी खाल्ले तर ? म्हणजे काहीतरी शिस्त नियम पाळतो. पारंपारिक गोष्टी धुडकावूनच लावायच्या म्हणजे त्यांच्यातील वाईट जे आहे तेवढेच टाळावयाचे. पण ते टाळीत असताना, इतर काही वाईट गोष्टी येणार नाहीत, याची दक्षता घ्यायला पाहिजे व जुन्यातले जे चांगले आहे ते तसंच टिकवलं पाहिजे. शिवाय अग विवाह

म्हणजे काय ? विवाहसमारंभ, रिसेप्शन जेवणावळी की अक्षता टाकणे ! हया सर्व सामाजिक क्रिया आहेत हे दोघे विवाहबद्ध होणार आहेत हे सांगण्यासाठी ! खरा विवाह म्हणजे शरीरमीलनच नाही का ? ते दोघांचे आहे... दोघांनाही त्यात आनंद व्हावा, केवळ पुरुषाने स्त्रीचा आनंद लुटावा ही पारंपारिक कल्पना तुषारला पसंत नाही म्हणून तर पूर्ण ओळख झाल्याशिवाय विवाह करायचा नाही, हा त्याचा ठाम विचार.

'बघ तू विचार कर. पुन्हा पाहिजे तेव्हा व पाहिजे तितके वेळा माझ्याशी बोलायला ये आणि अंतिम निर्णय घेण्यापूर्वी सांगोपांग विचार कर. सर्व शंकांचे निरसन करून घे आणि मगच सांग, तुषार तुझा केवळ मित्र की नवरा म्हणूनही चालेल ते ?'

एवढ्या समजुतीने सुनेच्या मनाचा विचार करणारी सासू विरळीच ! रेखाचं लग्न झालं हे सांगायला नकोच.



हे तर बालविवाहच !

बालविवाहाला व हुंड्याला कायद्याने जरी बंदी घातली असली तरी वेगवेगळ्या नावाखाली मागणारे मागतातच व देणारे देतातच आणि त्यातून अनेक भीषण प्रकारही घडलेले रोज ऐकायलाही येतात. विशेषतः विवाहासाठी उमेदवार असलेल्या मुलामुलींची विचारपद्धती, पालकांवरील परावलंबन, आपल्याबाबत होत असलेल्या व्यवहारांबाबतची अलिप्तता, पारंपारिकता मान्य करण्याची प्रवृत्ती आणि मुलींची भावी पतिराज व त्यांच्या घरच्या व्यक्तींबाबत समर्पणाची भूमिका पाहिली की वाटतं, हया मुली वयाने सज्ञान असल्या तरी त्यांचे विचार परिपक्व झालेले नाहीत. नव्हे– आपल्या समाजमान्य कौटुंबिक रचनेत त्यांना तशी संधीच दिली गेली नाही. त्यांना बालिकाच ठेवलं गेलं. या दृष्टीने त्यांचा विवाह हा बालविवाहच म्हणता येईल.

मुला–मुलींचा विवाह ही आई–वडिलांची जबाबदारी व अर्थातच त्यामुळे त्यांच्या मनाप्रमाणे ही घटना घडविली जाते. एखादा मुलगा असहाय्यपणे म्हणतो, 'मला वाटत होतं, हुंडा घेऊ नयें, हुंड्यासाठी वधुपक्षाला अडवू नये, विरोध करू नये पण त्यासाठी वडिलांना विरोध कसा करायचा ? त्यासाठी त्यांचा रोष कशाला पत्करायचा ?' एखादी मुलगी म्हणते, 'आपल्या आजूबाजूला सगळेच नवरेमुलगे असा हुंडा मागतात मग माझ्या नवऱ्याने मागितला तर कुठं बिघडलं ? पण वडिलांना न झेपणारा हुंडा द्यायला लावायचा हे योग्य आहे काय ? पैशानं विकत घेतलेले तथाकथित वैवाहिक सुख

दीर्घकाळ टिकेल काय ? वैवाहिक सुखाचा पाया काय असावा ? कशाला महत्त्व द्यावं ? आवाक्याबाहेरचा हुंडा जमवेपर्यंत निसर्ग थांबत नाही. त्यामुळे शारीरिक, सामाजिक, कौटुंबिक परिणाम काय होतील ? हे विचार तरुण-तरुणी करीत नाहीत नव्हे तसा विचार करण्याची पात्रता पालक त्यांच्यात निर्माण करीत नाहीत. आपल्या पारंपारिक कौटुंबिक रचनेत मुलांना स्वतंत्रपणे कोणत्याही समस्येचा विचार करू दिला जात नाही. त्यांना प्रत्येक बाबतीत दुय्यम स्थान दिले जाते व आईवडिलांवर अवलंबून रहायलाच शिकविले जाते. लग्न झालेला, दोन मुलांचा बाप असलेला आपला मुलगाही आपल्या शब्दाबाहेर नाही, ह्यातच आईवडिलांना कृतकृत्य वाटते, धन्य वाटते !

इं दि रा

बावीस वर्षांच्या इंदिरेने कुटुंब नियोजन केन्द्रावर जाऊन गर्भपात करवून घेतला. तिचा विवाह ठरून दीड वर्षं झालेलं होतं. आणखी दोन वर्षे तरी विवाह होणार नव्हता. कारण नवऱ्या मुलाने मागितलेले रोख पाच हजार रुपये व पाच तोळे सोनं जमविण्यासाठी तेवढा कालावधी आवश्यकच होता. घरात आई-वडील व धाकटी भावंडे. इंदिरेला कारखान्यात नोकरी होती. मात्र विवाह ठरल्यानंतर थोडयाच कालावधीत कारखान्याला टाळेबंदी झाल्यानं इंदिरेची नोकरी थांबली. तिच्याच नोकरीचा पैसा साठवून नवरदेवांना देणगी द्यावयाचा विचार केला होता. कारण तिचे वडील निवृत्त झालेले होते. त्यांना एवढी देणगी देणं शक्यच नव्हतं.

मात्र दर रविवार-शनिवारी इंदिरेचे भावी पतिराज खास तिला भेटायला मुंबईहून पुण्याला येत असत. दोघे विवाहबद्ध होणार आहेतच, म्हणून त्यांच्या भेटण्याला, बाहेर फिरायला जाण्याला, हॉटेल-सिनेमाला जाण्यास घरच्यांची पूर्ण अनुमती होती, नव्हे, प्रोत्साहनच होते. ह्या सर्व आनंदी-आनंदात निसर्गानेही आपलं कर्तव्य पार पाडल्यावर मात्र ह्या

तरुण-तरुणीला लाज वाटू लागली व गुपचूप कुटुंब नियोजन केन्द्राची वाट शोधून काढावी लागली.

इंदिरेला मी म्हटलं, 'एवढी पुंजी परवडत नाही तर मान्य का केली?' तिचे प्रांजळ उत्तर, 'चांगला नवरा मिळायला हवा असला तर एवढं द्यावंच लागतं. आजकाल सगळेच एवढं घेतात.'

'अग पण, तुझ्याजवळ आजच्या घटकेला काही नाही. नोकरी मिळाल्यावर तू घाकटघा मांवंडांचं करून उरलेला पैसा साठविणार. तो साठवीपर्यंत पाचच्या ऐवजी दहा वर्षे लागली तर कदाचित तो म्हणेल त्या वेळच्या पाच हजार रुपयांची किंमत आज दहा हजार रुपये आहे, तर काय करशील?'

'नाही बाई, ते काही असे पैशाच्या मागे लागलेले नाहीत! त्यांच्या आईवडिलांचाच हट्ट आहे. व त्यांना विरोध कसा करायचा? ते घरातून हाकलून देतील. लोक निंदा करतील.'

'अग, त्या निंदेला घाबरतेस आणि तोपर्यंत अशी वारंवार गर्भपात करायला आलीस तर लोक निंदा केल्याशिवाय राहाणार आहेत काय...? शिवाय तुझ्या प्रकृतीची हानी होईल, संसाराचं मातेरं होईल आणि तुला मूल हवंसं वाटेल तेव्हा कदाचित निसर्ग नकार देईल. ह्या गोष्टींचा काही विचार केला आहेस काय?' ती दिङमूढ झाली.

'त्यापेक्षा सासू-सासऱ्यांनी घरातून हाकलून दिलं तर तात्पुरती निंदा होईल. तू नोकरी करून त्यांना काय हवे ते पैसे देऊ शकशील. शिवाय योग्य वेळी विवाह झाल्यामुळे तुम्हाला वैवाहिक सुख अनुभवताना मानसिक दडपण येणार नाही. मुलांचे जन्म योग्यवेळी होतील, तुमची नोकरी चालू असेपर्यंत मुलांबाबतच्या जबाबदाऱ्या पूर्ण कराल.' तिला एकदम आशा वाटू लागली. विचार पटल्याची तिच्या चेहऱ्याने पावती दिली. आणि ती एकदम म्हणाली,

'बाई, असा एवढा विचार कधी आम्ही केलाच नाही. कुणी तसं सुचविलंही नाही. वडील माणसं सांगतील तसंच वागत गेलो. आता मग लवकरात लवकर लग्न करूनच तुम्हाला सांगायला येते.'

'एकटी नाही. दोघंही या.' हसत लाजत ती निघून गेली.

र ज नी

साधारणपणे इंदिरेच्याच वयाची ही एक रजनी. पण विचाराने ती पाच-सहा वर्षांचीच होती. एप्रिलमधे लग्न ठरलं व जुलै-ऑगस्टमधे तिने गर्भपात करून घेतला. जावयाने मागितलेल्या पैशाची व्यवस्था करण्यासाठी हिच्या वडिलांनी दिवाळीत विवाह करून देण्याचं ठरविलं होतं. मध्यंतरीच्या काळात तो अधून-मधून दुपारी रजनीच्या घरी येत असे. त्यावेळी घरी फक्त तिची एक वेडसर बहीण असे. बहिणीचा भावी पती आला आहे म्हटल्यावर तीही बाहेर निघून जात असे. त्यामुळे दोघांना पूर्ण स्वातंत्र्य, एकांत व मोकळीक मिळत असे. शिवाय रजनीला असे मनापासून वाटे की, त्याला 'नाही' कशाला म्हणायचं ? तो का कुणी परका आहे ? आपला ठरलेला नवराच ना तो ?' नवरा एकांतात असा भेटला की, दिवस राहतात हे माहीत होतं. परंतु तरीसुद्धा इतक्या लवकर दिवस राहतील असं वाटलं नाही. अशा तऱ्हेनं ही काही सर्वसाधारण माहिती मिळाल्यानंतर मी तिला काही प्रश्न विचारले. त्यांची तिनं दिलेली उत्तरं संवेदनक्षम मनाला अस्वस्थ करणारी आहेत.

'त्याने किती पैसे मागितले आहेत ?'

'माहीत नाही !'

'वडिलांना परवडतील की नाही हयाचा तू नको का विचार करायला ?'

'पण आता मुलीच्या सुखासाठी नको का त्यांना खर्च करायला ?'

'पैसा दिला की सुखी होशील हयाची खात्री आहे का तुला ?'

ती अवाक् झाली.

'विवाहानंतरही त्यानं तुला सांगितलं की वडिलांकडून हजार रुपये घेऊन ये ! तेव्हाही तू असंच म्हणणार का की, त्यांनी मागितल्यावर नाही कसं म्हणायचं आणि वडिलांनी तरी माझ्या सुखासाठी द्यायला नकोत का ? सुख म्हणजे काय चॉकलेट आहे का ? काही पैसे दिले की लगेच हातात पडतं ? आणि वडिलांच्या पैशाने चॉकलेट आणून खायला तरी तू इतकी

लहान आहेस का ?'

ती काहीच बोलली नाही.

'विवाहानंतर तर कितीतरी बाबतीत तुला विचार करावा लागेल ! मुलांच्या जन्मात अंतर ठेवणं, त्यांच्या प्रकृतीकडं लक्ष देणं, शिक्षणाकडं लक्ष ठेवणं, त्यांना योग्य शिस्त लावणं इ० अनेक बाबतीत तो म्हणेल तशीच तू वागणार का ? तुझा तू स्वतंत्र विचार करणार की नाही ? तुला स्वतंत्र अस्तित्व आहे ना ? तूही स्वतंत्रपणे विचार करावयास हवा. दोघांच्याही विचारातील फायदेतोटे, गुणदोष लक्षात घेऊन त्यावर चर्चा करून विचार-विनिमय करून त्या त्या वेळेस नेमके प्रश्न सोडवावयास हवेत.'

अर्थात एक गोष्ट निश्चित की, ज्या व्यक्तीचे वयाच्या वीस-बावीस वर्षांपर्यंत स्वत्व जोपासलंच गेलं नाही, किंबहुना ते अनेक प्रकारे दडपलंच गेलं आहे त्या व्यक्तीला हा पाचदहा मिनिटांचा सल्ला म्हणजे राखेच्या ढिगाऱ्यात दडलेला निखारा शोधून काढण्यासाठी मारलेली एकच फुंकर आहे. त्यामुळे काही लगेच निखारा फुलणार नाही. हे केवळ एक "मार्गदर्शन" आहे ! त्या व्यक्तीनं स्वत: त्या मार्गानं जाण्याचा प्रयत्न करणं, आजूबाजूच्यांनी तिला तसं प्रोत्साहन देणं हे नितांत आवश्यक आहे

प्रेम विवाह

हया दोन प्रातिनिधीक उदाहरणावरून एखाद्याला असं वाटेल की, हया पेक्षा प्रीतिविवाह चांगला ! दोघांचीही चांगली ओळख असते, एकमेकांचे गुणदोष माहीत असतात. ते मान्य करून ते विवाहाला तयार झालेले असतात. परंतु समाजात मात्र अशी अगणित उदाहरणं दिसतात की एकेकाळी दोघांचं एकमेकांवर इतकं प्रेम असतं की दोघांच्याही घरचा विरोध पत्करून पळून जाऊन दोघांनी विवाह केलेला असतो. परंतु विवाहानंतर लगेच रंग फिक्के व्हायला लागतात व पहिल्या दोनचार वर्षांतच दोघेजण केवळ लोकलज्जेस्तव एकत्र रहाणं चालू ठेवतात. अन्यथा मनं केव्हाच शेकडो कोस दूर

गेलेली असतात.

असंच आंतरजातीय विवाह केलेलं हे एक दांपत्य ! त्यांच्या अनेक वेळा मुलाखती घेणं आवश्यक होतं. पहिल्या मुलाखतीत मिळालेली माहिती फारच त्रोटक असूनही बोलकी आहे.

त्यांच्या विवाहाला सातआठ वर्षं झालेली होती. पहिल्या वर्षा-दीड वर्षांतच काही कारणाने त्याच्यावर ऑफिसने कोर्टात फिर्याद केली होती. त्या काळात मूल होऊ नये असं वाटलं म्हणून त्यानं लगेच स्वत:वर संततिप्रतिबंधक शस्त्रक्रिया करवून घेतली. आता कोर्टकेसमधून बाहेर पडल्यावर मूल हवंसं वाटलं म्हणून पुन्हा शस्त्रक्रिया करण्याच्या हेतूने दोघं कुटुंब नियोजन केंद्रात आली होती.

'पहिल्या एकदीड वर्षात संततिप्रतिबंधक काय उपाय योजलेत ?'

'काही नाही !'

'मग पत्नीला दिवस गेले नाहीत ?'

'एकदा गेले होते असं वाटलं. परंतु त्यावर तिनं काय उपाय केला ते माहिती नाही.'

'एकही मूल नसताना एकदम शस्त्रक्रिया का करून घेतली ? दुसरे काही मार्ग माहीत नव्हते काय ?'

'त्या डॉक्टरांनीच तसे सांगितले... !' (सोपे परंतु अविश्वसनीय उत्तर.)

त्याच्या पत्नीला बोलतं करायचा प्रयत्न करताच तिनं रडायलाच सुरवात केली. एकंदरीत हा आंतरजातीय प्रेमविवाह सुखकारक यशस्वी तर नाहीच झालेला. परंतु भलताच क्लेशकारक झालेला आहे. ती स्त्री विलक्षण दडपणाखाली दिवस घालवते आहे.

विवाहाचा प्रकार कुठलाही असे पुढल्या आयुष्यात दोघांनी एकमेकाला समजून घेणं एकमेकांसाठी त्याग करणं, एकमेकांच्या सुखासाठी झटणं, एकमेकांचा आदर करणं हचा सर्व गोष्टी अत्यंत आवश्यक असतात. त्याची जाणीव करून देण्यसाठी आपल्या समाजात दोन आघाडींवर प्रयत्न व्हायला हवेत. विवाहेच्छु तरुण-तरुणींना विवाह करताना निश्चितपणे कशाचा विचार करणे आवश्यक आहे, ते शिकवणे अगत्याचे आहे. तसेच नवविवाहित किंवा ज्यांच्यात

विवाहभेद होण्याची शक्यता आहे, अशांना योग्य मार्गदर्शन करून एकांगी विचार करणे सोडून दोन्ही अंगी वस्तुनिष्ठ विचार करून आपली समस्या जाणून घ्यायला व त्यानंतर सोडवायला शिकवले पाहिजे.

बालपणीच पायाभरणी

दुसरी आघाडी ही नवजात बालकापासून उघडायला हवी. कुटुंबात मुले मोठी होताना मुलीने सतत पडते घेणे, नमते घेणे व मुलाने सतत आक्रमक वर्तन करणे. तसेच मुलगा कुलदीपक म्हणून त्याचं अस्तित्व, विचार, वर्तन इ० ना अवास्तव महत्त्व देणं हया सर्व गोष्टी बदलल्या पाहिजेत. दोघांनाही व्यवती म्हणून समान वागणूक मिळणं आवश्यक आहे. शिवाय मुलांच्या समस्या त्यांच्या त्यांना सोडवायची संधी दिली पाहिजे. तशी त्यांची मनोवृत्ती, विचारप्रणाली लहानसहान प्रसंगातूनसुद्धा विकसित केली पाहिजे. उदा० बालकांच्या कपडयांची खरेदी, आईवडिलांच्या पसंतीने न करता त्याच्याच पसंतीनं करणं. सबंध दुकानासमोर त्याला उभा केला व त्याच्या पसंतीला आवाहन केलं तर हा सल्ला महागात जाईल. झगझगीत व पालकांच्या खिशाला न परवडणारा कपडा बालक निवडेल. परंतु आपल्या बजेटमधे बसतील असे समान किंमतीचे परंतु भिन्न फॅशनचे व भिन्न रंगाचे चार कपडे त्याच्यासमोर ठेवून अंतिम निवड त्याला करावयास सांगितली तर ? सुरुवातीपासून अशी संधी मिळाल्यास स्वतंत्र विचार करावयाची प्रवृत्ती त्याच्यात निर्माण होईल व दुसऱ्यांच्या स्वतंत्र विचारांना ही बालके मानही देऊ लागतील.

कॉलेजच्या उंबरठ्यावर

मुलाचा अभ्यासक्रमही आपण निवडून न देता त्याचा त्याला निवड-

ण्याची संधी द्यावी. हृद्याचा अर्थ त्याच्यावर सर्वस्वी सोडून आपण हरीहरी करावे असे नाही तर विविध उपलब्ध अभ्यासक्रमांची प्राथमिक माहिती –फायद्यातोट्यासहित– आपण करून घ्यावी, त्याला द्यावी व नंतर निवड त्याला करू द्यावी. आपली इच्छा जरूर व्यक्त करावी, परंतु लादू नये व 'आमच्या वेळी' ही मात्राही सारखी उगाळू नये.

शिवाय संसाररथाची दोन्ही चाके सारखी असतात याचा केवळ वेदोक्त विधान म्हणून उदोउदो करू नये तर ते आचरणात आणावे. दोघांनीही एकमेकांना समानतेने वागविले पाहिजे. कुणाही एकाला तुच्छ कमी लेखलेले मुलांच्या निदर्शनास आले तर मुलांसमोर योग्य आदर्श राहणार नाही. विशेषत: स्त्रीने कष्ट अपरंपार करावयाचे, परंतु तिला घरात किंमत शून्य अशी परिस्थिती असल्यास भावंडे खेळताना अगर भांडतानाही नकळतपणे भाऊ बहिणीवर वर्चस्व गाजवितो, हुकमत दाखवितो व भावही खातो. उलट, बहीण मात्र चरफडत का होईना, आपल्या स्त्रीजन्माला दोष देत–देत त्याचे ऐकते, नमते घेते.

एकंदरीत, केवळ कौटुंबिक रचनेत आमूलाग्र बदल करावयास पाहिजे, असा केवळ घोष करून काही प्राप्त परिस्थिती बदलणार नाही, तर ह्या दोनही आघाड्यांवर सतत प्रयत्नशील राहिल्यास काही दशकांनंतर सुधारणा दिसू लागेल, असं वाटतं.

लैं गि क स म स्या

श्या मा

श्यामा काळी सावळी, बांध्येसूद, लांबसडक केस, खेळात बक्षिसें मिळविणारी पण पी. डी. ला नापास झाली. त्याबरोबर आई-वडिलांनी ठरविलं की मोठ्या बहिणीबरोबर हिलाही स्थळं पहायला लागायचं. लगेच पहिले स्थळ श्यामचं सांगून आलं. श्यामनं श्यामालाच मागणी घातली. खरे तर श्यामची अट होती-गोरी, सुरेख मुलगी करायची. श्यामा सावळी, काहीशी काळघातच जमा होणारी पण तिचा नीटसपणा, तरतरीतपणा त्याला आवडला व त्यानं मागणी घातली. त्याच्या घरी पाठोपाठचे दोन भाऊ, एक बहीण व काहीशी वेळेपूर्वीच निवृत्ती घेऊन घरी बसलेले वडील. कारण-श्याम-त्यांचा मुलगा जेमतेम ग्रॅज्युएट होऊनही एका बडथा फॅक्टरीत नोकरीला लागला होता व सुरुवातीपासूनच चार अंकी पगार मिळवू लागला. शिवाय पत्नीच्या निधनानंतर त्यांनी संसाराचा गाडा ओढला होता. भाता मोठ्या मुलाचे ते काम-असे त्यांचे स्पष्ट मत होते. मात्र हया जबाबदारीच्या जाणिवेची ते इतर दोन मुलांकडून यत्किंचितही अपेक्षा करीत नव्हते. उलट धाकटया बहीण-भावंडांचे लाड, मोठा भाऊ या नात्याने श्यामने करावे अशी त्यांची स्पष्ट अपेक्षा होती.

लग्नाचा विचार मनात येतो न येतो तोच लग्न ठरलं, हया घटनेमुळं स्वत: श्यामा तर उल्हसित झाली होतीच, परंतु तिच्या आई-वडिलांनीही

हौसे मौजेने ठरविल्यापेक्षा दोन गोष्टी जास्तीच्या देऊन तिचं लग्न करून दिलं. श्यामच्या धाकट्या भावंडांचं श्यामाला थोडंफार करावं लागल ही कल्पना तिला व तिच्या आईवडिलांना होतीच. परंतु आईवडिलांचा सूज्ञ विचार असा की, 'अजून श्यामचे वडील आहेत. तरी त्यांनी आपल्या इतर मुलांसाठी काहीतरी तरतूद करून ठेवलीच असेल. थोडाफार पैसा श्यामला– त्यांच्या जावयाला खर्च करावा लागला तरी वावगं नाही. मोठा भाऊ म्हणून करायलाच पाहिजे.'

एक दिवस आईने श्यामाला जवळ बोलावून काहीशा धाकाच्याच शब्दात परंतु स्पष्ट जाणीव दिली, 'नवऱ्याच्या धाकट्या भावंडांचं करायला कुठंही कुचराई करू नकोस. कष्टानं काही माणूस मरत नाही. आणि खरा मोठेपणा मिळवायचा असला तर झीज ही तर सोसलीच पाहिजे. वेळप्रसंगी दोन पैसे खर्चायला लागले तरी कुरकुर करू नकोस.' श्यामानं आनंदानं या सर्व गोष्टींना रुकार दिला. परंतु उंबरठ्यावरचं माप ओलांडून ती घरात गेली आणि तिला फारच वेगळं चित्र दृष्टीस पडलं. सासऱ्यांजवळ दमडी नव्हती. अत्यंत निष्क्रीय व्यक्ती होती ती. धाकटे दीरही कमावत नव्हते. शिकत होते–परंतु पैसा वापरण्याची अक्कल नव्हती. मोठा भाऊ कष्ट करतोय, याची जाणीव नव्हती. उलट त्याच्या जिवावर मजा मारण्याची प्रवृत्ती होती. पैशाचा हिशोब विचारलेला तर आवडत नव्हता पण उलट भावाने पैसे आम्हाला पुरवायलाच पाहिजे, ते त्याचे कामच आहे व आमचा अधिकार आहे, अशी त्यांची मनोवृत्ती होती. मोठ्या भावाला पैसे देणे अशक्य झाले की, तो नकार देई. की, भाऊ धाकटे असूनही त्याला शिवीगाळीसह बोलत असत. फारच झाले तर लाथाबुक्क्यांनी तुडवतही असत. वेळप्रसंगी वडील त्यांना प्रोत्साहन देत.

नवी नवरी असताना श्यामा हे सर्व बघून हतबुद्धच होत असे. काही वेळा दिरांचा, सासऱ्यांचा राग येत असे व नवऱ्याची कीव वाटे. पुढे पुढे तिला नवऱ्याचा राग येऊ लागला. हा इतका कसा बावळट? घरातले दोन वेळचे जेवण सर्वस्वी त्याच्यावर अवलंबून असून तो इतका अपमान का बरं सहन करतो? काही वेळा रात्री ती श्यामला विश्वासात घेऊन शिकवू लागली, 'तू प्रतिकार कर. का म्हणून सहन करतोस? आपण घराबाहेर

पडलो तर आपण मजत राहू. पण ह्या चौघांना खायची पण भ्रांत पडेल. घरातील कर्ता पुरुष सर्वस्वी तू असून त्यांची दांडगाई का ऐकून घेतोस ?' पण पहिल्यापासून दडपणाखाली वावरलेल्या श्यामला काही बोलायचा धीर होईना. शेवटी न राहवून श्यामानं बोलायला सुरुवात केली. ती बोलली की, दिरांचे पित्त अधिक खवळायचे. घरात नवीन येऊन, आली आहे मोठी श्यामचा कैवार घेणारी, असं त्यांना वाटे. ते तिला बोलत. वेळप्रसंगी हाता-तील वस्तू फेकून मारीत. पोळचा करीत असली तर तिचा हात घट्ट धरून 'ठेवू तव्यावर, ठेवू तव्यावर' असा धाक घालीत. त्यांची पकड इतकी घट्ट असे की, श्यामा घाबरून जिवाच्या आकांताने किंचाळेच. दोनचार वेळा दिराने हातातील सुरी-चाकूच तिच्याकडे भिरकावला. लागला नाही तिला कधीच. पण इतका जवळ पडे की, लागला असता तर ? ही भीती तिला भेडसावून सोडी.

रात्री तेवढं श्याम व श्यामा जवळ येत असत आणि वैवाहिक सुखाचा आनंद लुटत असत. परंतु लवकरच श्यामाला दिवस गेले. घरातील शारीरिक व मानसिक ताणामुळे तिला फारच अशक्तपणा आला होता. प्रसू-तीच्या वेळीही त्रास झाला, पण मुलगा झाल्याने सर्व यातनांकडे दुर्लक्ष केले गेले. मात्र डॉक्टरांनी सांगितले की, हिला पुन्हा लवकर दिवस राहता कामा नये. त्यासाठी संततिप्रतिबंधक उपाय करविले. परंतु श्यामाची प्रकृती अशी नाजूक झाली की, तिला गोळ्या किंवा कॉपर टी कोणताच उपाय मानवला नाही.

मध्यंतरीच्या काळात जपता-जपताही तिला दिवस गेलेच. घरातील राडा उरकून दोन मुलांचे करणे जमणार नाही, म्हणून दोघांनी ठरवून समंजसपणे तिची एमटोपी करून घेतली. त्यामुळे तर श्यामाची शारीरिक प्रकृती खालावलीच पण मुख्य म्हणजे श्याम व श्यामात मानसिक दुरावा निर्माण होऊ लागला. आतापर्यंत दोघेही परस्परांच्या कुशीत विसावत होते. दिवसभरात न मिळणारा आधार, सुरक्षितता रात्री परस्परांच्या सहवासातूनच मिळवत होते. एम्. टी. पी. नंतर मात्र श्यामा धास्तावली. तिला परत दिवस राहण्याची भीती वाटे व त्यामुळे ती श्यामपासून दूर राहण्याचा प्रयत्न करू लागली.

असेच दिवस चालले होते. दिवसभर ताण-तणाव रात्री ते दूर करण्यासाठी दूर राहणे. एखाद्या दिवशी फारच असहय बेचैनी वाटली तर जवळ येणे. त्यावेळी कोणतेही उपाय योजण्याची दोघांचीही मनःस्थिती नसे. साहजिकच पुन्हा दिवस राहिले. परंतु तोपर्यंत मुलगा तीन-साडेतीन वर्षांचा होत होता. म्हणून एम. टी. पी. करायची नाही ठरविली. मुलगी झाली. पण मुलगी पाच-सहा महिन्यांची असताना पुन्हा दिवस राहिल्यावर एम. टी. पी. करावीच लागली. मध्यंतरीच्या काळात घरातील एकेक जबाबदारी कमी झालेली होती. म्हटलं तर राजा-राणी आनंदात राहू शकले असते. परंतु दोघांचेही मन इतके होरपळले होते की, श्यामाला तर ॲनिमियासारखे चिकट दुखणे लागले होते व श्यामला वाटे की आता तरी दोघे मिळून मजा करू.

काय व्हायचे माहीत नाही. केवळ श्यामाच्या विचाराने किंवा फार तर तिच्या पहिल्या स्पर्शानेच तो एकदम गळून जायचा. साहजिकच परस्परांवर चिडचिड करणं, रागावणे, कुरबुरी काढणे सुरू झाले. मुले मोठी होत होती तशी मुलांवरून रागावणे, हे एक निमित्त मिळत असे. काही वेळा मुलांवर वसवस करणं हेही सुरू झालं. शिवाय एकजण मुलांवर खेकसत असताना दुसऱ्याला वाटे, 'मुलांवर रागवायचं काय कारण आहे? उगाच माझ्यावरचा राग मुलांवर?' पण आलटून-पालटून दोघेही तेच करीत. अशीच आणखी एक दोन वर्षे गेली. त्यांचे वैवाहिक संबंध पूर्णतः बिघडल्यावर ते माझ्याकडे मार्गदर्शनार्थ आले.

हळूहळू त्यांचा पूर्वेइतिहास समजून घेऊन, त्यांच्या मूळ समस्या हया- आत्मविश्वासाचा अभाव, दहशत व त्यामुळे बिघडलेली प्रकृती व लैंगिक संबंध हया गोष्टी लक्षात घेऊन, हळुवारपणे त्यांच्याशी बोलायला सुरुवात केली. मुळात त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करणे हेच एक दीर्घकाळाचे काम झाले. एकीकडे परस्परांना कसा आत्मविश्वास द्या, आधी पुरेशी मने दुखावली गेली आहेत, आणखी आता दुखवू नका. परस्परांचो मने सांभाळा. घरात वातावरण आनंदी ठेवा म्हणजे मुलं चिडचिडी होणार नाहीत. त्यांचा अभ्यास घेऊन आपल्याला मनस्ताप करवून घ्यायचा व मुलांच्याही मनात अभ्यासाबद्दल नावड निर्माण करायची. त्यापेक्षा अभ्यास कसा करायचा ते त्यांना शिकवा पण त्यांचा त्यांना करू द्या. मुले म्हणून

हट्ट करणं, रडणं, माराम्या करणं हे सर्व स्वाभाविक आहे. त्यावरून स्वत:ची तब्बेत बिघडेपर्यंत मनस्ताप करवून घ्यायचा नाही. लाखो गोष्टी पण सुमारे तीन-चार वर्षे हे दांपत्य सातत्यानं येत राहिलं व सुधारणेची पुसटशी चिन्हे दिसू लागताच त्यांच्या व माझ्या आनंदाला पारावार राहिला नाही.

जो शी

गेल्या सात वर्षांच्या वैवाहिक जीवनात काही ना काही कारणामुळ लैंगिक सुख मिळालेले नाही व अजूनही पाच-सहा महिने मिळणार नाही. इतके दिवस कळ काढली पण आता अक्षरश: अशक्य आहे, तेव्हा बाहेरून कुठून घ्यायला काय हरकत आहे ? अशी बाळबोध विचारणा चाळीशीच्या श्री. जोशींनी केली. विवाहानंतर जेमतेम पहिली तीन वर्षं वैवाहिक सुख मिळाले मध्यंतरीच्या काळात एक मुलगी झाली. त्यानंतर वर्षभर श्री. जोशी बदलीच्या गावी होते. परत आल्यावर सहा महिने पत्नी प्रशिक्षणासाठी मुंबईला गेलेली होती. तेथून ती परत आल्यावर स्तनांमध्ये फार वेदना, सूज इ. तक्रारी चालू होत्या. त्यानंतर कर्करोगाचे निदान होऊन शस्त्रक्रिया करून एक स्तन काढून टाकले. त्यानंतर दोन-अडीच वर्षे अजिबात लैंगिक संबंध ठेवला नाही. परंतु त्यानंतर गेल्या सहा महिन्यांपर्यंत अधुनमधून संबंध चालू होता. सात वर्षांपैकी जवळपास निम्मा काळ वाया गेला व निम्म्या काळात संबंध आला. बदली, पत्नीचे शिक्षण, आजारपण, शस्त्रक्रिया, घर बांधणे इत्यादींमुळे स्वत: सतत मानसिक ताणाखाली व त्यामुळे श्री. जोशी असमाधानी आहेत असे त्यांचेच स्पष्ट मत.

एकंदर त्याच्या आयुष्यात अडचणी फार आल्या. बहिणाच्या लग्नासाठी स्वत:चं लग्न लांबविलं, तिच्या अंगावर कोड हो गोष्ट तिच्या व

स्वत:च्या दोघांच्याही विवाहात अडथळा करणारी ठरली. पुण्यासारख्या ठिकाणी टीव्हीएसची किती गर्दी दिसते. पण नेमका जोशींनाच अनुभव असा की, टीव्हीएसमध्ये पेट्रोल भरले व किक् मारल्याबरोबर टीव्हीएसने पेट घेतला.

स्वत:चे घर बांधायला सुरुवात केल्यावर, थोडयाच दिवसात रहायला जाणार अशी परिस्थिती असताना राहते घर पडले.

अशा प्रकारे हौशी, उत्साही, धडपडी व्यक्ती असून आता काहीच करावेसे वाटत नाही कशातच लक्ष नाही. वेळप्रसंगी कामातही लक्ष लागत नाही. म्हणूनच असे तीव्रपणे वाटते की, 'लैंगिक समाधान ही मूलभूत गरज आहे. ती पूर्ण झाल्याशिवाय कशातच राम वाटणार नाही. शिवाय तीनचार महिने जर ते पूर्णपणे मिळाले तर मी पुन्हा पूर्ववत होईन. लक्ष कामात लागू शकेल.'

'बायकोला त्रास देण्याची यत्किंचितही इच्छा नाही. संसार गुण्या-गोविंदाने करावयाचा आहे. वेश्येकडेही जायची इच्छा नाही. परतु एखादी गरजू विधवा, कुमारिका, परित्यक्ता असल्यास पाहिजे आहे. कुठेही ही बातमी लीक् होणार नाही, हयाची खात्री तशी काळजी घतली जाईल· गर्भारपण टाळण्यासाठी योग्य ती काळजी घेईन.'

'स्त्रिया पुरविणारी ही संस्था आहे असे वाटत असेल तर ती चुकीची कल्पना आहे. त्या अपेक्षेने आला असलात तर असेच परत जाऊ शकता. हा विचार योग्य का अयोग्य विचाराल, तर निसर्गत: अत्यंत योग्य, स्वाभाविक सल्ला घ्यायचा विचार केलात हे अत्यंत स्तुत्य. मनात आल्यावर करून मोकळे झाला नाहीत.' मी म्हटलं.

'तरीसुद्धा मानसशास्त्रीय दृष्टीने करणे योग्य नाही. व्यावहारिक दृष्टीने करणे अशक्य नाही. तुमच्या इच्छेप्रमाणे एखाद्या प्रौढ कुमारिकेशी, गरजू विधवेशी तुम्ही जमवू शकाल. परतु नतरच्या परिणामांचा काही विचार केलात ? तुम्हा दोघांमधील प्रेम, विश्वास सपेल. जरी तिला आत्ता कळले नाही तरी कळल्यावर तिटकारा राग नक्कीच येईल. तुमच्या मनात पत्नी-जवळ जाताना प्रतारणा केल्याची भावना येईल.

'तुमचे तुमच्या आईशी, मुलीशी सबध बिघडतील. एकंदर घरातील आनंदी वातावरण नाहीसे होईल.

'दुसरें असे की, तीन-चार महिन्यांच्या समाधानाची शिदोरी तुम्हाला आयुष्यभर पुरेल असे आता वाटत आहे. पण चार महिने पूर्ण होताना, 'आणखी एकच दिवस' असे नाही का वाटणार ? तसे किती दिवस वाढत जातील शेवटी दारूचा प्याला, अफूची गोळी व बाईची चटक हथा सर्व गोष्टी एकाच माळेचे मणी !

'गेली काही वर्षे तुम्ही जो काही त्याग केला आहेत, त्याचे तुम्हाला जे समाधान, आनंद आहे, पत्नीला जो आदर, अभिमान आहे, तो नाहीसा होईल.

'काही वर्षे तुम्हाला सुख मिळूनही समाधान नाही असे तुम्ही म्हणालात तुमच्या पत्नीलाही तसे वाटत नसेल का ? तिनं का मन मारल ? तर तिनं समजून घेतले की, तुम्ही घर बांधण्याच्या विवंचनेत आहात, तो मानसिक ताण उतरल्यावर तुम्ही मोकळेपणानं जवळ येऊ शकाल !

'तुम्हाला एखादं व्यंग आलं असतं तर तिनं ते सहन केलं नसतं का ? (ही गोष्ट पटतेय पण वळत नाही)

'एकंदर जीवनाकडे पाहण्याचा तुमचा दृष्टिकोनच नकारार्थी आहे. माझ्यावरच फार संकटे कोसळली, ही जी भावना आहे ती काहीशी सदोष आहे. बहिणीच्या लग्नासाठी खस्ता काढणे, घर बांधताना अडचणी येणे, विवाहानंतर पत्नीचे एखादे कठीण बाळंतपण किंवा आजारपण कोणत्या सामान्य माणसाच्या आयुष्यात येत नाही ? तुम्हीच त्याचा एवढा बाऊ का करता ? शिवाय वेश्येकडे न जाण्याचा तुमचा सद्हेतू असला तरी नाण्याच्या दुसऱ्या बाजूला भित्रेपणा आहे. स्वतःचा वरचष्मा राहण्यासाठी तुम्हाला एखादी गरजू विधवा किंवा प्रौढ कुमारिका हवी आहे, आणि बातमी लीक होणार नाही याची दक्षताही तुम्ही तिच्यासाठी घेईन म्हणताय, पण खरं तर ती तुम्ही स्वतःसाठीच घेणार आहात.'

यानंतर श्री. जोशी चांगलेच वरमले. गप्प बसून राहिले. त्यांची नकारार्थी वृत्ती बदलण्यासाठी काही उदाहरणे देऊन त्यांना परत पाठविले. एकाच बैठकीत काही त्यांची संपूर्ण वृत्ती बदलली असे म्हणता येणार नाही. परंतु नकारार्थी विचार मनात येऊ लागले की, ते त्याच्या दुसऱ्या बाजूचाही विचार करू लागले. तीन-चार बैठकींनंतर, काही महिन्यापुरेसे दुसऱ्या एखाद्या गरजू

स्त्रीकडून लैंगिक समाधान मिळवावयाचे व तिचेही समाधान करावयाचे, या विचारापासून ते परावृत्त झाले व त्यानंतर त्यांच्या सर्वसाधारण वृत्ती, बदलासाठी बैठकी चालू राहिल्या.

दे श पां डे

चाळीशीकडे झुकू लागलेले श्री. देशपांडे एकदा अत्यंत नर्व्हस मनस्थितीत आले. त्यांची तक्रार ही एका डॉक्टरांबद्दलची होती. चार वर्षांपूर्वी संतती नियमनाचे ऑपरेशन करून देणारे डॉक्टर आज उलटे ऑपरेशन करून द्या म्हटले तर करीत नाहीत. त्यावेळी मात्र म्हणत होते, 'ऑपरेशन केले म्हणून घाबरण्याचे कारण नाही. तुम्ही म्हणाल तेव्हा तुम्हाला हया शस्त्रक्रियेच्या बंधनातून मोकळे करून देऊ.'

त्यांचा राग शांत करून, हळूहळू त्यांच्याशी इकडच्या तिकडच्या गप्पा करून मुख्य विषयाला हात घातल्यावर फारच वेगळया स्वरूपाची कथा समोर आली.

श्री. देशपांडे यांचा विवाह पंधरा वर्षांपूर्वी झालेला. तीन मुली व एक मुलगा अशी चार अपत्ये पहिल्या दहा वर्षांत झाली. सुमारे चार वर्षांपूर्वी यापुढे अपत्यसंभव थांबावा म्हणून त्यांनी स्वत: ऑपरेशन करून घेतले. त्यानंतरही पतिपत्नीचे लैंगिक संबंध नेहमीप्रमाणेच चालू होते. परंतु गेल्या सहा महिन्यात शिश्न पुरेसे ताठ होईना व त्यामुळे पतिपत्नी दोघांनाही समाधान मिळेना. ही समस्या निर्माण झाली ती ऑपरेशनमुळेच अशी दोघांचीही प्रांजळ समजूत व त्यामुळे पुन्हा डॉक्टरांकडे गेले. डॉक्टरांनी विचारले, 'पुन्हा मूल हवे आहे का? मुलगा दगावला का? तसे नसेल तर बांधलेले बंध तोडण्याचे काहीही कारण नाही.'

'आम्हाला वैवाहिक सुख पूर्वीसारखे मिळत नाही.' असे भीत भीत त्यांनी वाक्य उच्चारले. पण 'शस्त्रक्रियेचा व त्याचा काहीही संबंध नाही.' असे बोलून डॉक्टरांनी 'पुढला कोण पेशंट आहे?' असे सिस्टरना विचारताच

श्री. व सौ. देशपांड्यांना त्यांची रजा घ्यावी लागली.

त्यानंतर त्यांची बालपणापासूनची सर्व माहिती विचारता असे लक्षात आले की, हया गृहस्थांचे वडील लहानपणी वारलेले. स्वत:चे घर होते, म्हणून आई कुठे त्यांच्या काका-मामांकडे रहायला गेली नाही, पण परिस्थितीमुळे काहीसा परस्वाधीनपणा आलाच. त्यात सुरुवातीपासूनच मोठा मुलगा अधिकार गाजवू लागला. अर्थात सर्वस्वी त्याला दोष देण्यात अर्थ नाही. पतिनिधनानंतर साहजिकच ती स्त्री स्वत: व इतर नातेवाईक, हितचिंतक मोठ्या मुलाला कर्ता पुरुष म्हणून, 'आई सांभाळ, भावाला सांभाळ' असा उपदेश करीत. साहजिकच त्याच्यातील अधिकारशाही अधिक फुलवली गेली. परंतु त्यामुळे धाकटा भाऊ सतत नमतं घेत गेला. तो अबोलपणानेच वागला.

तेरा-चौदा वर्षांपर्यंत ठीक आहे. परंतु पुढे धाकटा भाऊ वयात येऊ लागल्यावर, त्याला स्वत:चेही अस्तित्व महत्त्वाचे वाटू लागल्यावर, त्यालाही वाटे की, आपणही काही वेळा अधिकार गाजवावा, आईलाही वाटे की तोही माझाच दुसरा हात आहे, त्यालाही संधी मिळावी परंतु तोपर्यंत संपूर्ण सत्ता मोठ्या भावाच्या हातात गेलेली होती.

काही दिवसांनी भावाचे लग्न झाल्यावर तर दोघे मिळून सत्ता गाजवित. मोठ्या भावाच्या संसारात धाकट्या भावाला व आईला दुय्यम स्थान होते, ते तसेच राहिले. पुढे आईला वाटू लागले की, 'धाकट्याचेही लग्न करून द्यावे म्हणजे घराची दोघात सारखी वाटणी करून दिली की, आपले कर्तव्य संपले. आपल्या माघारी मोठ्या मुलाने धाकट्याला घर दिले नाही तर ! हया विवंचनेने तिने श्री. देशपांड्यांचे-धाकट्या मुलाचे-लग्न तुलनेने लवकर करून दिले. तरी घराची वाटणी होताना समान झालीच नाही. तोपर्यंत मोठ्या भावाला दोन मुले झालेली होती. त्यामुळे त्याला जागा जास्त लागणार होती. शिवाय आला-गेला, पै-पाहुणा हा मोठ्याकडेच जास्त येणार. त्यामुळे आठ खोल्यांच्या बंगल्याची विभागणी सहा व दोन अशी झाली. पुढे श्री. देशपांड्यांनाही मुले झाली पण त्यांची मुले लहानच होती व मोठ्या भावाच्या मुलांचे अभ्यास वरच्या वर्गातले म्हणून त्यांना जागा स्वतंत्र हवीच. एकंदरीत श्री. देशपांडे हे असे एक दडपलेले व्यक्तिमत्व होते. त्याचा 'स्व' फुलायला म्हणावा तसा वावच मिळाला नाही. साहजिकच न्यूनत्वाची भावना

प्रकर्षाने विकसित झाली.

गेल्या सहा महिन्यात बंगला कॉन्ट्रॅक्टरला विकून ओनरशिप फ्लॅट बांधायला परवानगी देण्यासंबंधीच्या घडामोडी चालू होत्या. कॉन्ट्रॅक्टवर दोन्ही भावांच्या सह्या घेतल्या, दोघांनाही एक-एक फ्लॅट मिळायचे ठरले होते. परंतु तोपर्यंत श्री देशपांडयांना काळजी होती की, आताही भाऊ आपल्याला सहा-दोन असाच हिस्सा देईल की, चार-चार असा देईल ? परंतु जाऊन विचारण्याची त्यांना हिम्मत नव्हती. किंवा सहा-दोन जरी दिला असता, तरी उगाच कशाला भावाभावात भांडण म्हणून श्री. व सौ. देशपांडे मूग गिळून बसले असते. परंतु सुदैवाने आता तसे झालेले नाही. ह्याच काळात ऑफीसमध्येही श्री. देशपांडे ह्यांची मानहानी होत होती. किंबहुना मानहानीचे प्रसंग विचारल्यावर असे जाणवले की, समोरच्या व्यक्तीने काही मुद्दाम त्यांचा अपमान केला असेल असे नाही, पण घरातील ह्या वातावरणाचा सातत्याने विचार करता करता श्री. देशपांडयांना असे वाटू लागले की, भोवतालचे सगळेच आपल्याला कस्पटासमान मानतात. आपण अगदीच नगण्य व्यक्ती आहोत.

या सर्वांवर विचार करून पुढल्या वेळी बोलू असे म्हणून श्री. देशपांडयांना निरोप दिला व पुढल्या वेळी सौ. नाही घेऊन या असे जाताजाता सांगितले.

चार दिवसांनी श्री. व सौ. देशपांडे आल्यानंतर प्रथमतःच त्यांच्या पुढे स्त्री व पुरुषाच्या जननेंद्रियांची रंगीत चित्रे ठेवली व त्यांचे बावरलेले चेहरे पाहून म्हटले, 'तुम्हाला ही शास्त्रीय माहिती देण्याचा आज विचार आहे.'

'आता आमच्या लग्नाला पंधरा वर्षे झाली, मुलेही झाली. आता कशासाठी हे शास्त्र ?'

'आजही त्याची गरज आहे.' असे म्हणून पुरुषाच्या अंडग्रंथी, सेमिनल व्हेसिकल प्रोस्टेट ग्लॅण्ड ! वीर्य म्हणजे काय, कुठे कुठे तयार होते, शिश्नाकड जाण्याचा त्याचा मार्ग इ. सर्व प्राथमिक माहिती दिल्यानंतर ऑपरेशन केले म्हणजे काय थांबविले व म्हणून ऑपरेशननंतरही स्त्री-पुरुषसंबंध कसा चालू राहतो, वीर्यपतनही पूर्वीप्रमाणेच होते पण तरीही ते जननक्षम का नसते; इ. सर्व समजावून सांगितले. ही सर्व लैंगिक क्रिया होण्यासाठी लैंगिकता

असावी लागते व ही लैंगिकता कोणत्याही अंतर्गत किंवा बाह्य लैंगिक इंद्रियात नसून व्यक्तीच्या मेन्दूत असते. (दोघांनीही स्तिमित होऊन पाहिले) म्हणूनच डॉक्टर तुम्हाला म्हणाले की, 'लैंगिक समाधान पूर्वीसारखे मिळत नसेल तर त्याचा ऑपरेशनशी काहीही संबंध नाही. मूल हवे असेल तरच बांधून टाकलेल्या ट्यूब्ज पुन्हा सोडायला हव्यात.'

चित्रे बाजूला ठेवून देत मी म्हटले, 'गेल्या सहा महिन्यात तुम्हाला घराबद्दलची जी चिंता होती, आपल्याला कमी हिस्सा मिळेल की काय ही भीती मनात होती. त्यामुळे तुमचा आत्मविश्वास कमी झाला होता. किंबहुना लहानपणापासूनच तो पुरेसा विकसित झालेला नाही. जो काही अल्पसा होता तोही हर्षा सतत विचाराने जवळपास नष्ट झाला आणि त्यामुळे पत्नी-जवळ गेल्यावरही हा आत्मविश्वासाचा अभाव तुमच्या वैवाहिक संबंधात आडकाठी करीत होता. साधा विचार करा- ऑपरेशनला चार वर्षे झाली व ही समस्या गेल्या सहा महिन्यातील आहे. आता तुमच्या घराचीही समस्या तुमच्या म्हणण्याप्रमाणेच सुटली आहे. त्यामुळे तुमचा आत्मविश्वास पुन्हा वाढू लागेल. शिवाय केव्हाही वागताना आपण स्वतः कोणत्याही बाबतीत कमी नाही मग का म्हणून इतरांच्या म्हणण्याप्रमाणे वागत सुटायचे? मोठ्या भावाचा योग्य तो आदर, मान जरूर राखा पण तुम्हीही काही लहान व जन्मक्रमाखेरीज इतर कोणत्याही बाबतीत कनिष्ठ नाही. चार वर्षांपूर्वी जे जे काही करू शकत होता ते ते तुम्ही आज निश्चितच करू शकाल. सारासार विचार करून निर्णय घेत चला व वेळप्रसंगी समोरच्या व्यक्तीला विरोध करायलाही घाबरू नका. सौ. देशपांडे, तुम्ही आजपर्यंत त्यांना साथ दिलीच आहेत, पण यापुढे असा विचार करा की, ते वाजवीपेक्षा जास्त नमते घेऊ लागले, तर त्यांना घेऊ देऊ नका व विरोध करायला प्रोत्साहन द्या, सामर्थ्य द्या.'

दोघांच्याही चेहऱ्यावर समाधान दिसत होते,

घरसोडणाऱ्या स्त्रिया

सौ. पटवर्धन

उंच, सडसडीत बांध्याच्या, काळ्या सावळ्या, नाकाडोळी नीटस अशा सौ. पटवर्धन मार्गदर्शनार्थ आल्या व त्यांनी आपले वय चाळीस सांगितले तर माझा विश्वासच बसेना. पंधरा वर्षांपूर्वी त्यांचा विवाह झाला. त्यांना एक चौदा वर्षांचा व दुसरा बारा वर्षांचा मुलगा आहे. सुमारे तीन वर्षांच्या ओळखीनंतर श्री. पटवर्धनांशी त्यांचा प्रेमविवाहच झाला होता, असे म्हणायला हरकत नाही. श्री. पटवर्धनांनी भारत-चीन युद्धात शॉर्ट सर्व्हिस कामिशन घेऊन सैनिकाची नोकरी केली होती. त्यानंतर पोलिसखात्यात कामाला होते व सध्या सांगलीजवळच्या गावात मामलेदार आहेत.

विवाहापूर्वीचा तीन वर्षे व नंतरची तीन वर्षे असा एकूण सहा वर्षांचा दोघांचा सहवास सुखाचा झाला. परंतु त्यानंतर मात्र हळूहळू लहान-सहान समस्या निर्माण होऊ लागल्या व दुरावा वाढतच गेला. मिलिटरी खात्यातील व पोलीस खात्यातील नोकरीमुळे श्री. पटवर्धनांना बाई-बाटलीची सवय होती, असे सौ. चे म्हणणे. आता त्यांना वाटते की, विवाहापूर्वीचे त्यांचे सौ. पटवर्धनांवरचे प्रेम व सलगी ही त्याच भावनेतून निर्माण झाली असावी. त्यानंतरही त्याच भ्रमरवृत्तीने एका फुलावरून दुसऱ्या फुलावर त्यांचे उडत जाणे चालू आहे. सुरवातीला केवळ बाहेर कुणाशी तरी संबंध होते. कित्येक दिवस सौ. पटवर्धनांना हे कळलेच नाही. त्यानंतर ऐकीव बातम्या. मग शंकास्पदपणे

पहाणे, विचारणे, वादविवाद, भांडणे. त्यानंतर श्री. पटवर्धनांचे हेतुपुरस्सर सौं. च्या नाकावर टिच्चून बाहेर जाणे. काही काळ सौं. नी मौन पाळले. जाऊ दे. आपल्या डोळ्यासमोर काही नाही ना ! आपल्याला तर काही कमी नाही किंवा आपल्या मुलांनाही कमी नाही. बाहेर काय त्याला शेण खायचे ते खाऊ दे. ऐकतच नाही तर काय करायचं ? तेवढ्यासाठी घर सोडून दूर राहणे तरी सुखकारक आहे का ? परंतु सौं. च्या या अभिवृत्तीने श्री. पटवर्धनांना रान मोकळे सापडले. एका ऐवजी जास्त फुलांवरही मुक्त विहार करता येऊ लागला.

कालांतराने श्री. पटवर्धनांनी एखाद्या मैत्रिणीला अधून-मधून घरी आणणेही सुरू केले. पुन्हा वादविवाद, भांडणे. फारच वाद झाला तर हातातील वस्तु श्रीं. नी सौं. च्या अंगावर भिरकावणेही सुरू झाले. पुन्हा सौंचा मूक विरोध सुरू झाला. मुलांसमोर तमाशा नको म्हणून मैत्रिणीबरोबर. श्री. येताना दिसले की, सौंनी स्वयंपाकघरातच बसून रहायचे, आपला काही संबंध नसल्यासारखे वागायचे. फारच झाले तर चहापाणी मुलांच्या हाती बाहेर पाठवून द्यायचे.

हया सर्व काळात दोन गोष्टी पूर्वीप्रमाणेच चालू होत्या. एक म्हणजे श्रीयुत व सौभाग्यवती यांचे लैंगिक संबंध. सौं. चा नमता स्वभाव, "जाऊ दे" प्रवृत्ती त्याही वेळी श्रींनी जोरात जवळ ओढल्यावर त्यांच्या आधीन करायला लावी. सुखोपभोगात कोणत्याही प्रकारची बंधने, अडथळे सहन करायची श्रीं. ना सवय नव्हती व त्यांना न पटणारेच होते. त्यामुळे सौं. ना वारंवार दिवस रहातच होते व सरकारच्या एम. टी. पी. च्या कायद्याचा जास्तीत जास्त फायदा त्या घेतच होत्या. दोन बाळंतपणाच्या व्यतिरिक्त सौ. पटवर्धनांची बरीच ॲबॉर्शन्स झाली हे कळल्यावर मी त्यांच्याकडे स्तिमित होऊन पहायलाच लागले. तरी हया बाईंची प्रकृती किती चांगली आहे ! आणि दुसरी गोष्ट म्हणजे श्रीयुतांना कधीही पैशांची ददात पडली नाही ! किंबहुना त्यांनी आतापर्यंत ज्या ज्या ठिकाणी काम केले त्या त्या ठिकाणी पैसा आपल्याकडे कसा ओढून घ्यायचा हे तंत्र त्यांनी फारच चांगले अवगत केले होते. त्यामुळे पत्नीला नेहमीप्रमाणे घरखर्चाला पैसा पुरवून, मैत्रिणींचे लाड करून शिवाय मुलांनाही विविध प्रकारे खूष ठेवणे चालूच होते.

नुकतेच श्रीं. नी आणखीही पुढचे पाऊल उचलले. एका परधर्मीय मैत्रिणीला घरातच रहायला आणून ठेवले. मग मात्र सौ. च्या सहनशक्तीची परिसीमा ओलांडली गेली. त्या घरातून बाहेर पडल्या, तरीसुद्धा श्रींनी दया दाखविली, 'तुला येथे रहायचे नसले तर दुसरी जागा घेऊन देतो. तिथे तुझे बिऱ्हाड थाटून देतो व इतके दिवस जसा इतर मैत्रिणींकडे अधूनमधून जात होतो तसा तुझ्याकडे नक्की येईन. पण आता ही सलमा सारखीच जवळ असावीशी वाटते म्हणून तिला घरातच आणून ठेवली.' पण सौ. ना एकाच गावात राहून नवऱ्याचा तो धिंगाणा पाहवलाही नसता, इतरांनी त्यांच्याबद्दल प्रदर्शित केलेली कीवही सहन झाली नसती किंवा निंदानालस्तीही ऐकण्याची कानांमधे शक्ती नव्हती, त्यामुळे त्यांनी पुण्याला आईच्या घरी आश्रय घेण्याचा निर्णय घेतला. शिवाय स्वावलंबी होण्याच्या दृष्टीने पुणे सोयीचे झाले असते.

दोन्ही मुलांसह पुण्यात आल्यावर काही महिन्यांनी खाजगी स्वरूपाचे काम तर त्यांना मिळाले. तोपर्यंत सांगलीहून तिघांच्या पोटाला पुरेसे होतील असे पैसे नेमाने येत होते. पण तरी ते नेहमीच्या ऐषारामाला पुरणारे नव्हते. शिवाय सौ. ना नोकरी मिळाल्याचे कळताच ते हळूहळू बंद झाले त्यामुळे मोठ्या मुलाला वाटू लागले आईपेक्षा बाबांजवळ राहणे जास्त फायद्याचे आहे व म्हणून तो वडिलांकडे निघून गेला. एका परीने सौ. ना बरे वाटले की, एकाची तरी आर्थिक जबाबदारी कमी झाली. तरी तो कसल्या वातावरणात वाढेल, तो स्वतः किती बिघडेल ही विवंचना त्यांना भेडसावत होतीच.

अनेक हितचिंतक सौ. पटवर्धनांना सांगत होते, 'घटस्फोट घेऊन टाक, कशाला अशा नवऱ्याच्या बंधनात राहतेस ?' पण सौ. ना ते पटत नव्हते. एक म्हणजे घटस्फोट घेण्यात आर्थिक फायदा काहीच नव्हता. त्या नोकरी करत होत्या म्हणजे त्यांना पोटगी मिळालीच नसती. शिवाय कोर्टाचा खर्च, मनःस्ताप झाला असता तो वेगळाच. शिवाय गाव सोडून दुसऱ्या गावी गेल्यावर- तेसुद्धा पुण्यासारख्या ठिकाणी- कसले आले आहे बंधन ? उलट घटस्फोट घेतला नाही व कधीतरी त्याला उपरती झाली तर तो परत येण्याची शक्यता. किमान मुलांना तरी काही भेटवस्तू पाठवीत राहील. सौ. पटवर्धनांना मुख्य

प्रश्न होता तो असा की मुलांना वळण कसे लावावे ? आई–वडील दोन ठिकाणी मुलांच्या समजत्या वयात– त्यामुळे मुलांवर संस्कार चांगले होणार नाहीत– पण त्यासाठी आपला अपमान करून घेऊन, मन मारून पुन्हा त्याच्याच घरी रहायला जायचे का ? मुलांच्या वाढीसाठी तरी ते उपयुक्त ठरेल का ?

काय उत्तर द्यावे ? हा विचारच मुळात अक्षम्य अशा उशिरा मनात आला आहे.

आजपर्यंत मुलांवर संस्कार व्हायचे राहिले आहेत काय ? ते झालेले संस्कार पूर्णपणे पुसून आता कोरी पाटी करून तीवर नवीन अक्षरे गिरवता येतील काय ? एका मानसशास्त्रज्ञाचे शब्द हया ठिकाणी आठवतात की.... 'किशोरावस्था म्हणजे केवळ नाटकाचा पडदा दूर होण्यासारखी अवस्था आहे. नाटकाची व्यक्तिवर्तनाची सर्व तयारी त्यापूर्वीच झालेली असते. त्यानंतर केवळ त्याचे प्रकटीकरण होऊ लागते.'

शु भा – शे ख र

शुभा व शेखर यांचा प्रेमविवाह झालेला असून विवाहाला सोळा वर्षे झाल्यानंतर पंधरा वर्षांची मुलगी दहावीला बसलेली असताना व तिच्यापेक्षा दोन वर्षांनी लहान असलेली दुसरी मुलगी दहावीच्या वर्गात आता गेलेली असताना दोघेजण घटस्फोट घेण्यासाठी त्यांच्या वकील मित्राकडे गेले तेंव्हा आश्चर्यच वाटले व लहानपणापासूनच्या त्याच्या काही आठवणी जागृत झाल्या.

लहानपणी शुभा व शेखर एकाच शाळेत शिकायला होते. आठवीनववी-पासून दोघांचे परस्परांशी संबंध वाढू लागले. मुख्य कारण दोघेही कविता करणारे. त्याचप्रमाणे धडे–कविता यावर विश्लेषणात्मक चर्चाही दोघांची चांगली रंगत असे. दहावीअकरावीत असताना तर शाळेतून बाहेर पडल्यावर अनेक वेळा दोघेही गप्पा मारत बसत. त्यानंतर हळूहळू गप्पा मारत मारत वाट चालू लागत. बहुतांशी वेळा वाट तिच्या घराकडची असे. काही वेळा

शुभा त्याला विचारी, 'तुला इतका उशीर झाला तर घरी कुणी रागवत नाही ?'

'कोण रागवणार ?'

शुभा गप्प बसे. तिला वाटे, मुलांचं बरं, सगळं स्वातंत्र्य असतं. सगळी बंधनं स्त्रीजन्मालाच असतात. शिवाय शेखरचे वडील गावातील बडे वकील होते. केवढा तरी मोठा बंगला होता त्यांचा. शेखरची तीन सख्खी भावंडे व सात चुलत भावंडे, दोन आत्या, काका अजून अविवाहित. असं सगळं एकत्रच कुटुंब होतं. शिवाय आला-गेला, पै-पाहुणा यांची गणतीच नाही. घरात नोकर-चाकर असले, धाकट्या जावा असल्या तरी आईला सर्वांवर देखरेख ठेवणे, त्यांच्याकडून कामे करवून घेणे व घरचे आणि दारचे या सर्वांचीच उठबस करणे यामुळे मुले कुठे आहेत, काय करताहेत या लहानसहान गोष्टींकडे पहा-यला वेळही मिळत नव्हता व तशी आवश्यकताही वाटत नव्हती. शेखरचे वडील तर सतत कोर्टात किंवा घरी असले तरी अशिलांच्या व फायली काग-दांच्या गराड्यात असायचे. मात्र त्यांचा घरावर वचक होता. कोणत्याही मुलाचा एखाद्या परीक्षेचा निकाल जरी खाली गेला तरी ते लगेच रागवत असत, शिक्षा करत असत. शेखर अभ्यासात हुशार असल्यामुळे ते त्याच्यावर खूष होतेच, पण त्याच्याबद्दल इतर काही कुरबुरी आल्या तरी ते दुर्लक्ष करत व वेळप्रसंगी तो म्हणेल तसे त्याच्याजवळ चार पैसे जास्तीचेही देत असत !

शुभाला तीन धाकट्या बहिणी व एक धाकटा भाऊ होता. वडील अत्यंत निष्क्रिय प्रवृत्तीचे होते. केवळ कंटाळा आला म्हणून एवढ्या जबाब-दाऱ्या असतानाही, शुभा नववीत असताना त्यांनी स्वत:ची नोकरी सोडून दिली व घरात नुसते कोपऱ्यात बसून रहात. शिवाय त्यांच्या अनेक सवयीही गलिच्छ व चीड आणणाऱ्या होत्या. घरातील वाढाळू मुलींच्यादेखत व त्यांच्या मैत्रिणींच्यादेखत ते कोपऱ्यातील मोरीत लघुशंकेला जात. शुभाने अनेकदा त्यांना सांगितले की, 'तुम्ही आम्हाला सांगा, आम्ही बाहेर जाऊ,' तरी ते ऐकत नसत. आईने काबाडकष्ट करून घर रेटण्याचा प्रयत्न केला, पण तिच्या एक-टीच्या कष्टाने पाच-सात जणांचे पोट भरणे कठीण होई. कसेही करून शुभाला मॅट्रिक केलंच पाहिजे. ती हुशार आहे. पुढे नोकरी करेल. पण तेही काही वेळा कठीण होई. शेखरचे येणेजाणे होतेच. अडीअडचणीला तो खिशात

असतील तेवढे पैसे काढून द्यायचा. त्याच्या दृष्टीने ती रक्कम अगदीच क्षुल्लक असली तरी शुभाच्या घरी त्या रकमेचा चांगलाच आधार होई. साहजिकच शुभाच्या घरी शेखर हवाहवासा झाला. त्याच्या घरी तो आला, नाही आला सारखेच होते. त्यामुळे शुभाच्या घरी तो जास्तीत जास्त राहू लागला. बारावी-नंतर शेखर मेडिकल कॉलेजला गेला. शुभा नोकरी करू लागली. दोघांची पूर्वीइतकी वारंवार गाठ पडेना. पण ओढ मात्र वाढत होती. शुभा नोकरीला लागली व आईची मदत असली तरी चार भावंडांचे शिक्षण व सात जणांचे पोट यामुळे तिचीही ओढाताण होऊ लागली. पण पुन्हा शेखर पाठीशी होताच ! आठवीपासून दोघांचे फुलत गेलेले प्रेम आता इतके वाढले की कॉलेजचे शेवटचे वर्ष पूर्ण करणे कठीण होऊ लागले. शेवटी कसेतरी पूर्ण करून लग्न करायचे ठरवले. क्लास जाणारच होता. पण किमान वर्ष जाऊ नये हा प्रयत्न ! परीक्षा संपली व दुसऱ्याच दिवशी दोघंजण तिच्या मावशीच्या गावी गेले व देवळात जाऊन एकमेकांना माळा घातल्या. कारण शेखरच्या घरी अशी ही गरिबाघरची मुलगी पटली नसती.

विवाह केला आणि शेखरचे घर पूर्णतः तुटले. बड्या घरचा मुलगा पण खिशात दमडी नाही, अशी परिस्थिती होऊ लागली. आताशी कुठे परीक्षा झाली होती. अजून निकाल लागायचा, त्याच्यापुढे इंटर्नशिप व्हायची व त्यानंतर स्वतःचा दवाखाना ... शक्यच नाही. नोकरी करायला हवी हे निश्चित ! एकदीड वर्ष तर शुभाच्या पगारालाच आणखी एका पोटाचे ओझे वाढले... खऱ्या अर्थाने शुभा मिळवण्यासाठी अजून एकदीड वर्षे थांबले पाहिजे अशी त्याने स्वतःची समजूत घेतली. त्यानंतर मात्र त्याला नागपूरला नोकरी मिळाली. तेथे तो गेला. शुभा स्वतःच्या नोकरीमुळे लगेच जाऊ शकली नाही. कारण माहेरची जबाबदारी सांभाळणं आवश्यक होते. शेवटी महिन्यातून एखादी खेप शेखरच घालू लागला. पण शुभा म्हणायची, 'एवढा कसा तुला धीर निघत नाही. नागपूर-बारामती अंतर काय कमी आहे का ? एवढा प्रवासखर्च दर महिन्याला कशाला करायचा ?' पण शेखर म्हणे की, 'महिन्याचे पंचवीस दिवस तुझ्याशिवाय कसे काढतो ते माझं मला माहीत आहे ! हे दोनतीन दिवस मला तुझा सहवास मिळाला तरच पुढले काही दिवस काढणं शक्य होतं.' सहा महिने असे गेल्यावर शुभाला नागपुरला नोकरी मिळ-

तेय म्हटल्यावर शेखरने तार करून शुभाला बोलावून घेतले. शुभा आली, पण धाकटचा बहिणीला घेऊन ! शेखर इकडे राजाराणीच्या संसाराची स्वप्ने रंगवू लागलेला असताना शुभाबरोबर धाकटी बहीण आलेली पाहून त्याच्या कपाळावर आठ्याच पडल्या. पण शुभाचं म्हणणं, ' दोघंही नोकरीवर जाणार घरात कोण करणार ? शिवाय तुला माहिती आहेच की, आधी अभ्यास व नंतर नोकरी यामुळं मला कधी घरात कामं करायची सवयही नाही !' पण शेखरला वाटले, दोघांचं असं काम तरी काय ? शिवाय तुला नसली तरी मला सवय आहे. मी बरेचसे आवरू लागलो असतो. अर्थात शुभाची बहीण आलेली होती तिला परत पाठवणे शक्य नव्हते. म्हणजे हे सर्व वादंग व्यर्थच होते.

शुभाची बहीण एकटी कशी झोपणार म्हणून तिघंही एकाच खोलीत झोपत. वेळप्रसंगी धाकटचा बहिणीला काही चमत्कारिक दिसायला नको म्हणून शुभा शेखरला बाहेर झोपायला सांगे. हळूहळू शेखरच्या असे लक्षात आले की, बहिणीला आणण्यात सोबत, मदत हे केवळ निमित्त आहे. अंतस्थ कारण तिचे पोट निभेल. तेवढाच आईचा भार कमी हा हेतू होता. म्हणून मग शेखर म्हणाला, ' तुझ्या पगाराचे सर्व पैसे आपण बारामतीला पाठवत जाऊ. सणावाराला, अडीअडचणीला माझ्या पगारातूनही जमेल तेवढी मदत करीत जाऊ. पण तू बहिणीला बारामतीला परत पाठवून दे.'

बहीण परत गेल्यावर तरी आपल्या दोघांच्या सुखात काहीही भौतिक अडचण नाही, हचा विचाराने शेखर सुखावला. परंतु तरीसुद्धा शुभाचे रात्री त्याला नकार देणं व शक्यतो दोघांनी दूर झोपण्यावर भर देणं चालूच होतं. आता मात्र शेखरचा संयम सुटू लागला, व काही वेळा तो बळजबरीने का होईना पण स्वतःची इच्छा पूर्ण करून घेऊ लागला. पण रात्रीची वादावादी; फणफण, वेळप्रसंगी दुसऱ्या दिवशीही दिवसभर धुसफूस चालू राही. शुभाचे म्हणणे एकच–

' मी तुला विवाहापूर्वी सांगितलं होतं, मला सेक्समध्य इंटरेस्ट नाही म्हणून. तेव्हा तू म्हणायचास, ' मलाही नाही.'

' अग पण माझी कल्पना की, विवाहापूर्वी करण्यात इंटरेस्ट नाही असं तुझं मत. त्याला माझीही अनुमती होती. म्हणून तू माझ्या कॉलेज

होस्टेलवर दोन दिवस, दोन रात्री राहिली होतीस, तरी मी कधी अविचार केला का ? पण आता आपण पतीपत्नी आहोत... आता काय हरकत आहे ?'

'इतर घरातून असं दिसतंच की, रात्री इच्छा असो-नसो, पुरुष स्त्रीवर सक्ती करीत असतोच. तू तरी इतर पुरुषांपेक्षा वेगळा असशील. अशी माझी कल्पना होती. आपला विवाह हा जैविक नसुन, बौद्धिक आहे आपल्या दोघांच्या साहित्यिक गप्पा रंगत असत, म्हणून मला तुझ्याबद्दल आकर्षण वाटले.'

'अग, एका तरुण मुलाबद्दल तुला-एका तरुणीला-आकर्षण वाटले यातच तुझी नैसर्गिक गरज सिद्ध झाली. निष्कारण ती का दाबतेस ?'

'नाही, मला ती गरज नाही.'

'अग, असं शक्यच नाही. माणसाचे लैंगिक वर्तन सीझनप्रमाण नसुन रीझनप्रमाणे असते हे मला मान्य आहे. पण नसतेच हे मला मान्य नाही... नसणाऱ्या लोकांचे प्रमाण फारच विरळ व ते वेगळे जाणवतात. तू काही तशी नाहीस. तुझ्या इच्छेप्रमाणे तू म्हणशील तेव्हा करायला मी तयार आहे. पण अजिबात कधीही नाही हे मात्र शक्य नाही व क्वचित प्रसंगी माझी फारच तीव्र इच्छा असली तर तुला माझी इच्छा पूर्णही करायला पाहिजे.'

ही समंजसपणाची बोलणी फार काळ टिकली नाहीत. दोघांच्यात मत-भेद, वादविवाद, कटुता, अबोला हे सर्व प्रकार होऊ लागले. तशातच पाठो-पाठ दोन बाळतपणे झाली म्हणून तर शुभा आणखीनच चिडली. तिला मूल नकोच होते. त्याचे घर तुटलेले. तिच्या आईला स्वतःचा संसार सावरताना नाकीनऊ येत होते. लेकीच्या संसारात मदतीला जाणे शक्यच नव्हते. शेवटी सकाळी बाहेर पडण्यापूर्वी बरीचशी कामे शेखर आवरून बाहेर पडत असे. अगदी मुलांचेसुद्धा. शुभाचे आणखी एक ठाम मत असे की, मुलींना सांभाळा-यला मोलेकरीण, आजीबाई ठेवायच्या नाहीत. त्यांचे वाईट संस्कार मुलींवर होतील. म्हणून ती मुलींना घरातच ठेवून बाहेरून कुलूप लावून नोकरीवर जात असे. भूक लागली की, प्राण्यालासुद्धा स्वतःचे अन्न स्वतःला शोधता येते. मानवी बाळालासुद्धा आलंच पाहिजे, असं तिचं प्रांजळ मत ! स्वच्छताही त्यांना हळूहळू आपोआप समजायला लागेल. मानवाला 'मन' नावाची चीज

असते हे तिच्या लेखी नव्हते व त्यामुळे आपल्या मुली काय किंवा नवरा काय यांच्याशी ती भावनारहितपणे वागत असे.

मुली मोठ्या होऊ लागल्या तसे त्यांचे संगोपन हें भांडणाला आणखी एक निमित्त मिळत असे. कालांतराने मुली मोठ्या होऊ लागल्या तशा दचकून आवाजाने जाग्य व्हायच्या. तो आवाज आई-बाबांच्याच भांडणाचा असे. लहान होत्या तोपर्यंत त्यांना कळत नव्हते की, आई-बाबा असे का रात्री-अपरात्री कडाकडा भांडतात. पण मोठ्या झाल्या तशा त्यांना तेही कळू लागले. शिवाय आई त्यांना 'पुरुष' नाटकासारखी पुस्तके वाचायला द्यायची की, कशी पुरुषांची जात वाईट असते. स्त्रियांकडं कशी हीन नजरेनं पाहते, बस-मध्ये, रेल्वेत किंवा आणखी कुठंही पुरुष कोणत्याही स्त्रीच्या समोर आला की आषिक नजरेनेच पाहतो व म्हणून पुरुषांना खच्ची करायला पाहिज. त्यांच्या बाबांनीही तिचा कसा विश्वासघात केला तेही ती सांगे.

मुली नववी-दहावीत गेल्यानंतर मात्र एक दिवस सहजपणे विचारून गेल्या की, 'आई, पण हे सगळं तू कसे काय सहन केलेस ? सुरुवातीलाच का नाही तोडून टाकलेस ?'

'अग, त्यावेळी माझा हात दगडाखाली होता.' मुलींना अर्थ कळला नाही. पण त्या गप्प बसल्या व शुभाच्या मनात विचार चालू राहिले.

'तुमच्या मावश्या-मामांचे शिक्षण, लग्न सगळे व्हायचे होते. तुमचे बाबा घरचे धनिक होते. आम्हाला मदत करीत. त्या मदतीला जागून मला त्यांच्याशी विवाहही करावा लागला व नंतर जरी मी विरोध केला तरी काही वेळा त्यांच्या म्हणण्याप्रमाणे वागावं लागलं, कारण नंतरही ते पैसे पुरवितच होते. आता मात्र माहेरच्या सर्व जबाबदाऱ्या उरकल्या आहेत आणि मलाही बरा पगार मिळतोय. वेळ आली तर स्वतंत्र रहायची तयारी आहे माझी, पण त्यांचा हा अन्याय सहन करणार नाही.'

त्यानंतर थोडेच दिवस गेले असतील. आई-बाबा नेहमीप्रमाणे भांडू लागले. मधे पडावे तरी पंचाईत. आपल्यालाच हात बसायचा. न पडावे तरी पहावेना. आजूबाजूचे लोक काय म्हणतील ही लाज वाटत होतीच म्हणून दोघीजणी गुपचूप मैत्रिणीकडे गेल्या. तासा दोन तासांनी घरी आल्या तर घराला कुलूप. शेजारची किल्ली घेऊन घरात गेल्या, काय आवरता येईल

येईल तेवढे विस्कटलेले घर आवरले. थोडंफार टेबलावर होतं ते खाल्ले, कारण व्यवस्थित स्वयंपाकही केलेला नसे. पण मुलींना त्याची आता सवय होती. रोजची वेळ झाली तरी दोघंही आले नाहीत. रात्री उशीरा बाबा घरी आले. ते म्हणाले, 'तुमची आई बॅग घेऊन निवून गेली. पुन्हा कधीही येणार नाही. पण तुम्ही काळजी करू नका. मी तुमचं सगळं व्यवस्थित करीन.'

त्यानंतर काही दिवसांनी शुभा-शेखरने घटस्फोटासाठी कायदेशीर पावले उचलायला सुरुवात केली.

त्यांना घटस्फोट मिळेलही पण त्याच्या मुलींवर झालेला परिणाम कसा पुसला जाणार? आपल्या भावंडांची, आईची जेवढी काळजी शुभाला वाटत होती तेवढीही आपल्या मुलींची वाटली नाही. आपल्या हट्टी स्वभावापायी तिनं समजूतदार, उदार पती आणि निष्पाप मुलींच्या आयुष्याशी खेळ केला.

सु नी ता

पंधरा वर्षांपूर्वीची गोष्ट. सुनीताचे वडील एका सरकारी कचेरीत कारकुनाचे काम करीत होते. सुनीता, तिचा एक लहान व एक मोठा भाऊ ही त्यांची अपत्ये. शिवाय त्यांची स्वत:ची दोन भावंडे घरात होती. आतापर्यंत त्यांची जबाबदारी सांभाळली होती आता त्यांचे लग्न करून दिले की, ते जबाबदारीतून मोकळे होणार होते. एकंदर परिस्थितीचा विचार करून त्यांनी सुनीताला मॅट्रिकनंतरच नोकरीला लागायला सांगितले एवढेच नव्हे तर स्वत:च्या ओळखीने एका प्रख्यात छापखान्यात रॅपिंगचं काम मिळवूनही दिले. अवघी सतरा-अठरा वर्षांची असलेली चुणचुणीत सुनीता उत्साहाने आणखी काय काय शिकायला मिळेल ते काम शिकत होती. टेलिफोन ऑपरेटरला जेवायला सुट्टी मिळावी, म्हणून तेवढा अर्धा तास तिचा बोर्ड सुनीता सांभाळत असे. सुरुवातीला अडचण आली. परंतु हळूहळू ती त्यात चांगलीच तर-

बेज झाली व नोकरीला लागल्यापासून सहा महिन्यात तिला टेलिफोन ऑपरेटची नोकरी मिळाली. त्याचवेळी सेल्स एक्झिक्युटिव्ह ऑफिसर म्हणून एका दक्षिण भारतीय व्यक्तीची नेमणूक तेथे झाली होती. त्याच्या जिभेवर अगदी साखर पेरलेली. तो सुनीताची वारंवार स्तुती करी. सुनीता त्यामुळे भाळून जात असे. दोघांना जेव्हा जेव्हा वेळ असे तेव्हा तेव्हा गप्पा मारायला टेलिफोन हे साधन हाताशी होतेच. पुढल्या सहा महिन्यांच्या आत सुनीता अगदी वेडावून गेली. एकदा तो कळवळून म्हणाला, 'मी हा असा काळाबिद्रा, कुरूप. मला ना कुणी नात्याचे ना गोत्याचे. माझ्याशाठी मुली सांगणार कोण नि पाहणार कोण ? तुझ्यासारखी गोरीगोमटी, चुणचुणीत मुलगी तर माझ्याशी लग्न करणे शक्यच नाही.' परंतु ह्याच शब्दांनी तिला आव्हान दिले. 'का नाही ? माझ्यामुळे जर एका भाबड्या व्यक्तीचे जीवन सुखी होणार असेल, तर मी निश्चितच त्याच्याशी लग्नाला तयार होईन' सुनीताने मनाशी तर निर्धार केला. पण वडील कुठे परवानगी देताहेत ? त्यांचे म्हणणे, 'एक वेळ मुसलमानाशी लग्न कर पण मद्राशाशी करू नकोस.' कारण त्यांच्या माहितीत दोन-तीन मद्रासी पुरुषांनी मुलींना फसविले होते. मुलगी ऐकण्याचे चिन्ह दिसेना तशी त्यांनी जशी तिला चटकन नोकरी लावून दिली होती तशीच चटकन बंदही केली व लांब एका फॅक्टरीत लावून दिली. परंतु तीही टेलिफोन ऑपरेटरचीच नोकरी असल्यामुळे सुनीता व श्री. अय्यर यांच्या गप्पा मारण्यात काहीही व्यत्यय आला नाही. बाहेर हिंडण्या-फिरण्याच्या सिनेमा-हॉटेलच्या वेळा फोनवर ठरतच होत्या व दोघेही त्यानुसार भेटतच होते ह्या फॅक्टरीत गेल्यास तीन महिन्यातच दोघांनी पळून जाऊन लग्न केले. समाजरीतीप्रमाणे सुनीताला माहेर तुटले. परंतु त्याचबरोबर दीड वर्षांनी पहिली मुलगी झाल्यावर आई आली व त्यानंतरच्या गर्भारपणात इतरही सगळे जवळचे नातेवाईक येऊ लागले. एकंदरीत विवाहानंतर चार वर्षांत माहेरशी संबंध पुन्हा पूर्ववत झाले.

परंतु गेल्या पंधरा वर्षांत तिच्या जीवनातील आर्थिक चढ-उतार व त्याला अनुसरून श्री. अय्यरांचे तिच्याशी वागणे याचाच तिच्यावर विशेष आघात झाला आहे. सुरुवातीला कारखान्याने दिलेल्या घरात सगळे भाड्याचे फर्निचर होते. हळूहळू सगळ्या वस्तू स्वतःच्या केल्या. इतकेच नव्हे तर घर,

गाडी व काही शेतीही केली. पहिल्या दहा वर्षांच्या काळात चांगलीच प्रगती होत गेली. यास महत्त्वाचे कारण म्हणजे श्री. अय्यरांनी फॅक्टरीतील नोकरी सोडली व त्यानंतर फिल्म लाईनमध्ये शिरले. निर्माता म्हणून. अर्थात धंदा म्हटला की, जसा नफा आला तसाच तोटाही आला. दहा वर्षांनंतर धंद्यात एकदम खोट आली व परिणामतः सहा महिन्यांच्या कालावधीत सगळं विकावं लागलं. शिवाय मुलींना हे दिसायला नको म्हणून हॉस्टेलवर ठेवले व स्वयंपाकाची भांडीकुंडी तेवढी एका मित्राच्या खोलीवर ठेवून उभयता तिच्या मावशीकडे रहायला गेले. पुन्हा सहा महिन्यात सगळे सावरले गेले. मुलींना घरी आणले. हळूहळू पुन्हा सर्व गोष्टी गोळा केल्या व पुन्हा पहिल्यासारखी बरकत आली.

परंतु या सर्व काळात त्याच्या वागण्यातील लहरीपणा, विक्षिप्तपणा, अरेरावी, हुकुमशाही या सर्व स्वभावगुणधर्मांचा तर तिला त्रास झालाच. लग्नाला दोन वर्षे झालेली असताना त्याच्याबद्दल मनात संशय निर्माण झाला व तो दिवसेदिवस बळावत गेला होता. सुरुवातीला मला कुणीही नाही म्हणणारा हा गृहस्थ लग्नाला दोन वर्षे झालेली असताना त्याच्या वडिलांची तार आली की, 'तुझी आई वारली. तू येऊन जा.' हयाने तार पाठवली, 'तुम्ही पेढे वाटा.' पुढे त्याच्याच बोलण्यातून खुलासा झाला की, त्याचा जन्म अनैतिक संबंधातून झाला होता. परतु लहान वयात माहेरच्यांना कट्टर विरोध करून त्याच्याशी प्रेमविवाह केला व त्याच्या प्रेमाचे व आर्थिक परिस्थितीचे ऊन-पावसाळे सहन करणे चालूच होते, त्यातच मुलेही होत होती. अगदी संबंध विकोपाला गेलेले असतानासुद्धा पहिल्या दोन मुली असताना आठ वर्षाच्या मधल्या विश्रांतीनंतरही सुनीताला दिवस गेलेच. या सर्व गोष्टीत तिने श्री. अय्यरांना कधीही विरोध केला नाही.

परंतु एकदा श्री. अय्यरांचे एक मित्र व श्री. अय्यर सपत्निक सिनेमाला गेले. या दोघात घटस्फोटाच्या गोष्टी चाललेल्या होत्या. त्या मित्राने सुनीताशी लघळपणा केला व तिने त्याला प्रोत्साहन दिले, हया म्हणण्यावरून श्री. अय्यर यांनी, तिने सिनेमाला नेसलेली साडी तिच्यासमोर जाळून टाकली, तेव्हा मात्र सुनीता चिरडीस आली व म्हणाली, आता हयापुढे काहीही सहन करणार नाही व एकत्रही राहणार नाही. घटस्फोटच घेणार हया निर्णयाला

आली.

सुनीताचा अपमान होताच तसा ! तिने आतापर्यंत केलेल्या सर्व त्यागावर पाणी तर फिरले होतेच शिवाय तिच्या चारित्र्याबद्दलचा सहन न होणारा संशय ! परंतु घटस्फोटाने प्रश्न सुटेल का ? तुम्ही सुखी व्हाल का ? घटस्फोटाने फक्त प्रश्नांचे स्वरूप पालटेल. प्रश्नांच्या संख्येत तर उलट वाढच होईल. याचा अर्थ तुम्ही अपमान सहन करीत आलात त्याचंच हे फळ आहे. सुरुवातीपासूनच विरोध केला असतात, तर ही वेळ आलीच नसती. अर्थात ' गतं न शोचयत् !' परंतु ह्यापुढेसुद्धा त्याने केलेल्या अपमानाबद्दल त्याला जबर शिक्षा करा. तशाच प्रकारचा संशय त्याच्याबद्दल घेऊन दाखवा. पण घटस्फोट घेणं म्हणजे ह्या परिस्थितीपासून दूर जाणं आहे. पळून जाण्याने प्रश्न सुटत नाही, तर अधिक क्लिष्ट होतो.

लोक काय म्हणतील ?

लता गोडबोले

एखाद्या नाटक-सिनेमात शोभावी अशी कथा लता गोडबोले यांच्या जीवनात घडली.

नगरसारख्या म्हटले तर शहर म्हटले तर खेडेगाव अशा गावात राहणाऱ्या लताबाई स्वत: शाळेत शिक्षिका, यजमान अध्यापक महाविद्यालयात प्राध्यापक. दोन मुली पाठोपाठच्या झालेल्या. त्यानंतर मुलासाठी प्रयत्न करायचे नाहीत, असा दोघांनीही सूज्ञपणे विचार केलेला व त्यानुसार लताबाईंनी ऑपरेशन करून घेतले होते. अनेक दांपत्यांशी हया दांपत्याची मैत्री होती. त्यातच लताबाईंच्या शाळेत त्यांना काहीसे सीनियर असलेले श्री. जोशी सरही आपल्या सौभाग्यवतींसह यांच्याकडे येत जात असत. सौ. जोशींचा शिक्षणक्षेत्राशी दूरान्वयाने सबंध होता. परंतु बाकीच्या तिघांचा तर प्रत्यक्ष संबंध होता. त्यामुळे चौघांच्या गप्पा चांगल्याच रंगत असत. जोशी दांपत्याला एक मुलगा व एक मुलगी. गोडबोल्यांच्या धाकटया मुलीएवढा त्यांचा मुलगा व त्यापेक्षा काहीशी लहान मुलगी.

उत्तम चाललेल्या हया संसाररथाला खीळ बसली ती, श्री. गोडबोल्यांचे हृदयविकाराने आकस्मितपणे निधन झाले तेव्हा ! सर्वांनाच जबरदस्त धक्का बसला. त्यातून हळूहळू सावरण्यासाठी लताबाईंना अनेक हितचिंतकांनी मदत केली. त्यात विशष सहभाग जोशी दांपत्याचा होता. श्री.

जोशी व लताबाई एकाच शाळेत असल्यामुळे रोज न चुकता गाठही पडत असे. साहजिक चौकशी केली जायचीच व आवश्यक वाटल्यास ते स्वत: एकटे किंवा पत्नीसह किंवा मुलांना पाठवून लताबाईंचो अडचण दूर करीत असत. अशीच दोन वर्षं गेली. लताबाईंना श्री. गोडबोल्यांची सतत आठवण होत असली तरी त्या आता बऱ्याच सावरल्या होत्या. पैशाचे व्यवहार सगळे आतापर्यंत उरकले होते.

परंतु त्यानंतर संकट आले जोशांच्या घरावर. त्यांच्या सौभाग्यवती सतत आजारी राहू लागल्या. डॉक्टरांनी निदान केले की, त्यांना नायफ्रायटिस झालेला आहे. किडनीचा विकार, त्यामुळे पाच वर्षे औषधपाणी, पथ्याचं खाणं-पिणं सगळं व्यवस्थित करूनही त्यांच्या प्रकृतीला उतार पडला नाही. परंतु त्यांच्या दुखण्याच्या काळात लताबाईंचे व त्यांच्या मुलींचे जोशांच्या घरी जाणं-येणं बरेच वाढले. एक तर आज इतके वर्षांची कौटुंबिक मैत्री व श्री. गोडबोले गेल्यानंतर आलेल्या संकटातून श्री. व सौ. जोशींनीच त्यांनाच प्रामुख्याने बाहेर काढले होते. त्याहीमुळे त्यांचे कर्तव्यच होते की, आता त्यांच्या अडचणीच्या वेळी त्यांना सर्वांपरीने मदत करावयाची. परंतु गोडबोले-जोशी यांच्या प्रयत्नांना यश आले नाही. दुखणे वाढतच गेले व त्यातच सौ. जोशींचा शेवट झाला.

श्री. जोशींची व त्यांच्या मुलांची विचारपूस करण्याची पाळी आता लताबाईंवर होती. त्यामुळे पाच वर्षांपूर्वी जी भूमिका श्री. जोशींनी घेतली होती, ती आता लताबाईंनी घेतली. एकमेकाच्या दु:खावर फुंकर घालणे त्यातून सहानुभव घेणे व परस्परांना बाहेर काढणे हे काम जोशी व गोडबोले कुटुंबियात विशेष जिव्हाळ्याने होऊ लागले. विशेषत: श्री. जोशी व लताबाई गेल्या बारा वर्षांच्या मैत्रीनंतर व दोघांमधेही आलेल्या एकाकीपणाच्या भावनेतून परस्परांच्या विशेष जवळ येऊ लागले. दोघांनाही ते जाणवू लागले. परंतु लताबाईंनी मनातल्या मनातच स्वत:ला दरडावले, 'एका विधवेच्या मनात असा विचार येणे योग्य आहे का? शिवाय कॉलेजमधे शिकणाऱ्या आपल्याला मुली आहेत. त्या काय म्हणतील? लोक काय म्हणतील? आणखी दोन-तीन वर्षांनी त्यांच्या लग्नाची वेळ आली व अजून आपण स्वत:मधेच गुंतलो आहोत.' वगैरे पारंपारिक विचारांचा पगडा असलेल्या,

लहान शहरात राहणाऱ्या कोणत्याही स्त्रीच्या (सुशिक्षितसुद्धा) मनात विचार यावेत ते सर्व त्यांच्या मनात येऊ लागले. श्री. जोशी मात्र पुरुषी धीटपणाने पुढे यायचे व म्हणायचे, ' लोक काय दोन्ही बाजूंनी बोलतात. त्यांच्याकडे कशाला लक्ष द्यायचे ? शिवाय आपण दोघेही चाळीस-पंचेचाळीस वयोगटातील आहोत. दोघांनाही नैसर्गिक इच्छा आहेत. ती दाबून दाबली जाणार नाही आणि मग लग्न न करता भेटत राहिलो तर समाजात जी निंदा होईल, ती लग्न करून घेण्यापेक्षा बरीच जास्त असते.'

' आणखी एक महत्त्वाचा मुद्दा असा की, तुमची ही चारही मुले आणखी पाच-सात वर्षांच्या काळात आपापली घरटी वसवतील. व मग तुम्ही दोघंही एकटे पडाल. तो एकटेपणा येऊ नये ह्यासाठी तरी तुम्हाला दोघांनाही जोडीदाराची आवश्यकता आहेत. नवीन जोडीदार शोधून सगळीच नव्याने ओळख करण्यापेक्षा, गेल्या दहा-बारा वर्षांच्या तुमच्या ओळखीच्या पायावर तुमचा हा नवा संसार नक्कीच चांगला होईल.' मी पुस्ती जोडली.

लोक काय म्हणतील, ही भीती लताबाईंना होतीच. त्यामुळे शाळेतून दोघे एकदम बाहेर पडल्यावर त्या कावऱ्याबावऱ्या होऊन सतत इकडेतिकडे पहात असत की कुणी, ओळखीची व्यक्ती आपल्याला पहात तर नाही ना ? दिसल्यास त्या लगेच चार पावले बाजूला जात.

' उलट अशा वेळी तुम्ही थांबून समोरची व्यक्ती टाळून जाऊ लागली तर तिला थांबवून श्री. जोशींशी ओळख करून द्या व लवकरच आम्ही दोघं विवाह करणार आहोत. योग्य वेळी तुम्हाला निमंत्रण पाठवूच. जरूर या.' असं सांगा. त्यामुळं समाजाचं तिरक्या नजरेनं पाहणं तर बंद होईलच. पण तुमच्याही मनात धाकधूक राहणार नाही. शिवाय त्यांना दुसरी भीती होती ती अशी की, आपल्याला पुन्हा दिवस राहतील काय ? त्यांच्या माहितीत एका बाईचे ऑपरेशन होऊनही तिला काही दिवसांनी दिवस गेले. तसेच आपल्याही बाबतीत होईल की काय ? व मुली लग्नाला आलेल्या असताना, स्वत:ला दिवस राहिले असते तर त्यांना फारच लाज वाटली असती. परंतु त्यासाठी विवाह करण्यापूर्वी वैद्यकीय तपासणी करून घेता येईल. त्या एका बाईसारखेच लताबाईंनाही अपयश येण्याची शक्यता असती तर तत्संबंधी योग्य काळजी वेळीच घेता आली असती.

आणखी एक गोष्ट त्यांना सुचविली. ती म्हणजे, दोघांनीही आपापल्या मुलांना विश्वासात घेऊन त्यांना कल्पना द्या. किंबहुना त्यांची परवानगी घ्या. मुले सूज्ञ आहेत. त्यांना कल्पना आलीच असेल. पण त्यांना न विचारता लग्न करून टाकल्याने त्यांना तो तुटकपणा वाटेल. त्यांच्यावर अविश्वास दाखविण्यासारखे होईल. त्यापेक्षा त्यांना विचारल्यास त्यांची केवळ परवानगीच नव्हे तर सक्रिय सहकार्यही मिळेल.

चार-सहा वेळा भेटून लताबाईंचा आत्मविश्वास वाढविण्याचेच काम प्रामुख्याने केले. त्यांच्या मनातील विचार अयोग्य, चुकीचा, असा काहीही नव्हता, तेव्हा उगाच "लोक काय म्हणतील" ही मनातील अनाठायी भीती दूर करण्याचेच प्रामुख्याने काम केल्यावर त्या विवाहाला तयार झाल्या व ह्या नाट्यचित्रमय गोष्टीचा शेवट झाला.

मे घ ना

महाराष्ट्रीय नव्हे, भारतीय समाजात, पारंपारिक विचारसरणीत दडपल्या गेलेल्या, स्वत:चे स्वतंत्र अस्तित्व गमावून बसलेल्या, अनेक मेघना दिसून येतात. वरकरणी त्यांचे जीवन सरळ, साधे, समस्यारहित! परंतु अनेक समस्या जीवनात निर्माण होऊनही त्या सोडविता न आल्याने जीवनच बोथट झालेल्या.

कोकणात राहणारी नववी, दहावीपर्यंत शिक्षण झालेली चार भांवंडं असलेली मेघना जेव्हा मॅट्रिकच झालेल्या परंतु स्वत:चे दुकान असलेल्या, घरदार असलेल्या मंदारची पत्नी व्हायचे ठरले, तेव्हा घरच्यांना केवढा आनंद! त्यांच्या दृष्टीने मेघनाने नशिबच काढले म्हणायचे! आणि त्यात मिठाचा खडा टाकायला नको म्हणून आदल्या वर्षी तिला झालेल्या टायफॉईडपासून दोन-तीन वेळा फिटस् आल्या होत्या ही गोष्ट सासरच्यांना सांगायला धीर झाला नाही. एक तर लग्न मोडेल ही भीती व दुसरे म्हणजे त्यावेळी डॉक्टर म्हणाले होते की, 'आता अशक्तपणाने फिट्स आल्या, कायम येतीलच असे

नाही.' त्यामुळे उगाच कशाला सांगून ठेवा, असेही आशावादी मनाला वाटे.

मात्र पुढे मंगळागौरीपर्यंत सगळे ठीक होते. मंगळागौरीचे रात्रभराचे जागरणाचे निमित्त होऊन दुसऱ्या दिवशी तिला फीट आली व सासरच्यांची मने विटायला सुरुवात झाली. मग तिच्या माहेरच्या गरिबीवरून बोलण, वेळेवर एखादी शंभर रुपांचीची नोट दिसेनाशी झाली, एखादा दागिना दिसेनासा झाला की, तो मेघनाने घेऊन माहेरी पाठविला असेल असाही संशय व्यक्त केला जाई. माहेरच्यांनी जर हिला कधी साडी घेतली तर त्याबद्दल कौतुक तर नाहीच, परंतु उलट, हिनेच आपल्या पैशांची आणली असेल, वडिलांच्या नावावर दाखवतेय, असा टोमणा मारला जाई. धाकटी सून, धाकटी जाऊ म्हणून नेहमीच कमी प्रतीची कामे करावी लागत. स्वयंपाकपाण्यात कधीही जाता येत नसे. अगदी स्वत:च्या नवऱ्याला गरम पोळी करून वाढाविशी वाटे तर तीही कधी वाढता येत नसे.

काही वेळा ती चिडून मंदारला स्वतंत्र बिऱ्हाड करण्याबद्दल म्हणत असे. परंतु काही झाले तरी घर न सोडण्याचा त्याचा पक्का निर्धार असे. त्यालाही आई-वडील बोलत असत, वेळेनुसार संशय घेत असत. पण त्याला त्याचे काही वाटत नसे. त्याला सवय होती.

बऱ्याच बारीक-सारीक गोष्टी मेघनाकडून कळल्यावर त्याला जाणवले की, असे लहान-मोठे प्रसंग तर जवळपास प्रत्येकाच्याच आयुष्यात येत असतात. त्या सर्व गोष्टी मनाला लावून घेऊन रडत बसलं तर हृयातून कधीच बाहेर पडता येणार नाही. शिवाय प्रत्येक प्रसंगालाही दुसरी बाजू असते. ती नको विचारात घ्यायला ?

मेघनाला स्वयंपाक-पाण्यात सासूबाई, जाऊबाई येऊ देत नाहीत, त्यात त्यांचा सद्हेतु असेल की, स्वयंपाक करताना हिला फीट आली तर अपघात होईल, तो होऊ नये यासाठी तिला धोकाविरहित कामे सांगतात. ती तिला हलकी वाटतात. अर्थात ती सांगताना तिला प्रेमाने, समजुतीने सांगितली तर तिला न्यूनत्व वाटणार नाही. परंतु सासरची मंडळी सांगतानाही तोऱ्यात सांगतात व सुना त्याचा अर्थ लावतानाही रंगीत चष्म्यातूनच पाहतात. त्यामुळ प्रत्येक बाबतीत राईचा पर्वतच केला जातो. हे टाळण्यासाठी प्रामुख्याने दोन गोष्टींची गरज आहे. सांगणाऱ्याने सरळ मनाने सांगावे. 'मी नको म्हटले तरी

तिला कसे कळले नाही ?' तिने द्यायला नको होते का ? ह्यामुळे फक्त मने कलुषितच होत जातात शिवाय सुनेनेही सतत दडपणाखाली राहून वावरू नये. 'त्यांनी नाही म्हटले तरी मी करायला पाहिजे का ...?' केले तरी त्याची किंमत नाही व नाही केले तरी मनात खंत...! म्हणजे काहीही करून समाधान मिळतच नाही...! व प्रत्येक प्रसंगाचा दूरान्वयाने का होईना विपरीतच अर्थ निघत राहतो ! शिवाय प्रत्येक व्यक्तीला मान्यतेची प्रेरणा असते, ती पूर्ण होणे आवश्यक असते. त्यासाठी प्रत्येक व्यक्तीने स्वतःच्या दिनक्रमात आपल्या छंदाच्या, आवडीच्या किंवा कर्तृत्वाला काहीसा तरी वाव मिळेल अशा प्रकारच्या छंदासाठी वेळ काढलाच पाहिजे. म्हणजे लहान-सहान प्रसंगात मन जास्त गुंतून राहणार नाही व त्यामुळे विषाद निर्माण होणार नाही.

मेघनाशी सासू-जावा यांनी समजून वागायला, बोलायला हवं तितक्याच तिच्या माहेरच्या माणसांच्याही तिच्या बाबतीत काही जबाबदाऱ्या आहेत हे विसरता येणार नाही. मुलीमध्ये काही व्यंग, विकृती, आजार असेल तर तो दडवून ठेवून लग्न कधीही जमवू नये. आजार : मग ते मानसिक असोत वा शारीरिक-लग्नानंतर आपोआप बरे होतील ही कल्पना पूर्णांशाने बरोबर नाही. त्यातून 'मेघना' सारख्याच समस्या निर्माण होतील. 'लोक काय म्हणतील ?' म्हणून दुःखाला आमंत्रण देण्यात काय अर्थ ?

मा या

डोहाळेजेवण, बारसे इ० चे बोलावणे येणे हे मध्यमवर्गीय स्त्रीच्या जीवनात इतके नेहमीच असते की, त्याचे अप्रूप तर नाहीच वाटत, उलट खरं सांगायचं तर, अनेकदा कटकट वाटते. कुठल्या कुठं लांब जाणं, रिक्षाचा खर्च, तास दोन तास वेळ खर्च करणं आणि वर शिवाय आहेर करणं. पण त्या दिवशी मायाच्या मुलीच्या बारशाचे बोलावणे आले व मला अत्यंत अभिमान वाटला. इतर सर्व कामे बाजूला सारून जावेसे वाटले असे हे बारसे.

सुमारे दोन वर्षांपूर्वी हीच माया माझ्याकडं अत्यंत संतापून आली व म्हणाली, 'मी आज संध्याकाळच्या एस. टी. ने कऱ्हाडला माहेरी जाते, पुन्हा कधीही न येण्यासाठी ! बास झाले–खूप ऐकले तुमचे. गेले सहा महिने... तुमच्या शब्दाप्रमाणे वागतेय काहीही उपयोग होत नाही. आता तुमचे काही एक ऐकणार नाही, आत्ताच्या आत्ता माहेरी जाणार व पुन्हा कधीही येणार नाही.'

'ठीक आहे. जाते म्हणतेस तर जा बापडी. मी तरी तुला अडविणारी कोण ? फक्त मला काही प्रश्न विचारायची परवानगी दे. उत्तरे तू दे किंवा नको देऊस.

'कऱ्हाडला गेल्यावर आई–वडील तुझे कसे स्वागत करतील ? नेहमी–सारखे हसून करतील का ? तू बुटकी, कमी शिकलेली म्हणून वयाच्या ३५ व्या वर्षापर्यंत तुझे लग्न जमले नाही. किती जोडे तुझ्या बाबांना झिजवावे लागले ? महत्प्रयासाने तुझे लग्न जमले. करून दिले व सहा महिन्यात तू परत आलीस म्हटल्यावर त्यांची प्रतिक्रिया काय होईल ? समजा त्यांनी तक्रार केली नाही. पण काय ग, तुझे वडील नुकतेच निवृत्त झालेले आहेत ना ? त्यांच्या पेन्शनीत त्या दोघांचे व धाकट्या भावाचे भागणे जरा कठीण आहे असे म्हणत होतीस ना ? आणि त्याचे शेवटचे वर्ष राहिले आहे. तोपर्यंत सगळ्यात मोठा भाऊ काही दिवस पैसे पाठविणार आहे ना ? काय ग तो तुझ्यासाठी पण जास्तीचे पसे पाठविल का ? बाकी हा प्रश्न दोन–तीन वर्षांचाच आहे. त्यानंतर धाकट्या भावाचे लग्न करायची वेळ येईल. घरात त्या दोघांव्यतिरिक्त तीन माणसे आहेत म्हटल्यावर, तो मुळी अटच घालेल की, मला नोकरी करणारी बायको पाहिजे. म्हणजे त्या दोघांच्या पगारात सगळा घरखर्च चालेल. शिवाय त्याच्या बायकोलाही किती बरं ना ? सासूबाई म्हाताऱ्या असल्या, त्यांच्याच्याने काही काम होत नसले तरी तरणीताठी नणंद घरात आहे सगळचा कामाला ! शिवाय लग्न होऊन सासरी जाण्याचाही प्रश्न नाही. तिनेच नवरा सोडला आहे. आता जाईल कुठं ? म्हणजे बरी आहे स्वयंपाकाला, धुणं–भांडी, निवडणं करायला. मुलांकडं पहायला आणि म्हाताऱ्या सासू–सासऱ्यांचीही शुश्रुषा करायला ! शिवाय ती दोघं नोकरी–वरून दमून–भागून आल्यावर त्यांना चहा–पोहे करून द्यायला ! हे सगळं नको म्हणून बाहेर पडलीस तू तर जाणार कुठं ? खाणार काय ? तोपर्यंत

तुझी चाळिशी उलटली असेल. जेमतेम मॅट्रिकपर्यंत पोहोचलेली तू. तुला नोकरी तरी कशाची मिळेल. मग घे हातात पोळपाट-लाटणे नि हिंड दारोदार. वयाच्या पंच्याहत्तर वर्षांपर्यंतसुद्धा. त्यापेक्षा आत्ताच जरा सबुरीने घे. कसेही असले तरी तुला आपल्या हक्काचे, नवऱ्याचे घर मिळाले आहे. तेथे रहा. तेथून तुला कोणीही जा तर म्हणू शकणारच नाही. पण तेथे राहण्यात तुझा स्वाभिमान आहे...मात्र आता माहेरी गेलीस तर लोक काय म्हणतील ?'

त्या दिवशी खूप बोलले मी मायाला. बराच वेळ बोलत होते. घडघाळाचे तर भान नाहीच राहिलें. पण मान खाली घालून 'मी जाते' म्हणणाऱ्या मायाला थांबविण्याचेही भान राहिले नाही. त्यानंतर पुन्हा दुसऱ्या दिवशी संध्याकाळी ती भेटेपर्यंत मात्र मीच बेचैन होते. शिवाय सारखे वाटे इतर काही मुलींना 'लोक काय म्हणतील ?' ही भीती असली तर मी त्यांची ती काढते. त्यांना सांगते, 'अग, लोकांची काय पर्वा करता ? लोक दोन्ही बाजूंनी बोलणारे असतात. तुम्ही जरा स्वतंत्रपणे विचार कराल की नाही ?' आपल्याला योग्य वाटेल ते कराल की नाही ? आणि मायाला मात्र नेमका 'लोक काय म्हणतील ?' हयाच गोष्टीचा मी धाक घातला होता.

त्याचे कारणच तसे होते. कसेही करून मायाला थांबवून घेणे आवश्यक होते...तिच्या वैवाहिक जीवनात काही प्रगती होण्याच्या दृष्टीने, तिचे माहेरी परत जाणे इष्ट ठरणार नव्हते. ती तिच्या घरी राहणे आवश्यक होते. शिवाय सतत एक पाऊल उंबऱ्याबाहेर ठेवून वागणाऱ्या मायाच्या जीवनातही काहीही फरक झाला नसता.

मायाचा नवरा मधुकर मॅट्रिकपर्यंत शिकलेला. एका खाजगी प्रेसमधे कामाला होता. लहानपणी त्याला मॅनेन्जायटीस झालेला होता. त्यामुळे बुद्धीने तो काहीसा मागासलेला होता. पण स्वभावाने, वागायला तो चांगला होता. लग्न करताना, त्याच्या वडील भावांनी ही गोष्ट लपवून ठेवली नाही... मायाच्या वडिलांना स्पष्टच सांगितले,

'तुम्हाला पाहिजे ती सर्व चौकशी करून मगच मुलगी द्या.' मायाच्या वडिलांनीसुद्धा कंटाळून मुलगी कुणाच्यातरी गळ्यात बांधली नाही. कुठंच जमत नाही, हा मुलगा हो म्हणतोय तर उरकून टाका, ही त्यांची भावना

नव्हती. त्यांनी डॉक्टरांकडं हया आजारपणाच्या पुढील सर्व परिणामांची चौकशी केली. त्याच्या प्रेसमधे चौकशी केली. तो कामाला अत्यंत सिन्सियर आहे, फारशा रजाही नसतात, म्हणजे तसा आजारी वगैरेही नसतो. शिवाय स्वभावाने सरळ, सालस आहे. कुणाच्या अध्यात नाही, मध्यात नाही असें त्याचे वागणे आहे. एकंदर विचार करता मायाच्या वडिलांना मुलगी त्याला देणं काही अयोग्य वाटले नाही व म्हणून लग्न लावून दिले.

लग्नानंतर मात्र तो मायाला अजिबात जवळ येऊ देईना. त्याला भीती वाटे. ही असे काय चमत्कारिक करतें, असे वाटे. दिवसभरातसुद्धा बायको ही केवळ नवऱ्याच्या अधिकाराची, हक्काची गोष्ट एवढेच वाटे व त्यानुसार तिच्यावर रागावणे, हक्क दाखविणे तेवढे करीत असे. इतके की मला दाट आमटी आवडते, तू तशीच केली पाहिजे व तूही तीच खाल्ली पाहिजे. दिवसभराचा हा जाचही सहन करायला माया तयार होती, जर त्याने रात्री सुख दिले असते तर ! पण ते काही जमेना. मायाला एक तर लग्नाची फार वाट पहावी लागली व तसा काही मागे उद्योग नसल्यामुळं मराठी कादंबऱ्या व हिंदी सिनेमे पाहून नवरा, सुहागरात इत्यादींबद्दल फारच काल्पनिक विश्वात ती भटकत होती व त्यामुळे तो अपेक्षाभंग तिला सहन होईना. तिची चिडचिड व्हायला लागली. मधुकरला डॉक्टरकडं नेऊन शारिरीक तपासणी केल्यावर त्याच्यात काहीही दोष नसल्याचे निदान झाले. काहीतरी मानसिकच समस्या होती.

मधुकरला सर्वप्रथम स्त्री-पुरुष संबंधाबद्दलचे शास्त्र सगळं चित्रावरून समजावून सांगितले. त्यात गैर अयोग्य काहीही नाही. विवाह हया चा खरा अर्थच तो आहे. शिवाय लग्न झाल्यापासूनच मधुकरला दडपण वाटत होते की, आपल्या हया कमी पगारात आपले भागेल कसे ? आपण बायकोला कशी सांभाळू शकू ? शिवाय तिच्यावर प्रेम केले व मूल झाले तर तो आर्थिक बोजा कसा काय सहन करायचा ? त्यामुळे तो तिच्याशी जास्त हिडीस-फिडीस करीत असे. हया समस्येसाठी मधुकरला गणित मांडून दाखविले की, त्याच्या पगारात कसे भागविता येईल ते ! शिवाय तुझी पत्नी कामाला वाघ आहे, उत्तम सुगरण आहे. ती आणखीही बचत करू शकेल. तुझ्यापेक्षा कमी पगार असलेल्यांना मुले असतात की नाही ? त्यांचे कसे भागते ? आणि

तुझ्या भावाला तुझ्या दसपटीने पगार आहे, पुरतो का त्याला ? पैशांवरून दोघांची सतत भांडणं होतातच ना ? म्हणजेच पैसा पुरतो किंवा पुरत नाही, हे म्हणणे चुकीचे आहे... आपल्याला पुरविता येतो की नाही हे महत्त्वाचे व बरोबर आहे. मूल मोठे होत असताना, त्याच्या वाढीबरोबर होणारे समाधान, त्याच्या विविध क्षेत्रातील यशांमुळे होणारा अभिमान, आनंद हा महत्त्वाचा असतो व त्यासाठी मूल होऊ देणे योग्यच ठरते. शिवाय आपल्या मुलाची जबाबदारी आपल्या निवृत्तीपूर्वी पूर्ण होणे आवश्यक आहे. आधीच तुमच्या लग्नाला बराच उशीर झालेला आहे. आता यापेक्षा अधिक काळ मूल लांबविणे योग्यच ठरणार नाही.

मायाला सांगितले होते की, तुला घाई करून चालणार नाही. सावकाशीने, त्यांच्या कलाकलाने, प्रेमाने घेऊनच तुला पुढं जायला हवे. मात्र मायाला ते काही जमत नव्हते. व त्यामुळं तिची चिडचिड होत होती संयम सुटत होता. तिचेही स्वाभाविक होते. ज्या पुरुषाने आपल्याला मातृत्व द्यावे अशी अपेक्षा त्याच्याशीच आपण मातेच्या भूमिकेतून वागणे कसे जमणार ? लग्नाला ती तर किती उत्सुक झालेली होती. तिला सावकाशीने घे म्हटल्यावर कसे काय जमेल तिला ? पोटात भुकेचा डोंब उसळलेला असताना कुणाला तरी शांत राहता येईल का ? म्हणूनच लग्नाला सहा महिने झाले असताना असह्य होऊन ती माहेरी परत जायला निघाली होती. पण त्यावेळी तिचा पलिकडे जाण्याचा दोरच तोडून टाकल्यावर सुरुवातीला तो काहीशी नाईलाजाने, असहयतेने राहिलो तरी हळूहळू तिला त्याच्यावर प्रेम करता आले. त्याच्या स्वत्वावर फुंकर घालीत तो फुलविता आला व तिला हवे ते वैवाहिक सुख मिळवता आले. व लौकिक अर्थानेही लग्नाला दोनअडीच वर्षे झालेली असताना तिच्या वैवाहिक जीवनाचे सार्थक झाले. तिला मातृत्व प्राप्त झाले.

घटस्फोट ? की...

पुण्यातील उच्चभ्रू भागातील एका डॉक्टर दांपत्याची सुस्वरूप, एकुलती एक मुलगी सोनिया जेव्हा कळवळून म्हणाली, 'मला घटस्फोटिता म्हणू नका हो. माझं लग्न रद्दबादल झालं आहे आणि केवळ कायदेशीररित्या नव्हे अजून मी खरोखरीच कुमारिका आहे.' तेव्हा तिचा वृत्तांत ऐकायला माझी उत्सुकता विशेष जागी झाली.

बी. एससी. होमसायन्ससारखा संसारोपयोगी अभ्यासक्रम सोनियाने पूर्ण केल्यानंतर संसार सजविण्याच्या स्वप्नात रममाण होणाऱ्या सोनियासाठी आई-वडिलांनी तिला शोभेल अशा जावयाचा शोध घ्यायला सुरुवात केली. खरं तर त्यांची एकुलती एक मुलगी परगावी देण्याची त्यांची यत्किंचितही इच्छा नव्हती. शक्यतो ती पुण्यातच असावी तीसुद्धा घरापासून जवळपास असावी, ही त्यांची मनापासून इच्छा. म्हणजे दिवसाच्या कोणत्याही काळात तिला भेटायची इच्छा झाल्यानतर ती सहजपणे पूर्ण करता येईल. पण समंजस सोनियानेच त्यांची समजूत घातली की, 'तुम्ही पाहताना तुमच्या शेजारी राहणारा जरी पाहिलात तरी लग्नानंतर तो जगाच्या पाठीवर जाईल ह्या गावी मला जायला हवं ना ?' सोनियाच्या आई-वडिलांनी तिच्या म्हणण्याचा अर्थ ताडला व परगावचे असले तरी हरकत नाही, पण चांगले स्थळ शोधायला सुरुवात केली.

लवकरच त्यांच्या म्हणण्याप्रमाणे, त्यांच्या घराण्याला तोडीस तोड असलेले कोल्हापूरचे घर त्यांना मिळाले. फक्त परिवार मोठा होता. पण

त्यांचा भावी जावई भावंडात सगळ्यात धाकटा होता, तेव्हा त्याच्यावर काहीही जबाबदारी नव्हती. शिवाय त्याची बदलीची नोकरी होती. त्यामुळे त्यांच्या दृष्टीने दोन फायदे होते. एक म्हणजे त्यांच्या लाडक्या सोनियाला त्या राम-रगाड्यात रहावे लागले नसतें व दुसरे म्हणज अधून-मधून का होईना त्याची बदली पुण्याला झाल्यावर त्यांची लेक जवळ आली असती.

सर्व गोष्टी सोनियाच्या अनुमतीनेच ठरल्या, त्यामुळे तीही खुषीतच होती. मात्र लग्नाच्या आधी फिरायला जाण्याची मजा काही लुटता येईना... पत्रोपत्री परस्परांची ओळख करून घेणें, हितगुज करणेही सोनियाला आवडले असते. पण त्याचे पत्र नाही, तर ही कशी आधी पत्र लिहिणार ? त्याचे बारीकसे चिटोरे जरी आले असते तरी हिने बहारदार पत्रे त्याला लिहिली असती. शेवटी आईने समजूत घातली, 'अग, कोल्हापूरकडची माणसं जरा सनातनी विचारांची असतात. मुंबई-पुण्याच्या माणसांसारखी सुधारलेली नसतात. त्याच्या मनात आलेही असेल, पण घरातल्या वडीलधाऱ्यांना दुखवून लिहायला त्याला नको वाटले असेल.'

लग्नानंतर मोठ्या खुषीने तिने उंबरठ्यावरचे माप ओलांडून गृहप्रवेश केला. सुरवातीचे आठपंधरा दिवस पाहुणेरावळे, गोंधळ, सत्यनारायण इ० धार्मिक कार्ये करण्यात गेले. तशी घरात जागेची काही कमी नव्हती. पण सोनियाला वाटे की आई म्हणाली तसे सनातनी विचारांच्या लोकांना घाई केलेली आवडत नसेल. गर्भादानाचा धार्मिक कार्यक्रम करून मगच त्याची नि आपली गाठ पडू देतील. सुमुहूर्त शोधत असतील. शिवाय घरात तिची सगळ्यात धाकटी नणंद बाळंतपणासाठी आलेली होती. तिची तारीख जवळ आली होती, (किंबहुना त्या घाईनेच सासरच्यांनी लवकरचा मुहूर्त धरायला लावला होता.) त्यामुळेसुद्धा वडीलमंडळी विवंचनेत असतील व आपल्याकडे पहायला त्यांना वेळ मिळत नसेल. एकंदरीत कसं बोलू, काय बोलू, कुणाला सांगावे या कुचंबणेत तिचे लग्नानंतरचे पंधरावीस दिवस निघून गेले. हया सगळ्या दिवसात तिला फक्त एक शंका मनात येऊन गेली की तो स्वस्थ कसा ? त्याला आपल्या आईला विचारणे कठीण नाही. इतकेच कशाला, पण दहाबारा दिवसांच्या धबडग्यात तो केव्हातरी दृष्टीस पडला तर काही प्रेमाने, मोकळेपणाने बोलेल, हसेल असेही नाही. आपल्याला पहायला, भेटायला

उत्सुक आहे असेही वाटेना. शेवटी तिने आपल्या मनालाच दटावलें. असले विचार मनात आणायचे नाहीत म्हणून !

वीस दिवसानंतर तिला न सांगता तो बदलीच्या गावी निघून गेला... तेव्हा मात्र ती चकितच झाली. इतरांच्या बोलण्यातून तिला समजले की नणंद देच्या बाळंतपणासाठी तिला ठेवून घेतले आहे. नणंद सासरी गेल्यावर तिला त्याच्याबरोबर पाठवणार आहेत. सुरवातीला जरी तिला वाईट वाटले तरी लवकरच तिने सर्वांना खूष करण्याचे सत्र सुरू केले. आणखी एकदोन महिन्यांनी तो भेटेल. या आशेवर ती राहिली. त्या दोनअडीच महिन्यात तो एकदोनदा एखाद्या दिवसाकरता आला. त्या काळात तिची झोपण्याची व्यवस्था त्याच्या खोलीत करण्यात आली. पण तिला समाधान वाटेल असा काही तो जवळ आला नाही. तीच एकटी काही वेळ एकंदर वृत्तांत सांगत राही. सासू-सासरे तिच्यावर कसे खूष आहेत, सासऱ्यांच्या जुन्या मित्रांजवळ ते तिचे कसे कौतुक करत होते, तिच्या आईवडिलांचे कसे समाधानाचे पत्र आले आहे वगैरे वगैरे. तरी तिला वाटे की काहीतरी हया घरासंबंधीचे कारण असेल. आपण नवीन आहोत. त्याच्याच माणसांना तो आपल्याजवळ नावे ठेवणार नाही. कदाचित आपल्या घरी गेल्यावर बोलेल.

नणंद सासरी गेली व सोनिया मनातल्या मनात सुखावली होती. आता आपल्यालाही जायचं. पण पुढल्या आठवड्यात तिच्या नवऱ्याने आल्याआल्या जाहीर केले की त्याची बदली झाली आहे. बदलीच्या गावी गेल्यावरच सोनियाला घेऊन जाईन.

प्रत्यक्ष बदलीच्या गावी तो जाईपर्यंत, त्यानंतर जागा मिळून सोनियाला न्यायला तो तयार होईपर्यंत सहा महिने गेले. हया काळात जो काही तो सात-आठ वेळा भटला, त्यात सोनियाला सुखद आठवणी काहीच निर्माण झाल्या नाहीत. उलट तिला त्याच्याबद्दल भीतीच बसली. तिटकारा, राग निर्माण झाला व तो न येईल तर बरं असं वाटायला लागलं. जेव्हा जेव्हा तो जवळ येई तेव्हा तो आता तिच्या शरीराशी खेळू लागे, पण ते तिला त्रासदायक होईल, कुठं काही लागेल, टोचेल, दुखेल अशा स्वरूपाचे. त्याच्या शारीरिक

मस्तीने तिच्या अंगावर काळेनिळे डाग उठू लागले. शिवाय त्याचे शब्द मनाला टोचण्या देत होते ते वेगळेच ! त्याला भेटण्याची तिने सुरवातीला जी काही उत्सुकता दाखवली होती, त्यावरून तो तिला म्हणाला, 'स्त्री-पुरुष-संबंधाबद्दल तुला इतकी कशी माहिती ? म्हणजे तुला हया बाबतीतील पूर्वीचा अनुभव असेल.' त्याच्या या शब्दांचा आत्यंतिक राग येऊनही तिने स्वत:ची बाजू मांडलीच.

'अहो, आमच्या अभ्यासात शरीरशास्त्र आम्हाला शिकावे लागते ! शिवाय माझे आईवडील दोघंही डॉक्टर असल्याने त्यांनी मला हे ज्ञान व्यवस्थितपणे समजावून दिलं होतं.'

आत्तापर्यंत माहेरी काहीही न कळवणाऱ्या सोनियाने ज्या क्षणाला तिला नवऱ्याकडे जाऊच नये असे वाटू लागले तेव्हा मात्र तिने आईवडलांना पत्र टाकून बोलावून घेतले. माहेरी परत जाणार हे ऐकल्यावर तिचे कौतुक करणारे सासूसासरेही तिच्यावर चिडले. काही झालं तरी माहेरी परत जायचे नाही, कारण त्यांची बेअब्रू झाली असती. हयाच घरातून तुझी हाडे आता बाहेर पडली पाहिजेत, हया विचाराचे ते ! परंतु इतके दिवस नम्रपणे विनयशीलपणे वागणाऱ्या सोनियाने आता उग्र रूप धारण केले होते व काहीही झाले तरी माहेरी परत जायचे, हया घरी रहायचे नाही असा तिने निर्धार केला व त्यानुसार ती आईवडिलांबरोबर पुण्याला परत आली व कोर्टातून घटस्फोट नव्हे तर लग्न रद्द झाल्याचा निर्णय मिळवला.

नि वे दि ता

अनेक लहान मुले आईवडील असूनसुद्धा इतर काही कारणामुळे आजोळी ठवली जातात. कधी जुळया मुलांचे आईला करणे शक्य नसते म्हणून दोघातील एक, कधी पाठोपाठ बाळंतपणं झाल्यामुळं, कधी आईच्या नोकरीमुळं-शिक्षणामुळं, आजीआजोबांना सोबत, विरंगुळा किंवा इतर काही प्रापंचिक जबाबदाऱ्यांमुळे एखाद्या मुलाचे संगोपन करणे कठीण वाटू लागते व त्यामुळे

त्या बालकाला आजोळी पाठवले जाते.

निवेदितालाही असेच आजोळी ठेवण्यात आले होते. परंतु इतरांप्रमाण काहीशी मोठी झाल्याबरोबर तिला परत आणले गेले नाही, तर चांगली वयात येईपर्यंत मॅट्रिकनंतरही ती आजोळीच होती. आजोळी म्हणजे साहजिकच ती जरा जास्त लाडात वाढली होती. कोणत्याही प्रकारच्या सोयीसवलती तिला सुलभपणे मिळत होत्या. हट्ट करणं, आपलं तें खरं करणं यात ती तरबेज होती. वयात आल्यानंतर मैत्रिणींकडे जाणे, गप्पा मारणें, हिंडणेफिरणे, वेळ-प्रसंगी मैत्रिणींकडं रहायला जाणं ह्या सर्वच गोष्टींचे प्रमाण वाढले. नटण्या-मुरडण्याकडेही तिचे अधिक लक्ष जाऊ लागले. आरशासमोर पूर्वीपेक्षा बराच जास्त वेळ जाऊ लागला. पण आजीला उलट आपली नात जास्त चांगली दिसते याचेच कौतुक वाटत होते. बाहेर ती कोणत्या मैत्रिणीकडं जाते, सांगते त्याच मैत्रिणीकडं जाते की आणखी कुठल्या, की मित्राकडं जाते हे पहाण्याची आजीला काही आवश्यकता वाटली नाही.

निवेदिता कॉलेजच्या पहिल्या वर्गात शिकत होती आणि तेव्हा तिचे मित्रांबरोबर हिंडणे, एका मित्राशी जरा जास्त संबंध असणे ही गोष्ट गावात चांगलीच पसरली व मैत्री काहीशी रुजल्यानंतरच ती आजीला समजली... आपल्या माथी येणाऱ्या या अपयशाने ती भांबावून गेली व तिने निवेदिताच्या आईला लगेच बोलावून घेतले व सगळा वृत्तांत सांगितला. दोघी मायलेकींनी मिळून निवेदिताला चांगले फैलावर घेतले व रातोरात निवेदिताची आई तिला पुण्यात घेऊन आली. कार्टीची लक्षणं काही ठीक दिसत नाहीत, लगेच लग्न लावून टाकले पाहिजे, ह्या विचाराने त्यांना प्रभावित केले व त्यानुसार त्यांनी तिच्यापेक्षा काही कमी शिकलेला (नॉनमॅट्रिक असलेला) वयाने सुमारे दहा वर्षांनी मोठा असलेला, पण घरची सुस्थिती असलेला मुलगा पाहून पंधरा दिवसात तिचे लग्न ठरवून टाकले. निवेदिता काही तिच्या प्रियकराच्या प्रेमातून बाहेर पडत नव्हती. तिने अनेक प्रकारे घरच्यांना सांगून पाहिले की, 'माझा नवरा मी शोधला आहे. त्याच्यात वाईट काहीही नाही. उलट ह्या नॉनमॅट्रिक मुलापेक्षाही तो शतपटीने चांगला आहे.' पण आईवडिलांना ते पटले नाही. त्यांचा निर्णय पक्का होता. शेवटी तिने लग्नाच्या आदल्या दिवशी स्वतःला जाळून घेण्याचा प्रयत्न केला. त्याही प्रयत्नातून

आईवडिलांनी तिला बाहेर काढलंच ! कुठंही चर्चा केली नाही. सासरच्यांना कळू दिले नाही व दुसऱ्या दिवशी तिला बोहल्यावर चढवलंच ! लग्नानंतर मुलगी सुधारेल ह्या आशेवर असलेल्या आईवडिलांनी तिला सासरी गेल्याला पंधरा दिवस झाले असतील आणि सुटकेचा निश्वास टाकला. पण दोनच दिवसांनी ती परत आली व 'आता काय वाटेल ते केलंत तरी परत जाणार नाही.' असे ठामपणाने सांगितले.

'पण का ?'

'नाही माझी इच्छा ! मला त्याच्याशी संसार करायचा नाही.'

आई-वडिलांनी धाकदपटशाचा प्रयत्न केला पण काही उपयोग नाही, असे लक्षात आल्यावर त्यांनी दुसराच पवित्रा घेतला. आपली मुलगी अजूनही सज्ञान झाली नाही, हे लक्षात आल्यावर जावयावरच केस केली व कोर्टातून घटस्फोट नव्हे तर लग्न रद्दबादल करवून घेतले. खरं तर दोघांचे वैवाहिक संबंध आलेले होते. परंतु निवेदिताला मित्राच्या आठवणींमुळे नवऱ्याशी जुळवून घेता येईल, असे काही वाटेना व म्हणून ती हट्टाने परत निघून गेली.

यानंतर आई-वडिलांनी तिला पुन्हा कॉलेजला घातले. ग्रॅज्युएट होऊ दे, मगच पाहू, तीही तोपर्यंत समंजस होईल. निवेदिता सुस्वरूप असल्यामुळे ग्रॅज्युएट झाल्यानंतर लगेच तिचे एके ठिकाणी लग्न जमले. परंतु हेही तिला मान्य नव्हते, म्हणून तिने पुन्हा बराच आरडा-ओरडा, आकांड-तांडव करायला सुरुवात केली. शेवटी लग्नाच्या आदल्या दिवशी हेही लग्न तिने मोडले.

ह्यानंतर मात्र आई-वडिलांनी तिला एका सरकारी कचेरीत नोकरीला लावून दिले व तिच्या लग्नाच्या भानगडीत लक्ष घालायचे नाही, असे ठरवले. ती व तिचे नशीब... काहीही होवो.

सु जा ता

बी. एस्सी. नंतर पॅथॉलॉजीचा कोर्स करून एका मोठ्या नर्सिंग होम-

धंद्यात नोकरीला लागलेल्या सुजाताचे वडील लहानपणीच वारले होते. त्यावेळी फक्त एका बहिणीचे लग्न झालेले होते. तिच्या पाठीवर असलेल्या आणखी चार मुलींचे जीवन मार्गी लावण्याचे काम आईवर होते. आईचे शिक्षण काहीच नाही. होती ती पुंजी लगेच दुसऱ्या मुलीचे लग्न केले, त्यात वापरली. त्यानंतर अक्षरशः पोळपाटलाटणे हाती आले व घराचे कर्तेपण दोन जावयांकडे गेले. जावयांनी करताना पुष्कळ केले. पण तरी धाकट्या तिघी बहिणींना व त्यांच्या आईला विशेष मिंधेपण लागे. कारण त्यांच्या माहेरच्या घरासाठी नवऱ्यांनी केलेल्या उपकाराचे ओझे त्यांच्या डोक्यावर होते. परंतु हृषा सर्वांचे सुजाताच्या हुशारीने, तिच्या व्यवसायाभिमुख शिक्षणाने व चांगल्या नोकरीने पांग फिटतील, हृषा आनंदात सगळे जण होते.

दोन वर्षे सुजाताने बडघा पगारावर नोकरी करून तिच्या लग्नाची तिने चांगली सोय करून ठेवली व त्यानंतरच ती लग्नाला तयार झाली. सुजातासारख्या काळघा-सावळघा पण तरतरीत, हुशार, गुणी, सुस्वभावी मुलीवर अनेकांचे लक्ष होते. ती लग्नाला तयार झाल्याचे कळल्यावर अनेकांनी अनेक मुले सुचविली. त्या सर्वांतून तिने निवड केली ती तिच्या डॉक्टरबाईंनी सुचविलेल्या त्यांच्या एका डॉक्टर मित्राच्या मुलाची.

मुलगा एम. एस्सी. (जिऑलॉजी) होऊन सरकारी खात्यात नोकरीला होता. आंतरजातीय विवाह केलेला एक वडीलभाऊ व कॉलेजच्या शवटच्या वर्षात शिकणारा एक धाकटा भाऊ त्याला होता. वडिलांनी आता प्रॅक्टिस थांबविली होती. पण आयुष्यभरात बरीच माया जमविली होती. घरदार, शेती-वाडी, गाडी इ. गोष्टी होत्याच. आयुष्यभर गरिबीत राहिलेल्या सुजाताला व तिच्या नातेवाईकांना हृषा बडघा स्थळाचा नाही म्हटले तरी मोह पडलाच. शिवाय मुलामध्ये तरी नाव ठेवायला कुठे जागा होती ?

लग्नानंतर मात्र लवकरच सुजाताचा पूर्ण विरस झाला. तिचा नवरा संजय कितीही जवळ आला तरी तो उत्तेजितच होत नव्हता व तिला आनंद देऊ शकत नव्हता, स्वतः मिळवू शकत नव्हता. तिच्या चेहऱ्यावरचा हिरमुसलेपणा लक्षात आल्यावर तिच्या डॉक्टरबाईंनी तिला विश्वासात घेतले. तेव्हा तिने सांगितले की, 'तो पुरुषच नाही.' त्या चकित झाल्या व म्हणाल्या, 'अग, वैद्यकक्षेत्रात काम करतेस आणि तरी एखाद्या त्रयस्थासारखं एकदम

शिक्कामोर्तब करून टाकतेस ? माझ्याकडे तपासायला घेऊन ये. एखाद्यावेळी लहानसहान अडचण असेल.'

सुजाताला पटलं व काहीशी आनंदित होऊनच तिने संजयला डॉक्टरांकडे चलण्याविषयी सांगितले. त्याबरोबर त्याच्यातील पुरुष जागा झाला व तो यायला तयार होईना. त्याला पटविण्याचा तिने काही दिवस व्यर्थ प्रयत्न केला. मग तिच्या मनात एक कल्पना आली. संजयचे वडील डॉक्टर आहेत. डॉक्टर ह्या भूमिकेतून त्यांना हे पटेल व वडील म्हणून ते त्याला समजावूनही सांगतील व तोही त्यांचे ऐकेल.

कल्पना चांगली होती. पण प्रत्यक्षात सासऱ्यांना ह्या खाजगीतल्या गोष्टी सांगणे किती कठीण होते. ते तिला प्रत्यक्ष सांगायला गेल्यावरच जाणवले. शिवाय सुजाताच्या हे लक्षात आले नाही की, ते डॉक्टर होते, वडील होते, तसेच सासरेही होते. नवीन लग्न झालेली सून मुलाच्या षंढपणाबद्दल सांगतेय म्हटल्यावर त्यांना ते सहन झाले नाही व सासऱ्याच्या संपूर्ण तोऱ्यात ते तिलाच रागावले. तिच्या पॅथॉलॉजिकल टेक्निशियनच्या कोर्सचा उद्धार केला. तिला वाटले चुकलेच आपले ! त्यांच्या मित्राला किंवा आपल्या मोठ्या मेव्हण्यांना सांगून, त्यांच्या बरोबरच्या व्यक्तीकडूनच त्यांना सांगायला हवे होते. पण उगाच कशाला ह्या खाजगी गोष्टीची चार ठिकाणी चर्चा; ह्या विचाराने तिने सासऱ्यांना स्वतःच सांगितले.

ह्यानंतर घरातले वातावरण तर बिघडलेच पण संजयही सुजाताला टाळू टाकला. त्याच्या ह्या टाळण्याला घरातून प्रोत्साहन मिळू लागले. सुजाताला आणखीनच कानकोंडे झाले. कसा मार्ग काढावा तेच कळेना. शिवाय कुणाचे मार्गदर्शनही घेता येईना. परंतु सुजाताला टाळून संजय मित्रमंडळीत जास्त जाऊ लागल्यावर त्याची तेथे थट्टा होऊ लागली व तेथे त्याने आपला मानसिक ताण कमी करायला सुरुवात केली. सर्व गोष्टी हळूहळू मोकळेपणाने सांगितल्या. अगदी सुजाता तिच्या ' डॉक्टरबाईंकडे चल–' म्हणत होती तिथपर्यंत. त्यावेळी मात्र मित्रांनी त्याला तिच्या बरोबर जायचा आग्रह केला. फारफार तर त्या डॉक्टरांकडे जायला संकोच वाटत असेल तर दुसऱ्या एका निष्णात, अनुभवी डॉक्टरांचे नाव सुचविले. संजयला ते पटले व त्या डॉक्टरांकडे मित्रांबरोबरच गेला. डॉक्टरांनी त्याची संपूर्ण शारीरिक तपासणी

केली कुठेही दोष नसल्याचा निर्वाळा दिला. वीर्यही तपासले व शुक्रजंतूचे प्रमाणही योग्य तेवढे होते.

तो मोठ्या अभिमानाने आत्मविश्वासने सुजाताच्या जवळ गेला. पुन्हा तेच. त्यानंतर मग सुजाताने नकळतच मानसशास्त्रज्ञांशी त्याची ओळख करून देण्याचे ठरविले.

त्यानुसार माझ्याकडे येऊन तिने लग्नानंतरची व तिची स्वत:ची लग्नापूर्वीची सर्व हकीकत सांगितलीच, परंतु संजयकडून त्यांचीही माहिती मिळाली.

संजय लहान असताना त्याचे आई-वडील आफ्रिकेत गेले होते त्यावेळी शिक्षणासाठी त्याला व त्याच्या मोठ्या भावाला पुण्यातच ठेवून दिले होते. मोठा भाऊ सावत्र आहे, त्याला त्याच्या आजोळच्यांनी ठेवून घेतले. परंतु संजयला मात्र हॉस्टेलवर ठेवण्यात आले. हॉस्टेलवर त्याला संगत चांगली मिळाली नाही व फार लहानपणापासून तो अशास्त्रीय लैंगिक पुस्तके वाचू लागला. ८ वी, ९ वीत असतानाच हस्तमैथुनात मशगुल होऊ लागला. शिवाय शाळेच्या प्रत्येक सुट्टीला काही त्याला आईवडिलांकडे आफ्रिकेला जाता यायचं नाही, म्हणजे मग रिकामपणी इकडे-तिकडे हिंडणे-फिरणे व अशा भटकणाऱ्या मुलांच्या संगतीत राहणे हाच त्याचा उद्योग. हया सगळ्या वर्षात वडील जसा हॉस्टेलचा एवढा खर्च करीत होते, वरखर्चालाही पैसे कमी पडणार नाहीत याची दक्षता घेत होते, तरी त्याला मात्र कमालीचे असे वाटत राही की, ' आपण वडिलांचे नावडते आहोत. आपल्याकडे त्यांचे लक्ष नाही. दादाला जसा आजोळी ठेवला, तसे मलाही ठेवले असते तर ? पण पुण्यातील शिक्षणाला विशेष सोनं लागलेलं होतं ना ?'

एकंदरीत संजयला निर्माण झालेली लैंगिक समस्या विपरीत, अशास्त्रीय ज्ञानामुळे तर होतीच. परंतु त्याच्यातील आत्मविश्वासाचा अभाव, उपेक्षिले गेल्याची भावना हयाही विशेष प्रभावकारी व त्रासदायक झाल्या होत्या. दिवसभरात त्याचे वीर्यपतन केव्हाही व अनेक वेळा होत राही. त्यावर त्याला नियंत्रण ठेवता येत नव्हते व साहजिकच सुजाताच्या सान्निध्यात असताना त्याला विशेष उत्तेजित, उल्हसित वाटत नव्हते.

सुजाताला बोलावून मी तिला कल्पना दिली की, ' तुला फार शांतपणे

संजयच्या कलाकलाने घ्यावे लागेल. काही दिवस संजयकडून कोणतीही अपेक्षा न करता, त्याच्यावर मनापासून प्रेम करावे लागेल. त्याला पूर्ण आपलंसं करून घेतल्यावरच त्याच्यात आत्मविश्वास निर्माण होईल व मगच तो खऱ्या अर्थाने तुझा नवरा होऊ शकेल. शक्य तितका जास्तीत जास्त वेळ दोघांनी परस्परांच्या सान्निध्यात राहणे आवश्यक आहे व योग्यही आहे. खरं तर स्वतंत्र बिऱ्हाड करून राहता आलं तर बघ.'

हे वाक्य उच्चारताच मात्र सुजाताने माझ्याकडे प्रश्नार्थक नजरेने पाहिले. मीही समजू शकले की, तिचा काहीही दोष नसताना, लग्नानंतर लगेच वेगळी राहू लागली हा समाजाचा व सासरच्यांचा दोष तिला पत्करावा लागेल.

परंतु नवऱ्यासाठी बऱ्याच प्रकारे मन मोठे करून त्याग करणाऱ्या सुजाताने तोही सासरच्यांचा दोष पत्करला. परंतु चार वर्षांनंतर जेव्हा मला समजले की, सुजाताने डायव्होर्ससाठी कोर्टात अर्ज केला आहे, तेव्हा मी चकितच झाले, सुजाता म्हणाली, 'खरं म्हणजे लग्न रद्दबादलसाठी मला अर्ज करायचा होता. कारण इतक्या वर्षात आम्ही कधीही नवरा-बायको-सारखे वागलोच नाही, तर घटस्फोट कसला घ्यायचा ? पण कोर्टात नियम आहे. चार वर्षे आम्ही पती-पत्नी म्हणून राहिल्यावर लग्न रद्द करता येत नाही. घटस्फोटच घ्यायला हवा. तुम्ही म्हणालात तशी मी त्याच्याशी मायेने, प्रेमाने किंबहुना आईच्याच प्रेमाने वागण्याचा प्रयत्न करीत होते, पण एकीकडे माझ्या घरच्या मंडळीकडून, माझ्या माहेरच्या मंडळीकडून, एकंदर समाजाकडून इतके विविध प्रकारचे आघात त्याच्यावर व माझ्यावर होत होते की, जरासा तो उभा रहायला लागतो आहे असे वाटेपर्यंत तो पडत असे. पुढे पुढे बाई, खरं सांगते. माझाही संयम सुटायला लागला. माझीही चिडचिड व्हायला लागली. किती दिवस मी तरी शांत रहायचं ?

'बाई, तुमचं मार्गदर्शन अगदी बरोबर होतं- पण समाजात राहून त्याचे काटेकोर पालन करता येत नव्हते. त्यासाठी रानावनातच रहायला पाहिजे.'



चा ळि शी ओ लां ड ता ना ?

'शैला, आपल्या वर्गातील ती रंजना तुला आठवते आहे का ?'

'तीच ना, अगदी सरळ नाकाची, टपोऱ्या डोळ्यांची, डाव्याकडेला भांग पाडणारी, काळ्याभोर लांबसडक व अगदी जाड-जाड दोन वेण्या घालणारी ! आवाज काय छान होता तिचा ! हुबेहूब आशाच्या आवाजात गाणं म्हणायची ! प्राध्यापकांच्या नकला करून मजा आणायची, राजकुमार-मीनाकुमारीचे गंभीर संवाद हुबेहूब म्हणायची व तितकंच वैजयंतीमाला-सारखं लचकणं-मुरडणंही तिला बरोबर करता यायचं ?'

'तीच ती !'

'आपल्याला बी. ए. होऊन पंचवीस वर्षे झाली नाही आता ? बी. ए. च्या परीक्षेनंतर ती एकदाही न भेटतासुद्धा तिच्या हृदा हरहुन्नरीपणामुळे; खेळकरपणामुळे अनेक वेळा बोलताना मी तिचा उल्लेख करते व त्यामुळे तिला अजिबात विसरले नाही. शिवाय, तुला आठवतं, आपण बी. ए. च्या शेवटच्या वर्षात शिकत असताना तिला सरदार घराण्यातून मागणी आल्याचे कळल्यावर आपल्याला केवढा हेवा वाटला होता तिचा ! पण ती दिसायला इतकी सुंदर होती, गुणी होती की, तिला एवढं बडं स्थळ मिळणारच असंही आपल्याला वाटलं होतं. तिच्या लग्नातल्या साडचांनी, दागदागिन्यांनी आणि एकंदरीतच समारंभातील वैभवानं आपण किती दिपून गेलो होतो ना !'

'पण तुला माहीत आहे का, इतक्या त्या गुणी मुलीचे गुण आणि सौंदर्य दोन्ही पैशाच्या ढिगाऱ्यात चक्क कुजत पडलं ग !'

'म्हणजे !'

'अग किती बंधनात रहावं लागलं तिला त्या घरात ! घराण्याच्या प्रतिष्ठेला, परंपरेला शोभेल असं वागण्याच्या नावाखाली कधी तिने दिवाण-खान्यातसुद्धा जायचं नाही, मोठ्यानं बोलायचं, हसायचं नाही. घरात स्वयं-पाकाला व प्रत्येक लहान-मोठ्या कामाला नोकरांचा सुकाळ असला तरी हिला काही बाहेर पडता यायचे नाही. फक्त नवरा नेईल तेव्हा त्याच्या-बरोबर तेवढं बाहेर जायचं. मुलांना घेऊन कधी बागेतसुद्धा जायचं नाही. ते काम नोकरांचे !'

'होय. मी असंही ऐकलं होतं की, कुणा मैत्रिणीचा किंवा दूरच्या नातेवाईकाचा फोन तिला गेला तर तो नेहमी मिळत असेच, असं नाही. मिळाला तरी आजूबाजूला सासरची माणसं असायचीच. तिला मोकळेपणानं बोलता यायचे नाही. ती शक्य तितक्या लवकर फोन बंद करीत असे.'

'अलिकडच्या काळात हे सगळं जरा जास्तच वाटत नाही का ?'

'जास्त ? अनेकांना हे खरंही वाटणार नाही, पण ही वस्तुस्थिती आहे ना ? अग आणि रंजना काही समाजात एकच नाही. तिच्यासारख्या अनेक सुविद्य, सुस्वरूप, गुणी मुली अशासारख्या रीती-पद्धतींमधे जखडल्या गेल्या आहेत. त्यांची कुचंबणा होत आहे व त्यातून अनेक सामाजिक समस्या निर्माण होत आहेत.

पुरुषप्रधान समाजात सततच स्त्रियांना कमी लेखलं जातं, दुय्यम स्थान दिलं जातं. चूल-मूल, संसार-घर या चतुःसूत्रीपलिकडे तिला जाता येत नाही, ही मूळ कल्पना व तिने जाऊ नये ही पुढली अपेक्षा. तिचे तिला वेगळे क्षेत्र असावे, हे इतरांना तर वाटत नाहीच. परंतु तिलाही तसे वाटत नाही. मुलांचे नवऱ्याचे, सासरच्यांचे करण्यात तिला कृतकृत्यता वाटते.

'अगदी आधुनिक काळात अनेक स्त्रिया नोकरी करतात, त्यांना आर्थिक स्वावलंबन आले आहे, असे म्हटले जाते. परंतु प्रत्येकाने आत्मपरीक्षण करू-नच पहावे. खरंच किती स्त्रिया नवऱ्यासारखे हॉटेलिंगवर पाच-पन्नास रु. मोकळेपणाने उडवू शकतात ? अग विजया, कुणी त्यांना शे-दोनशे रु. उडवायला दिले तरी त्यातसुद्धा स्वतःचा विचार करण्याऐवजी घरातल्यांचा त्या आधी करतील ! नोकरीचे स्थान निवडताना शक्यतो आपल्या घरा-

जवळचे स्थान निवडतात. कारण नोकरीमुळे उत्कृष्ट गृहिणीच्या, कर्तव्यदक्ष मातेच्या भूमिकेत कसर व्हायला नको. दोन्ही पार पाडताना स्वत:ला तारेवरची कसरत करावी लागली तरी चालेल. ऑफीसमधून घरी जायला उशीर झाला तर ती शरमिंदी होते, तिच्या मनात अपराधीपणाची भावना येते, पुरुषाला मात्र उशीर झाला तर 'त्याला ऑफीसमधे जादा कामं करावी लागतात,' हे तो मोठ्या अभिमानाने सांगतो. घराण्याची व्रत-वैकल्ये, उपास-तापास हे स्त्रीनेच सांभाळावे, तिची प्रकृती बिघडली तरी हरकत नाही, पण तिच्या पतिदेवांनी त्रास घेणं हे समाजातील स्त्रियांना– प्रत्यक्ष त्या स्त्रीच्या सासूलाच मान्य नसते.'

'अग हो हो ! किती बोलशील ? एखाद्या महाविद्यालयात प्राध्यापिका का नाही झालीस ? चांगलं जमलं असतं तुला व्याख्यान द्यायला ?' शैला काहीशी हसली, परंतु तिचा पारा काही चटकन खाली येईना.

'रंजनाच्या आताच्या समस्येचा व आपल्या समाजात स्त्रियांना दुय्यम लेखण्याचा काय संबंध आहे बरं ?'

'काय समस्या आहे रंजनाची ?' शैलाने घुश्शातच विचारले.

'अग, पूर्वी घरातील सर्व व्यवस्था पाहणारी रंजना आता अगदी निकामी झाली आहे. वेडी झाल्यासारखी वाटतेय. नुसती खिन्न बसून राहते. मुलं दिवसभर कॉलेज, खेळ इतर काही ना काही निमित्ताने बाहेरच असतात. पण सकाळी ती बाहेर पडतानाही त्यांच्या न्याहारीचं, जेवणाचा डबा भरून देण्याचंसुद्धा बघेल असं नाही. लहर असली तर करेल, नाही तर खुशाल डोक्यावर पांघरूण घेऊन पडून राहते. तीच गोष्ट नवऱ्याच्या बाबतीत. त्याच्या धंद्याचा व्याप बराच वाढला आहे. त्याला फारसा वेळ मिळत नाही. पण तोही घरी येईल तेव्हा ही का धड वागेल, याची काही खात्री नाही. आता तो म्हणतो की, 'तुझ्यासाठी गाडी पाठवू का परत ? तुला कुठं जायचं तर जाऊन ये–' पण ही मुळी घरातून बाहेर पडत नाही. कधी म्हणते, पोट दुखतं, कधी पोटात मळमळतं, कधी डोकं दुखतं. एकेक वेळेस पोट बरं नाही म्हणून दोनदोन दिवस काही खात नाही आणि मग भूक असह्य झाली किंवा लंघन करूनही पोट दुखायचे थांबत नाही म्हणून कोणत्याही वेळी भरपूर जेवते मग दुपारचे तीन वाजलेले असोत, संध्याकाळचे पाच किंवा रात्रीचे

अकरा !'

'—आणि तिच्या सासूबाई ? आहेत ना !'

' आहेत, अगदी म्हाताऱ्या झाल्यात पण त्या म्हणतात, ' बायकांचं हे बयच असं असतं की, त्यावेळी बायकांना अशा काही तक्रारी सुरू होतातच. एखाद वेळेस काही दिवसांनी त्या कमी होतील, तर एखाद वेळेस त्या वाढतच जातात.'

शैलाच्या डोक्यात लख्खकन प्रकाश पडला व इतक्या वेळ गप्प बसलेली शैला पुन्हा उफाळून बोलू लागली.

' ही आणखी एक खुळी समजूत ! या (मेनोपॉजच्या) काळात स्त्रियांना असा काही त्रास होतोच ही चुकीची समजूत आहे. अग स्त्रियांना जितकं जास्त दुय्यम पातळीवरून वागविलं जातं तितका त्यांना पाळी जाण्याच्या वेळी हा त्रास होतो. हा निव्वळ मानसिक त्रास आहे बरं का, विजया ! आतापर्यंत मी दिलेलं व्याख्यान (!) हे असंबद्ध नाही हं ! मानव म्हणून ज्या काही नैसर्गिक गोष्टी पुरुषाला कराव्याशा वाटतात, त्या स्त्रीलाही कराव्याशा वाटतील हे आपला समाज जाणत नाही. तिलाही प्रेमाची, मान्यतेची व वर्चस्वाचीही प्रेरणा पुरुषाप्रमाणेच निर्माण होते, हे समाज जाणत नाही. तरीसुद्धा मुलं लहान असतात, आईशिवाय त्यांचं चालत नाही तोपर्यंत तिची मान्यतेची, वर्चस्वाची प्रेरणा काहीशी तरी पूर्ण होते. ती तरुण असते तोपर्यंत नवऱ्याकडून तिची प्रेमाची प्रेरणाही पूर्ण झाल्यासारखी वाटते. मग पाळी गेली की, नवऱ्याला आपला उपयोग नाही, तो आपल्यावर प्रेम करणार नाही ! नेमक्या त्यांच्या या वयात मुलं मोठी झालेली असतात. नवरा त्याच्या कामात पूर्णपणे गुंतलेला असतो. प्रत्येकाला आपलं विश्व असतं—नसतं फक्त हिलाच ! मग आपली आता कोणाला गरज नाही, आपली उपयोगिता संपली, म्हणून ही दुखणी घेऊन बसते ! तोपर्यंत मुलेही मोठी होऊन त्यांना स्वतःच्या पंखांनी उडता येऊ लागते. म्हणजे त्यांनाही आता आईची गरज उरत नाही. ह्या सर्व विचारांनी तिला खिन्नता येते, नैराश्य येते. यासाठी मुख्य म्हणजे सुरुवातीपासुनच तिच्या आवडीचें, तिच्या क्षमतांना पोषक असे तिचे स्वतंत्र क्षेत्र असावे. ह्या क्षेत्राचे व्यवधान तिच्या मनात कायम राहते. आणि तिच्या कुटुंबातच तिला योग्य तो मान मिळावा, तिच्या गुणांची किंमत असावी,

तिच्या भावनांची कदर केली जावी, म्हणजे हया चाळिशीतील भावनिक-मानसिक समस्या निर्माण होणार नाहीत.

'अग विजया, परवा मी एका मानसशास्त्रज्ञाशी बोलत होते, तेव्हा तिच्या बोलण्यात असा उल्लेख आला की मानसशास्त्रीय संशोधनात असं आढळले आहे की, हया समस्या नोकरी-व्यवसाय करणाऱ्या स्त्रियांपेक्षा गृहिणींमधे जास्त आढळतात व गृहिणींमधेही ज्या गृहिणी 'बाळा, होऊ कशी उतराई, तुझ्यामुळे मी झाले आई' हया वृत्तीच्या असतात, त्यांच्यात हया समस्यांचं प्रमाण अधिक आढळतं!'

नी लि मा

आज फारच मोठा प्रश्न आयुष्यात निर्माण झाल्यानंतर विचार करीत बसलेली नीलिमा केव्हा आपल्या गत आयुष्याकडे दृष्टिक्षेप टाकू लागली, ते तिचे तिलाही लक्षात आले नाही.

बालपण तर किती सुखात गेले. काहीच चिंता काळजी नाही. माहेर श्रीमंत नाही. पण खाऊन-पिऊन सुखी. खाण्यापिण्याच्या मुलांना वाढविण्याच्या आई-वडिलांच्या काही इष्ट कल्पना होत्या...! त्यामुळे कोणत्याही गोष्टीसाठी नीलिमाला कधी हट्ट धरावा लागला नाही...! कसं कुणास ठाऊक पण एखादी गोष्ट तिच्या मनात यायची. उदा. आता एखादा नवीन स्कर्ट असावा, साडी लाल रंगाची असावी, की त्यानंतर येणाऱ्या प्रसंगाला आई नेमके तसेच आणित असे. मुलगी म्हणून कोणत्याही बाबतीत आई-वडिलांनी तिला कमीपणाची वागणूक दिली नव्हती. वयाच्या सातव्या वर्षी ज्या वडिलांनी स्वत: मागे धावून सायकल शिकवली त्याच वडिलांनी जेव्हा ती अठरा वर्षांची झाली तेव्हा, 'चल नीलिमा, स्कूटर शिकवतो.' असे म्हणून खरेच तिला स्कूटर शिकवली व गावातील स्कूटर चालविणाऱ्या पहिल्या पाच मुलीत तिला बसवले. बँकेत पाठवणे, पोष्टात पाठविणे वगैरे कितीतरी बाहेरची कामे लहान असल्यापासून वडील तिच्याकडून करवून

चेत. मुलगी असली म्हणून काय झालं, प्रत्येक माणसाला सगळं आलं पाहिज. जगात कोणत्याही बाबतीत अडता कामा नये. त्याचबरोबर घरात आईही तिला सतत कामात कधीच ठेवत नसे, पण अडीअडचणीच्या वेळी पाव्हणे-रावळे आल्यावर करता यायला हवं, त्याही बाबतीत अडता कामा नये, म्हणून आलटून-पलटून एखादे-एखादे काम करायला एखादा पदार्थ करायला सांगत असे. पुरणाच्या, गुळाच्या पोळ्या केल्या की शेवटच्या दोन तिला करायला देत असे. त्यामुळे नीलिमाचे घरात घराबाहेर सगळीकडे भरपूर कौतुक झालेच पण बी. एससी. नंतर लगेच लग्न झाले व सासरी गेली तेव्हा सासू-सासऱ्यासकट सर्व सासरच्या मंडळीनी तिची तोंडभरून स्तुती केली. वय लहान असून, अभ्यासात पुढे असून घरकामात, भाकरी-पुरणपोळी पासून कोणताही पदार्थ करण्यात, शिवणकाम, भरतकामात, स्कूटर चालविण्यात, बाहेरची कागद-पत्रांची कामे करण्यात, कशातच ती कमी पडत नव्हती. एकंदर तिचा उरक बघून सासूबाईंनी आपणहून केशवला म्हटले, 'अरे तिला पुढे शिकायच असेल तर शिकू दे, हुषार आहे. कशाला घरात बसवून ठेवायची ? आता तरुण वयात धडपड होते. थोडी फार मदत मीही करीन.' नीलिमाच्याही मनात होतेच. पण सासरच्यांनी आपणहून परवानगी दिली. शिवाय माहेरसारखाच सासरीही अनुभव आला, न मागता तिच्या मनासारखे घडून येण्याचा, त्यामुळे तिला फारच आनंद झाला. संसार व शिक्षण या दोनही डगरींवर तोल सांभाळीत ती एम. एससी. झाली. बी. एससी. ला मेरिटला आली होती, तशी एम. एससी. ला आली नाही. पण तरी आता संसार करून, घरातलं सगळं सांभाळून एम. एससी. ला काठावर का होईना, पण पहिला वर्ग मिळाला, यात इतर सर्वांनाच समाधान होते. त्यांनी तशी तिची समजूतही घातली, शिवाय एम. एससी. फायनलची परीक्षा देण्याच्यावेळी तिला चार महिने गेलेले होते. काहीसे डोहाळे लागलेले असूनही तिने अभ्यास केला, पहिला वर्ग मिळविला. हीही एक समाधानाची गोष्ट होती. त्यानंतरच्या ५ वर्षांत तिने शैक्षणिक क्षेत्रात लक्षणीय असे काहीही काम केले नाही ! मुख्य कारण म्हणजे दोन बाळंतपणे व तिचे स्वतःचे मत होते की, नोकरी, पैसा काय पुन्हा केव्हाही मिळून जातो. पण मुलांचे बालपण एकदा गेले की परत येत नाही. शिवाय सुरुवातीला त्याच्या परावलबनाच्या, असहायतेच्या

काळात, त्यांना आईचे प्रेम जितके जास्त मिळेल, तितकी त्यांची वाढ अधिक निरोगी होते, असे एका मानशास्त्रज्ञाचे मतही तिच्या वाचनात आले होते ! शिवाय घरात धाकट्या नणंदेचे लग्न, माहेरी धाकट्या भावाचे लग्न, पुढे त्यांचे सणवार डोहाळेजेवण, बारशी हचा सर्व एकंदर गडबडीत पाच वर्षांत आपण विद्यापीठात गेलो नाही, हे तिला खरेच वाटेना.

धाकटा मुलगा दोन वर्षांचा झाल्यावर मात्र तिने ठरविले की, आता पुन्हा वाचनाला, अभ्यासाला सुरुवात करायची. त्यानुसार केशवसह ती एकदा विद्यापीठातील तिच्या प्रोफेसरांना भेटली. त्यांनी तिचे फारच चांगले स्वागत केले काही काळ ती नुसती नियमितपणे वाचायला जात होती. नंतर प्रोफेसरांच्या सूचनेवरून तिने पी. एचडी. चा अभ्यास, संशोधन करण्याचा विचार केला व कामाला सुरुवातही केली. काय ते दिवस छान होते ! उजाडले-मावळले तर कळत नव्हतेच, पण घरातही सगळा आनंद होता सगळी जणं खुषीत होती. मुले मोठी होत होती. त्यांच्या बालपणाची मजा सगळेच जण लुटत होते. संशोधनाच्या कामात ती गुंतत जात होती. तिला ते फारच आवडू लागले होते. घरी आल्यावर संध्याकाळी केशवशी गप्पा मारताना, दिवसभराचा वृत्तांत, संशोधनातील गमतीजमती सांगताना व त्यांच्या संस्थेअधील कामाबद्दल चौकशी करण्यात तास-दोन तास केव्हा जात तिला कळत नसे. पुढे पुढे बाकी तिला विचारावेही लागायचे नाही. संशोधनाचे काम ज्या दिवशी होईल, त्या दिवशी केशव खुषीत असायचा व प्रशासकीय कामाचा त्याला कंटाळा. पण नोकरी म्हटल्यावर करायला तर लागायचेच.

एकंदरीत दृष्ट लागेल असा नीलिमाचा संसार होता. दोन सोन्यासारखी मुले ! तीही अभ्यासात, खेळात हळूहळू चमकू लागली. प्रकृतीने सुदृढ, हसरी-खेळकर. केशवचे तिच्यावर अपरंपार प्रेम, विश्वास व सासूसासऱ्यांचीही ती लाडकी. शिवाय संशोधनातील तिची गती पाहून तिचे प्रोफेसर खूष होते. अर्थात हचा सगळचा आघाड्यांवर काम करताना तिला शारीरिक ताण बराच पडत असे. पण प्रत्येक बाबतीत पूर्वयोजना, दूरदर्शीपणा मुख्यत: लागत असे. मुळात हुशार असलेल्या नीलिमाला ते काही फारसे अवघड गेले नाही. मात्र पीएच. डी. चे काम अपेक्षेपेक्षा बरेच लांबत होते. कारण इतर रिसर्च स्कॉलर्ससारखे ती त्याकडे पूर्ण वेळ लक्ष देऊ शकत

नव्हती. तिच्या सरांना जरी काही वेळा वाटले, तिने आपले काम लवकर आटोपावे. तरी तिला मात्र पूर्ण समाधान होते की, 'संसार सांभाळून मी उच्च शिक्षण घेत आहे.'

लग्नाचा बारावा वाढदिवस झाला तेव्हा ती केशवला म्हणालीसुद्धा, 'बारा वर्षांचे तप, बारा वर्षांची तपश्चर्या म्हणतात, तसे काही तपश्चर्या करण्याचे चटकेही बसले नाहीत, फळे मात्र सर्व बाजूंनी मिळताहेत असे दिसते.' लाडात येऊन केशव म्हणालासुद्धा, 'माझ्या राणीच्या हुशारीमुळे, तारतम्याने वागण्यामुळे मिळताहेत.'

संशोधनाचे काम जसजसे शेवटच्या टप्प्याला जवळ येऊ लागले तसतसा मात्र तिच्या प्रोफेसरांनी फारच लकडा लावला, 'आता मात्र लवकर संपवा घरी होत नसेल तर विद्यापीठात जास्त वेळ थांबत जा. पण आता सहा महिन्यांपेक्षा जास्त वेळ लावू नका.' हे तिने घरी सांगितल्यावर केशवसह सर्वांनीच त्या विचाराला पुष्टी जोडली व तिला सर्वतोतरी सहाय्य करण्याची, काही गैरसोय झाली तरी चालवून घेण्याची तयारी दर्शविली. हयानुसार ती संध्याकाळी जास्त वेळ थांबू लागली. त्यामुळे कामाला वेग चांगला येऊ लागला. तिलाही त्यात समाधान वाटू लागले. पण काही वेळा मात्र मार्गदर्शनार्थ थांबलेले तिचे सरच केव्हा विषयांतर करायचे व विद्यापीठातील इतर विषय चर्चेला यायचे ते तिलाही कळायचे नाही. अशा बोलण्यातूनच तिला माहिती मिळाली की, सहा महिन्यांनी तिच्याच विभागात व्याख्यात्याची जागा निर्माण होणार आहे व तोपर्यंत तिचे पीएच. डी. चे काम पूर्ण झाले तर तिची त्या जागेवर नेमणूक होण्याची बरीच शक्यता आहे. साहजिकच तिने पी. एचडी. चे काम अधिक नेटाने व चिकाटीने सुरू केले. वेळेनुसार तिच्या प्रोफेसरांनाही तिच्याबरोबर जास्त वेळ थांबावे लागे. त्यानंतर ते तिला घराच्या कोपऱ्यापर्यंत पोहचवीत असत. केशवला सवयीप्रमाणे ती सर्व गोष्टी सांगतच होती. काही वेळा तो म्हणे की, 'सरांना चहाला घरी का आणीत नाहीस ?'

'मी म्हणते त्यांना, पण आणखी उशीर होईल म्हणून ते नकार देतात व मीही मग आग्रह करीत नाही.'

टायपिंगची शेवटची काही पाने राहिली होती. ती अगदी खुषीत होती,

हाती घेतलेले काम पूर्ण होत आले म्हणून ! आणि त्याचवेळी तिच्याबद्दल तिच्या प्रोफेसरांवरून तिचे नातेवाईक काय बोलतात, ते ऐकायला आले पहिल्यांदा तर ती फारच चिडली. नंतर तिला अत्यंत उद्वेग आला की, 'हया माणसांना काही कळतं का ? अशी कशी मूर्खासारखी विधाने करतात ?' केशवने तिला समजावले की, 'जोपर्यंत मी तुला काही म्हणत नाही, तोपर्यंत इतरांच्या टीकेकडे तू का लक्ष देतेस ? मला तुझ्या चारित्र्याबद्दल पूर्ण खात्री आहे. यत्किंचितही शंका नाही.' केशवने असे समजावले की काही दिवस ती शांत असे, आपले काम पूर्ण करण्याच्या मागे लागे. परंतु पुन्हा कुठून तरी ऐकायला आले की, तीही अस्वस्थ होत असे. हळूहळू घरातील वातावरणही बिघडू लागले. 'इतके सगळेजण म्हणतात त्याअर्थी नक्कीच थोडेतरी पाणी मुरत असले पाहिजे. लोक पराचा कावळा करतील पण पर तरी आहे ना ?' वगैरे वगैरे

हया सगळया गोंधळात काम संपल्याचा जो आनंद तिला अपेक्षित होता, तो तिला मिळाला नाही. केवळ आता काही दिवस तरी विद्यापीठात जावे लागणार नाही व लोकनिंदा टळेल असे तिला वाटले. पण मग ती व्याख्यात्याची जागा ? स्वीकारायची की नाही ? तिला प्रश्नच पडला ! केशवजवळ विषय काढला असताना तो म्हणाला, 'मला तुझ्याबद्दल शंभर टक्के खात्री आहे. पण लोकांची तोंडे बंद करायची असतील तर तू ती नोकरी स्वीकारू नकोस. पीएच. डी. मिळाल्यावर काय तुला दुसऱ्या कोणत्याही कॉलेजमधेसुद्धा नोकरी मिळेल.' नीलिमाच्या मनात आले, 'लोकनिंदेला घाबरून रामाने सीतेचा त्याग केला. हा माझा राम माझा त्याग करीत नाही, पण नोकरीची संधी सोडायला सांगतोय ! प्रवृत्ती तोच, तिचा आविष्कार काहीसा बदलला इतकाच. पण का ? विवाहित स्त्री-पुरुषांची मैत्री ही केवळ मैत्रीसाठी असूच शकत नाही का ? त्याला विषयवासना लागलेलीच असेल, असे समाज का गृहीत धरतो ?'

नीलिमा पीएच. डी. ची पदवी मिळवण्यात यशस्वी झाली असली तरी या प्रश्नाचे उत्तर तिला सापडणार नव्हते.

मा लि नी बा ई

एफ. वाय. बी. ए. च्या वर्गात शिकणाऱ्या मालिनीबाई. त्यांना पहिल्या दिवशी वर्गात पाहिले तेव्हा मी काहीशी चकितच झाले. नंतर त्याच वर्गातील काही मुली माझ्याकडे आल्या असताना, गमतीने सांगत होत्या की, 'पहिल्या दिवशी त्या वर्गात आल्या तर आम्हाला वाटलं, हया प्रोफेसरबाईच आहेत. आम्ही सगळचा बोलायच्या गप्प झालो व नीटशा आपापल्या खुर्चीत बसलो· तोच हया कुठे जागा दिसते का बघत मागे गेल्या व एका खुर्चीत बसल्या.' हया प्रसंगावर मीही कौतुकमिश्रित हसले. 'हो, आहे खरें तसेच ! त्या माझ्याहीपेक्षा वयाने मोठया दिसताहेत'

पण आकर्षक, कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्व आहे ते, मलाही त्या बाईंबद्दल उत्सुकता निर्माण होऊ लागली. परंतु कळेल हळूहळू असे म्हणून मी मनाला सावकाशीने घ्यायला सांगितले. इतर मुलींच्याकडून समजले होते, त्या सकाळच्या वेळात कुठेतरी नोकरी करतात. दोन मोठी मुले आहेत. मोठा बंगला, गाडी आहे गुलाबाच्या फुलांची सुरेख बाग आहे. 'तरी हया बाई शिकायला का येतात ?' माझ्याही मनात हा प्रश्न निर्माण व्हायला व त्या बाई येईनाशा व्हायला एकच गाठ पडली. त्यामुळे मला जास्तच चुटपुट वाटली.

चार दिवस गेले नि एकदा त्या मार्गदर्शन केंद्रातच आल्या. मी चकित झाले. पण त्यांना पाहून मनाला समाधान वाटले.

'आजपर्यंत अनेक संकटे पार केली, घरातील अडी-अडचणी सोडवल्या, पण हयावेळी मात्र अशक्य झाले, सहन होईना म्हणून तुमची मदत घ्यायला आले.'

'जरूर. मला मदत करता आली तर आनंदच वाटेल. सांग, काय अडचण आहे ती.' पण मालिनीबाई काही बोलेनात शांत बसलेल्या. परंतु मनात खळबळ चालू असल्याचे चेहऱ्यावर मात्र दिसत होते.

'पहिल्यापासून सांगत या. म्हणजे तुम्हाला सुसंगतपणे सांगताही येईल व सहजपणे तुम्ही समस्यपर्यंत पोहोचाल.'

'मी मूळ विदर्भातील आहे. अमरावतीजवळच्या गावात आमचे घर

होते. तशी श्रीमंत घरातील म्हणायला हरकत नाही. पण जुन्या काळची शिस्त घरात होती. आईला, आजीला बोलायला-करायला काहीही वाव नव्हता. सर्व गोष्टी आजोबा ठरवीत व वडील त्याची कार्यवाही करत. स्त्रियांना घरात मान खरा, पण केवळ दाखवण्यापुरेसा. कोणतेही निर्णय घेण्याचा अधिकार नाही. मी अकरावीच्या वर्गात गेले नि लगेच माझे लग्न ठरवून टाकले. म्हणजे कसे काय ठरले मला कळलेसुद्धा नाही. पाहुणे काय आमच्याकडे नेहमीच येत असत. पण लग्न ठरल्यानंतर सांगण्यात आले की, 'तो गुरुवारी संध्याकाळी जेवायला आला होता, त्या मुलाशी...' 'पण तो तर किती मोठा दिसत होता...!' असे भीतभीतच मी उच्चारले, तर त्याबद्दल मोठ्या मंडळींची बोलणी खावी लागली. शिवाय मला शिकायचं आहे. कॉलेजमधे जायचे आहे, अशी मी केलेली तणतण स्वयंपाकघरातच राहिली. आजोबांपर्यंत पोहोचली असती, तर त्याचे फार वाईट परिणाम झाले असते. आमच्या आईची इच्छा होती, आपल्याच पंचक्रोशीतील चांगले स्थळ पहायचे, मुलगी दूर द्यायची नाही. पण तेही आजोबांनी जुमानले नाही. त्यांचे म्हणणे, असे स्थळ शोधून सापडायचे नाही. लाखात एक आहे. मुलगा शिकलेला आहे घरची सांपत्तिक स्थिती उत्तम आहे. त्याचे वडील कर्तृत्ववान आहेत, त्याच्यावर काहीही जबाबदारी नाही. मग मुलगी दूर जातेय व दोघात पंधरा वर्षांचे अंतर आहे हया गोष्टीकडे दुर्लक्ष करायला पाहिजे.

ठरल्याप्रमाणे लग्न थाटामाटात झाले, सणवार झाले. कालमानाने दोन मुले झाली. घरात पाव्हणे-रावळे, देवधर्म इतर सर्व गोष्टी इतक्या व्यवस्थित चालू होत्या की, मला शिकायची आवड आहे, असे सासऱ्यांच्या लक्षातही आले नसेल. आणि आले असते तरी शिकायला पाठविले नसतेच. कारण सासऱ्यांचे पक्के मत होते की, 'मुलींनी शिकून काय करायचे आहे? शेवटी त्यांना चूलमूलच सांभाळायचे आहे ना?' माहेरच्यांनाही आनंद झाला की, 'पोरगी रुळली संसारात म्हणून!' पण माझ्या मनात तो विचार खोल-वर रुजला होता. फक्त संधी मिळाली की तो बाहेर काढायचा म्हणून मनाच्या कपाटात खोल कप्प्यात लपवून ठेवला होता जणू!

मुले झाल्यानतर सासऱ्यांचेही काम वाढले, त्यांना शिस्त वळण लाव-ण्याचे! माझ्या हातात तर पैसा नसायचाच. त्यामुळे मुलांचे लाड करता

यायचे नाहीत. घरात खायला-प्यायला किंवा इतर कशालाच कमी नव्हते. पण ते सगळे ठराविक वेळी, ठराविक पद्धतीतेच करावे लागे. मुलांचेवडील फारसे घरातच नसायचे. असले तरी, तेही कधी वडिलांच्या कारभारात ढवळाढवळ करायचे नाहीत. व आजोबाही कधी मुलांना त्यांच्याकडे पाठवायचे नाहीत, 'विचारा तुमच्या बाबांना म्हणून.'

सासऱ्यांच्या आजारपणातील दिवस आठवले तरी अजूनही अंगावर काटा येतो. दहा वर्षं अंथरुणाला खिळून होते. पैसा भरपूर होता. पण नर्स वगैरे ठेवणे त्याना पसंत नव्हते. त्यांचे म्हणणे मुले-सुना, नातवंडे ही कशासाठी ? म्हातारपणी सेवा करायलाच. मुले शाळेत जायची, मिस्टर कामावर जायचे म्हणजे शेवटी सगळी उठबस मलाच करावी लागे. सेवा करायला माझी काहीही हरकत नव्हती. परंतु सतत जणू काही नाकात वेसण घातलेले जनावरच मी ! जराही माझी मला मोकळीक मिळत नसे. कुठेही बाहेर तर जाता येत नव्हतेच, पण माझें मला काही होत असले तरी सासऱ्यांच्या सेवेतून रजा मिळत नसे. शिक्षणाचे नाव काढणें तर अशक्यच !

सासऱ्यांच्यानंतर त्यांची जागा हयांनी घेतली आहे. घरातल्या अनेक गोष्टीची त्यांना माहिती नव्हती, ती मी करून दिली. पण आता मात्र "मालक" या नात्यानेच संपूर्ण अधिकार गाजवतात. वडिलांसारखाच आरडाओरडा करणे, रागावणे चालू आहे.

सासऱ्यांना जाऊन आता पाच वर्षे झाली. मुलेही कॉलेजमधे जाऊ लागली. मध्यंतरीच्या काळात मी दोन गोष्टी केल्या. तुमच्या एस. एन. डी. टी. त असलेल्या मुक्त विद्यापीठाची परीक्षा दिली व योगासने शिकले ! योगासनांमुळे मनःशांती मिळते असे ऐकले होते. त्यानंतर घरी एक दोन मुलींना शिकवता शिकवता चांगला क्लास चालू लागला. तरीसुद्धा दुपारचा वेळ मोकळा असतो, त्या वेळात शिकावे हया हेतूने मी कॉलेज जॉईन केलं.

'मग इथल्या मुली चिडवतात का ? त्रास देतात का ?' या सगळ्या रामायणात त्यांची आता नेमकी काय समस्या असावी, ती शोधण्याचा मी प्रयत्न करत होते.

'छेः हो ! मुली सगळ्या फार चांगल्या आहेत. कुणीही मला त्रास देत नाहीत व एखादीने थट्टा केली तरी मी मनावर घेतली नाही.'

'प्रश्न माझा कौटुंबिक आहे. माझी दोनही मुले बी. एससी. करताहेत. एक शेवटच्या वर्षाला व दुसरा पहिल्या वर्षाला. मोठ्याला बी. एससी. नंतर एम. बी. ए. चा कोर्स करायचा आहे व एका फॅक्टरीत मॅनेजरची नोकरी करायची आहे. धाकट्याला बी. एससी. (ॲग्री) करून स्वत:चा पोल्ट्री फॉर्म सुरू करायचा आहे. माझ्या मिस्टरांची इच्छा आहे की, एकाने तरी इंजिनियर व्हावे. इतके दिवस वाटायचे धाकटा तरी इंजिनियरिंगला जाईल व म्हणून ते गप्प होते. पण आता तोही बी. एससी ला गेला म्हटल्यावर ते थोरल्याच्या मागे लागले आहेत, तू बी. एससी. नंतर इन्स्ट्रुमेंटेशन इंजिनिअरिंगला जा पण त्याला ते करायचे नाही. तो माझ्यावर संतापतो, बोलतो. वडिलांचा, आजोबांचा हा एक गुण त्याच्यात आला आहे. इतका झाला आहे की मला भीती वाटते की, हा रागाच्या भरात स्वत:च्या जिवाचे बरेवाईट करून घेईल की काय ? मिस्टरांना सांगायला गेलं की, ते म्हणतात, 'तुझीच फूस आहे मुलांना, त्यामुळे ती माझे ऐकत नाहीत. शिवाय आता तू नाही का माझ्या मनाविरुद्ध कॉलेजमधे नाव घातलं आहेस ? मग मुलांनी तरी माझी इच्छा पाळलीच पाहिजे असे कुठे आहे ? आता ह्यापुढे तुला तरी शिकून काय करायचे आहे ? तरी शिकतेच आहेस ना ? पण तुझ्या हुषा बाहेर पडण्यामुळे मुले मात्र पूर्ण बिघडणार आहेत. त्यांच्यावर कुणाचेच लक्ष राहणार नाही व ती अगदी हाताबाहेर जाणार आहेत.' आता मला मोठा प्रश्न पडला आहे की, इतक्या हौसेने, इतक्या वर्षांनी मी कॉलेजमधे नाव घातले आहे, तर सोडून देऊ का ? आणि त्यामुळे मुले सुधारतील.'

'छे: ! एकंदर तुमचा पूर्वेतिहास माझ्या लक्षात आला आहे. आपण घुन्हा काही वेळा भेटू, बोलू. तुमच्या मिस्टरांशी, मुलांशीही मला बोलावे लागेल. पण मुख्यत: दोनतीन समीकरणे चुकीची मांडली जात असलेली दिसताहेत. एक म्हणजे मुले ऐकत नाहीत, म्हणजे आईचीच फूस, दुसरे म्हणजे मुले बिघडली व त्याला कारण आईचे शिक्षण. तिसरे म्हणजे इंजिनिअरिंग हाच सर्वोत्तम अभ्यासक्रम आहे. आपण शांतपणे या सगळ्या गोष्टींवर विचार करून मार्ग काढू.

सामाजिक प्रतिष्ठा आणि स्त्रीविषयीची अनादराची भावना या मूलभूत गोष्टींवरच मालिनीबाईंची कथा उभी होती !

प्रज्ञाच्या सासूबाई

एकदा एक सून आपल्या सासूची तक्रार घेऊन आली होती. (त्यात काही नवल नाही. कोणतीही सून दुसरं काय करते ?) पण हया सुनेची तक्रार प्रेमळ स्वरूपाची होती.

' माझ्या सासूबाईचे वय सध्या पन्नास आहे. पाच वर्षांपूर्वी माझे लग्न झाले तेव्हा जेमतेम पंचेचाळीस इतकेच असेल. त्यावेळी माझ्या यजमानांचे वय पंचवीस व माझे तेवीस. माझी नणंद ही भावापेक्षा पाच वर्षांनी लहान आहे. परंतु लग्न सतराव्या वर्षीच सासूबाईंनी करून टाकलं. घाईघाईने कसे तरी उरकले असे नाही. स्थळ चांगले पाहून दिले. पण तिला बी. एस्सी. पूर्ण करायचे होते ते करता आले नाही. त्या मुलाची आई कॅन्सरने आजारी होती. त्यामुळे तिला एकुलत्या एक मुलाचे आपल्या डोळ्यादेखत लग्न करायचे होते. तो मुलगा इंजिनिअर झाला. चांगल्या फॅक्ट्ररीत नोकरीला लागला व त्याच्या लग्नाचे पाहिले.

' लग्नात माझं वय काही माझ्या नणंदेइतकं लहान नव्हतं. तिच्यावर परिस्थितीने जबाबदारी पडली, पण माझ्यावर तसे काहीही कारण नसताना जबाबदारी टाकली गेली. लग्नाच्या आठव्या दिवसापासून मी घरात स्वयंपाकपाणी करू लागले व इतर गोष्टीही हळूहळू अंगावर पडतच गेल्या. सासूबाई मुळी म्हणतच असत, ' आता सून आली आहे घरात. घर तिचे आहे, मी कशातही लक्ष घालणार नाही. देवदेव करणार.' सुरवातीला हौसेहौसेने मीही करीत असे. सासू-सासरे कौतुक करीत होते. यजमान सारखे माझ्याभोवती गोंडा घोळत होते. कोणत्याही युवतीच्या स्वप्नातील परिस्थिती माझ्या सत्यात उतरली होती.

' सासूबाई काम करीत नाहीत, मला मदत करीत नाहीत. सारख्या देवळात जातात, जप करतात. म्हणून मला काडीमात्र तक्रार करायची नाही. त्यांना जे पाहिजे ते त्या करू शकतात. जोपर्यंत मला कुठल्याही प्रकारे त्रास देत नाहीत, छळ करीत नाहीत, टोचून बोलत नाहीत. तोपर्यंत त्यांनी काय

केले नाही, तरी माझी कुठल्याही प्रकारे तक्रार नाही, पण गेली पाच वर्षे मी घराची जबाबदारी सांभाळता-सांभाळता बारकाईने निरीक्षणही करते आहे व आता मला त्यांचीच काळजी वाटू लागली आहे. त्यांना कसे परत घरात आणावे, हे मला कळेनासे झाले आहे व म्हणून मी मार्गदर्शनार्थ आले आहे.

'सासूबाईंचे लग्न लहान वयात झाले. माहेरच्या सधन वडिलांनी सालंकृत कन्यादान करून दिले. शिवाय माझे सासरे डॉक्टर त्यामुळे घरात पैशाची कमी नाही. चांदीची, स्टीलची, काचेची अशी तऱ्हेतऱ्हेची भांडी, सेटस् आमच्याकडे आहेत. सोन्याचे दागिनेही चार वेगवेगळ्या प्रकारचे सासूबाईंजवळ आहेत. जरा मुले सुटी झाली म्हटल्यावर त्यांनी घरी बसून अभ्यास केला व मराठीत एम. ए. केले. वीस वर्षांपूर्वी त्यांना फर्स्ट क्लास मिळाला होता. त्यानंतर काही दिवस त्यांनी स्वेच्छेने संतवाङ्मयाचे वाचन चालू ठेवले, त्यानंतर काही दिवस त्या गाण्याच्या क्लासलाही जात होत्या. भावगीते भक्तिगीते चांगली म्हणत होत्या. दोनही मुलांच्या शाळा संपल्या व सासूबाईंना आणखीनच वेळ मोकळा मिळू लागला. तरी त्यांनी घरात नोकर-चाकर ठेवले नाहीत. एवढ्या मोठ्या घराची स्वच्छता त्या स्वत: करीत असत व घर अगदी चकचकीत ठेवीत असत. मशीनमध्ये धुणे स्वत: धुवायचे. फक्त ते वाळत घालायला व खरकटी भांडी घासायला त्यांनी बाई ठेवलेली आहे. एकला सासरे दवाखाना संपवून घरी यायचे तर नुकतेच काम आटोपून त्यांनी दोघांची पाने घेतलेली असत. त्यानंतर मात्र पाचला मुले घरी येतील तेंव्हा चहा खाणे व रात्री नऊ च्या पुढे स्वयंपाकला सुरुवात करणे, याखेरीज त्यांना काम नसे. मधल्या वेळात मैत्रिणींकडे, नातेवाईकांकडे जावे, तर त्यांना त्या कुचाळक्या करणे, चकाटचा पिटणे, निंदानालस्ती करणे आवडत नसे म्हणून त्या एका बाईंकडे जाऊ लागल्या. तेथे काही धार्मिक ग्रंथाचे वाचन, देवळात जाऊन देवदर्शन घेणे असे सुरू झाले. मात्र हळूहळू हया गोष्टी इतक्या वाढू लागल्या की कधी नव्हे ते दुपारी हॉस्पिटलमध्ये सासरे निघाले की, त्या त्यांच्यापुढे तयार होऊन उभ्या असत व 'जाताना मला तेवढं आक्कांच्याकडं सोडा.' म्हणत असत. मुलांच्या खाण्यापिण्याची व्यवस्था टेबलावर केलेली असे व नोकरी करणारी आई असली की, मुले

घेतातच की नाही हाताने ? असे म्हणत. म्हणजे दुपारी चार तासांचा सलग वेळ त्यांना भवितमार्गासाठी मिळत असे.

माझ्या लग्नानंतर त्या सकाळचाही वेळ ध्यानासाठी देऊ लागल्या आहेत व गेल्या काही दिवसात तर त्याचं हे देवदेव इतकं वाढले आहे की, अंगावरचं सोनं-नाणं काढून ठेवलं आहे, जरीच्या, सिल्कच्या साड्या नेसणं सोडून दिले आहे व एखाद्या संन्यासिनीसारख्या सुती पांढऱ्या साड्या नेसतात. तोंडाने म्हणतात की आता माझा वानप्रस्थाश्रम चालू आहे. सासरे निराश होऊन म्हणतात की आमच्या बायकोने संसार सोडलाच. ती विरक्त आहे. रात्री-अपरात्री केव्हाही उठतात, कधी १२ वाजता, कधी २ वाजता व डोक्यावरून अंघोळ करून, केस मोकळे सोडून जप करायला बसतात. कधी मनात, कधी मोठ्याने

'मी माझ्या आई-वडिलांचे वागणे पाहते आहे. आजी-आजोबांचे सुखसंवाद माझ्या आठवणीत घडलेले आहेत. गेल्या काही दिवसात तर सासूसासऱ्यांच्या समवयस्क लोकांचं वागणं मी बारकाईने न्याहाळते आहे. त्यात मला सासू-सासऱ्यांचे वागण्याचे वेगळेपण जाणवते आहे व कशामुळे, का ते मला सांगता येत नाही, पण कुठंतरी खटकतं. मी माझ्या नवऱ्याजवळ, नणंदेजवळ माझी वेदना बोलून दाखविली तर मला उत्तर मिळाले, 'आईचा हा भाविकपणा काय नवीन आहे ? वय वाढेल तसा वाढतच जायचा.' पण माझे काही समाधान झाले नाही.'

'प्रज्ञा ! अग तुझे विचार ऐकून फार आनंद झाला मला ! एक सून आपल्या सासूबद्दल इतक्या कळकळीने बोलते आहे, हे पाहूनच मला फार समाधान वाटते. तू म्हणतेस ते खरं असण्याची शक्यता बरीच आहे, की त्यांचा हा 'देव' सुखासमाधानातून आलेला नसेल. त्याच्यामागे काहीतरी दुःख, यातना किंवा पोकळी पडलेली असेल. आपण शोधून काढू ते ! पण त्यासाठी मला तुझ्या सासू-सासऱ्यांशी, नवऱ्याशी, नणंदेशी बोलावे लागेल तुझे तर सर्वात जास्त सहकार्य लागेल.

'तू सांगितलेस त्यावरून एक शक्यता अशी वाटते आहे की, घरात पैशाला कमी नव्हते त्यामुळे तुझ्या सासूबाईंना घरात आपण काहीतरी करावे, कौतुक मिळवावे, मान्यता मिळवावी, असे काहीच नसेल, विशेषत: चाळीशी-

नंतर स्त्रियांची पाळी जाण्याची वेळ असते. प्रत्येक स्त्रीत पाळी येण्याचा काळ जसा वेगळा असतो, मानसिक अस्वस्थतेचा असतो, तसाच जाण्याचाही वेगळा असतो. त्याच सुमारास साधारणपणे मुलांची असहाय्यता, परावलंबन संपलेले असते. पतीला पदोन्नती मिळून तो स्वत:च्या व्यवसायात रममाण झालेला असतो. पूर्वीसारखा तिच्या मागंमागं रहात नाही. अशावेळी चूलमूल या एकीकडं कार्य नसलेल्या स्त्रियांच्या जीवनात कमालीची पोकळी निर्माण होते. त्यात पाळी जाणार या कल्पनेनं तिला वाटतं आपण आता सर्वार्थानं निरुपयोगी होणार, व अशा वेळी आपल्या अस्तित्वाची जाणीव इतरांना करून देण्याची तिच्या मनात तीव्र इच्छा निर्माण होते. शरीर मनाला साथ देते व तक्रारी सुरू होतात. तुझ्या सासूबाईंनी आपले वेगळेपण पटविण्यासाठी हा भक्तिमार्ग पत्करलेला दिसतोय व ते दिवसेंदिवस प्रबळ व्हावे यासाठी तो मार्ग अधिक वाढविला. तू म्हणतेस तसे त्यांना त्याच्यातून बाहेर काढता येईल, पण त्यांना रुचेल, आवडेल व त्यांची मान्यतेची प्रेरणा पूर्णांशाने खरी होईल अशी जबरदस्त काही तरी गोष्ट शोधून काढायला हवी. त्यासाठी मला तुझ्या कुटुंबियांकडून व त्यांच्या माहेरच्या मंडळींशीही बोलावे लागेल. बालपणीच्या काही हकिकतींमधूनसुद्धा त्यांना मोठेपणा कशात वाटेल ते शोधून काढता येईल.'

आपले अस्तित्व टिकवण्याचा, सिद्ध करण्याचा, आपले स्वतंत्र विश्व निर्माण करण्याचा प्रज्ञाच्या सासुबाईंचा प्रयत्नही तसा अगदीच विरळा नाही.

पश्चिम क्षितिजावर...

सकाळी दोन मुलांच्या शिकवण्या झाल्यावर बाबासाहेबांच्या मनात आले, आत्ताच जावं का काकासाहेबांकडं ? काल संध्याकाळी दादासाहेबांनी येऊन सांगितल्यापासून त्यांना चैन पडत नव्हती. 'बघू तर खरं सांगून. उपयोग झाला तर ठीकच ! नाहीतर थोडा वेळ वादविवाद होईल, काही दिवस कट्टा, अबोला येईल. परंतु पुन्हा गेल्या पन्नास वर्षांची ही खट्टीमिट्टी मैत्री पुढे चालू राहील. इंटरची परीक्षा झाल्यावर दोघेही आदर्श विद्यालयात एकदम नोकरीला लागले. तो शास्त्र विषयाचा, तर मी भाषा विषयाचा शिक्षक. तेव्हापासून मैत्री तिळातिळानं वाढतच गेली. हळूहळू आम्ही दोघं परस्परांना भाऊ-भाऊ म्हणू लागलो. दोघांकडच्या सोयरसुतकाच्या प्रसंगात परस्परांना साथ देऊ लागले. मग एवढं सांगायचा मला अधिकार नाही ? पण तरीसुद्धा आज जरा कठीणच वाटतंय ! काकाबाहेबांच्या सुनेची बाजू घेऊन त्यांच्याशी भांडायचं ? एखाद वेळेस आपल्याला फार जड जाईल...जायचं ! तरीसुद्धा जायचंच !'

कोट-टोपी घालता घालता बाबासाहेबांच्या मनात उलटसुलट विचार चालू होते. पण शेवटी निश्चय झालाच ! त्यामुळं नंतरचें शांताबाईंना उद्देशून उच्चारलेले वाक्य जरा जास्तच जोरात आले-

'मी जाऊन येतो ग काकासाहेबांकडे. आज एखाद वेळेस जरा वेळ लागेल. काळजी करू नकोस !' असं म्हणत ते अर्धा जिना उतरलेसुद्धा. ताक करत बसलेल्या शांताबाई जमिनीवर हात टेकत उठून दुधाचा कप भरून बाहेर

येईपर्यंत बाबासाहेब कोपऱ्यापर्यंत गेलेले त्यांना खिडकीतून दिसले.

'इतक्यात तर शिकवणीची मुले गेली. रोजच्याप्रमाणं स्वयंपाकघरात येतील म्हणून मी तशीच ताक करत बसले. आज इतकं काय बाई तातडीचं काम ? काही बोललेही नव्हते.' मनातले विचार व कपातले दूध घेऊन तसेच त्या स्वयंपाकघरात गेल्या व ताक घुसळणे चालू केले.

बाबासाहेब काकासाहेबांकडे पोहोचले तर काकासाहेब व रमाबाई नेहमीप्रमाणेच दिवाणखान्यातील सोफ्याच्या खुर्च्यांवर मांडी घालून बसलेले होते. बाबासाहेबांना दारात पहाताच नेहमीपेक्षाही जास्त मोठ्या तोंडाने त्यांचे स्वागत झाले.

'आम्हीच तुमच्याकडं यायच्या विचारात होतो. तुम्ही आलात हे फार बरं झालं ! आज काय शिकवणी लवकर आटोपलीत ?' काकासाहेबच बोलत होते. बाबासाहेबांची रस्त्याने येताना विचारांची जुळणी करून झाली असली तरी नक्की कुठं सुरवात करावी, हया विचारात ते होते व काहीशा रागानेच आले होते.

'तुमचं काम मला कळलं व म्हणून मीच तुमच्याकडं आलो.' बाबासाहेबांच्या हया शब्दांनी काकासाहेब-रमाबाई अवाक् होऊन त्यांच्याकडे पाहू लागले.

'सूनबाई-नीला- वेगळी राहू लागलीय हेच सांगायला तुम्ही येणार होतात ना ?'

'हो ना ! अहो, पंधरा वर्षं तिच्यासाठी मी खस्ता काढल्या नि आता म्हातारपणी आम्हाला टाकून ती निघून गेली. हल्लीच्या पोरींना सासू-सासऱ्यांचं करायलाच नको, हे खरं ! राजाराणीला सुटसुटीत रहायला हवं !' रमाबाईंना काहीसं बोलू द्यावं म्हणून बाबासाहेब गप्प बसले. परंतु त्यांना फार वेळ काही गप्प राहवेना.

'अहो वहिनी, तुम्ही म्हणता तसा हल्लीच्या मुलींसारखा तुटकपणा तिच्यात असता तर ती लग्नानंतर पहिल्या वर्षभरातच वेगळी झाली असती आणि पंधरा वर्षं तुम्ही खस्ता काढल्यात आणि तिला काहीच सहन करावं लागलं नाही का ? काय हो वहिनी, अगदी मागल्या महिन्यात मी तुमच्याकडं आलो होतो तोपर्यंत तुमच्या सुनेचं तुम्ही आल्यागेल्याजवळ कौतुक करत

होतात. " घरची-बाहेरची सगळी कामं तीच करते. मुलांची जबाबदारी तुमच्यावर टाकत नाही. शिवाय आल्यागेल्याचे व्यवस्थित स्वागत करते ! मलांचं, घरातल्यांचं खाणंपिणं छान सांभाळते. मुलांच्या तब्बेती कशा छान झाल्या आहेत. त्यांचे अभ्यासही स्वत: स्वयंपाक न करता घेते. नोकरी करते पण तिचं एक तत्त्व आहे. सकाळच्या वेळात कामावर जायचे नाही." वगैरे वगैरे...'

'तो माझा मोठेपणा होता हो ! ती काही इतकी चांगली नव्हती ! पण कुठं बारीकसारीक गोष्टीत खुसपटं काढून घराची शांतता बिघडवायची ? शिवाय लोकांना कुचेष्टा, टिंगल करायला विषय द्यायचा ? त्यापेक्षा सुनेचं कौतुक लोकांजवळ केलं की त्यांनाही माझा हेवा वाटू लागतो.'

'आता मात्र तुम्हीच तिचा हेवा करताय असं मला वाटायला लागलं ! " बंधन नको, बंधन नको " चा जप करत असताना तुमच्या मनात नक्कीच असणार की, तिचं आपल्यावाचून अडावं, तिनं तुम्हाला काही कामं सांगावी, आम्ही काहीही काम करणार नाही म्हणालात तरी तिनं तुम्हाला काम करण्याची विनंती करावी, ही तुमची अपेक्षा होती. लोकांजवळ तिचं कौतुक करण्याचंही कारण " सुनेचं कौतुक करणारी जगावेगळी सासू " असं तुमचं लोकांनी कौतुक करावं हेच होतं !'

'अहो भाऊजी, काय हे बोलताहात तुम्ही ? कधी तरी शक्य आहे का हे असं ?'

'मला तिच्या लग्नापासूनचे अनेक प्रसंग आत्ता घडल्यासारखे डोळ्यांसमोर उभे रहाताहेत. तिच्या लग्नानंतर तुम्हीच नीलेशला आग्रह केलात, तिला कॉलेजला घालण्याचा ! " घरात बसवून कशाला ठेवायची ? शिवाय दिवसभर आम्ही दोघं नि ती घरात ! ती अगदीच कंटाळून जाईल. त्यापेक्षा कॉलेजमधे समवयस्कांच्यात तिचं मन रमेल. शिवाय चार माणसांचं काम ते काय आहे ? मी बरंचसं करीनच. आत्ताशी मला पन्नास पूर्ण होताहेत." ज्या दिवशी ती दोघं कॉलेजमधे जाऊन प्रवेश घेऊन आली त्या दिवशी किती आनंदात आली होती ती ! मी आलेला होतो तेव्हा ! काय तोंडसुख घेतलंत तुम्ही तिच्यावर ! " कॉलेजच्या अभ्यासाच्या नावाखाली कामाला सुटी मिळणार नाही, सांगून ठेवते. निलेशचा डबा तुलाच करायला हवा. कॉलेजला

जाण्यापूर्वी घरातील स्वयंपाकपाणी व इतर सर्व कामे पूर्ण करायची. नाहीतर घरात सासू राबते आहे आणि स्वत: बागडायला मोकळी ! इतकी वर्षं मी संसाराच्या बंधनात राहिलेच ! आता मुलाचं लग्न करून दिलं आहे, ते त्याच्या संसारात अडकायला नाही. मला वाटलं तर मी काम करीन, पण माझ्यावाटचं काम काढून ठेवायचं नाही ?" वगैरे वगैरे. त्या पोरीच्या डोळ्यात टचकन् पाणी उभं राहिलेलं मी पाहिलं आहे. अवघी वीस वर्षांची कोवळी पोर ! आणि किती तोडून बोललात तिला ! तेही तुमच्या आधीच्या बोल-ण्याशी पूर्णत: विसंगत ! माझ्यादेखत बोलल्यामुळे मला मात्र फार कानकोंडं झाल होतं. पण त्या नवीन पोरीच्यादेखत मी तुम्हाला थाबवलं असतं तर तुमचा अपमान झाला असता. तरी मागाहून मी तुम्हाला एक वाक्य बोलल्याचं आठवत असेल- वहिनी, आज जरा जास्तच कडक झालात. पण जरा जपून बरं का ?

' पण त्यानंतर तिने कॉलेजचे कारण तुमच्या कोणत्याही सणावाराला, कुळधर्म कुळाचाराला किंवा तुमच्याकडं सतत येणाऱ्या पाहुण्यांच्या सरब-राईच्या वेळीही पुढं केलं नाही. बी० ए० चं शिक्षण पूर्ण झाल्यावर एकीकडे शाळेत नोकरी करून ती एम० ए० झाली. मध्यंतरीच्या काळात दोन मुले झाली तिला ! त्यांचो उस्तवार तिनेच काढली. तुम्ही घरात असून तुम्हाला बंधन नको म्हणून ती मुलांना पाळणाघरात ठेवत असे. तुम्हाला काम सांगा-यला नको म्हणून मदतीला बाई ठेवली तिने ! तिची बाळंतपणं माहेरीच झाली. कधी तिचं मोठं दुखणं, ऑपरेशन झाल्याचं मी तरी ऐकलं नाही की ज्यामुळं तुम्हाला तिच्या खस्ता काढाव्या लागल्या. मुलांना पाळणाघरात पोहो-चवा, शाळेत पोहोचवा, त्यांचे अभ्यास घ्या, त्यांच्या खाण्यापिण्याचे लाड करा पुन्हा मुलांना घरी घेऊन या व आल्या आल्या पदर बांधून ओटचाशी उभे रहा. तुमच्याकडं कुणीतरी पाहुणे आलेले असणार व तुम्ही त्यांना आग्रहाने थांबवून घेतलेलं असणारच ! नीला आता येईल व आली की चहा करेलच ! शिवाय आमच्याकडे पाच वाजताचं खाणंही लागतंच सर्वांना !

' आमचे तऱ्हेतऱ्हेचे मित्र ! कुणी पान खात येणार, तावातावानं बोल-ताना लाल थुंकी उडणार, कुणी पोथी घेऊन येणार, तुम्हाला वाचून दाख-विणार, तुम्ही दोघं ऐकत बसणार... मग घरात घाईची वेळ वगैरे काहीही

विचार उरणार नाही. कुणी सडाफटिंग राजकारणावर मोठमोठ्यानं बोलून, वाद करून सर्वांनाच मनस्ताप करणार. तरी ती त्याला जाताना मसाले, लोणची, मेतकूट आवर्जून देणार. का तर त्याला बायको नाही व मुलगी लग्न होऊन सासरी गेलेली. तसं म्हटलं तर हया कामाची जबाबदारी नीलावर आहे का ? पण तुम्हाला खूष ठेवण्यासाठी ती तुमच्या सगळ्या नातेवाईकांचा, मित्रमंडळींचा योग्य तो पाहुणचार करते. कुणाशीही संबंध तोडले नाही. सगळी तुमची पूर्वीपासूनची जा-ये ची वर्दळ चालू ठेवली आहे. कुणाला चहा बिनसाखरेचा तर कुणाला डबल साखरेचा, कुणाला कॉफी तर कुणाला ताजं ताक ! प्रत्येकाच्या सवयी, आवडी-निवडी लक्षात ठेवून, हसतमुखानं आल्यागेल्यांचे स्वागत करणारी, विचारपूस करणारी... तुम्हाला कोणत्याही प्रकारे कष्ट होणार नाहीत हयाची खबरदारी घेणारी, स्वत:चा संसार नीटनेटका व्यवस्थित करणारी, नवऱ्याची-मुलांची तैनात ठेवणारी सून शोधून सापडणार नाही, वहिनी ! वहिनी, तुमची एक मैत्रीण विमलाताई- मला भेटल्या होत्या. त्या म्हणाल्या ते खरं आहे की, ' दैवं देतं नि कर्म नेतं " अशी तुमची अवस्था आहे.

' चुकलं असेल पोरीचं ! मी " नाही " म्हणत नाही. तीही माणूसच आहे. लहान वयात लग्न झालं. माहेर-सासरच्या वातावरणात, सवयी-पद्धतींमधे फरक पडतो. एकदम कशा सगळ्या गोष्टी जमणार ? लहान वयातही काहीशा मोठेपणानं (पोक्तपणानेच) सर्व घर सांभाळीत होती, ते तुम्हाला सोयीचं होतं म्हणून हवसं वाटलं, त्यांचं कौतुक केलंत. पण त्याच-बरोबर तुम्हाला तिच्यात अवखळपणा, खेळकरपणा, विनोदबुद्धीही हवी होती. ती नाही म्हणून तक्रार करीत बसलात. एकदर भोवतालच्या चार सुना पाहून तरी बेरीज वजाबाकीचं गणित मांडायचं होतंत. आमचे केस उन्हात वाळवून नव्हे तर अनुभवाने पांढरे झाले आहेत, हे केवळ शब्दच वारंवार वापरायचे का ? आपल्या वागण्यात सारासार विचार, अनुभव-सिद्धता कुठे नको का यायला ? ज्या निमित्तमात्र प्रसंगानंतर तिला घराबाहेर काढलीत, त्यातसुद्धा मला तर तुमचा हेकटपणा, हट्टीपणा, अरेरावी, हुकूम-शाहीच दिसत आहे.

' तुमची लेक-जावई, नातवंडं जेवायला येणार म्हणून तिला न

विचारता...सांगता स्वयंपाकाला बाई सांगून आलात. तुम्हाला माहिती आहे, तिला बाई बोलावलेली आवडत नाही. "माझी माणसं यायची आहेत, मला होत नाही, म्हणून मी आपली बाई बोलावली." हा तुमचा तोरा! तुमची लेक-जावई, नातवंडं तिची कुणीच नाहीत का? तशी वागली आहे का ती कधी? आणि तिच्यात उरका आहे ना भरपूर! तुम्हाला सांगते का ती कधी काम? शिवाय आणखी तिच्या मनाविरुद्ध झाले म्हणून तुम्ही "तुमचे पैसे" देऊन सारं निस्तरलंत! पण "तुमचे पैसे" आले कुठले वेगळे! सगळा संसार ते दोघे चालवताहेत, म्हणून तुमचे पेन्शनचे दीडशे रुपये शिल्लक राहतात ना? तर त्या दीडशे रुपयांचा एवढा तोरा करता? खरं तर स्वयंपाकाची बाई नको म्हणणाऱ्या सुनेचं सासूने किती कौतुक करायला हवे! पण तुम्हाला मुळी प्रत्येक गोष्टीत स्वतःचाच शब्द खरा करायची सवय झाली आहे ना!

'आणि तू रे! त्या दोघांना सांगतोस की, "दारावर पाटी माझ्या नावाची आहे. घर माझं आहे. मी सांगेन त्याप्रमाणेच येथील व्यवहार व्हायला हवे आहेत." भाड्याचं घर आहे, तरी ही ऐट, स्वतःचं असतं तर काय केलं असतंस? खरोखर त्यांनी स्वतःच्या नावाची पाटी लावली नाही, हा त्यांचा मोठेपणा! प्रत्येक बाबतीत तुमचा योग्य तो मान दाखवताहेत, आदर ठेवताहेत. पण तुम्हाला त्याची किंमत नाही इतकं करूनही तुम्ही जर त्यांना "हे घर तुमचं नाही," हेच ऐकवणार असलात तर स्वतःचं हक्काचं घर असावं असं वाटणारच की कुणालाही. तसं म्हटलं तर त्यांचं निम्म आयुष्य तुमच्या घरात व्यर्थच गेलं की! आणखी चार-पाच वर्षांत तिच्या मुलीचं लग्न होईल, त्यानंतर सात-आठ वर्षांत मुलाचं लग्न होईल. त्यांचा त्यांना मोकळेपणा तरी कधी मिळायचा?'

बराच वेळ बोलून बोलून बाबासाहेबांना थकवा आला. डोळे मिटून मागे टेकून ते शांत बसले. ते पाहून रमाबाई स्वयंपाकघरात चहा करायला गेल्या. बाबासाहेबांचा आवाज थांबल्यावर, बऱ्याच वेळापूर्वी आलेला व बाबासाहेबांचा सतापलेला आवाज ऐकून थांबलेला नीलेश घरात येऊन बसला. चहा पिऊन होईपर्यंत कुणीच काही बोललं नाही. सगळ्यांच्याच मनात उलट-सुलट विचार चालू होते. चहा निम्मा-अधिक झाल्यावर नीलेश

म्हणाला,

'हया सगळ्या प्रकारात माझी फार कुचंबणा होते काका ! मला आई-वडील हवे आहेत, त्यांची आता वार्धक्यात सेवा करायची आहे व नीलासारख्या पत्नीचीही जीवनाची साथ सोडायची नाहीये. इतकी वर्षं प्रत्येक संघर्षाच्या वेळी मी आईबाबांना काही समजावायला गेलो की, आईचं पालुपद, मी घरात चार सासवा व दोन नणंदांचा हेका चालवलाय, सहन केला आहे. तिला एकीचा पण सहन होईना का ?'

'त्याशिवाय नीलेश, तुझ्या ताईला कधी सासरी रहावं लागलं नाही. लग्न झाल्यास परदेशी जाऊन राहिली आहे. कधीकाळी येणार व त्यावेळीही भरपूर देणग्या घेऊन येणार, त्यामुळं तिचं सासरी कौतुकच होणार. जरा तिला सासरच्यांचा त्रास सहन करावा लागला असताना, तरी तुझ्या आईने काहीसा तरी नीलाच्या बाजूने विचार केला असता. आम्ही दोघं नाही का ? चार मुली सासरी पाठविल्या आहेत. प्रत्येक घराची वेगळी तऱ्हा ! पण त्यात मुलींचीही काय बाजू असते, हे आम्हाला पक्कं माहीत आहे.'

'आणि काय झालं काका, इतकी वर्षे नीलाला सांगितल्यावर ती तरी ऐकत असे. मनातल्या मनात सहन करीत रहायची, रोज रात्री रडायची पण कधी तिनं तिच्या दिवसाच्या वागण्यात फरक पडू दिला नाही. मला काही बरं वाटत होतं, असं नाही. परंतु "चला तुटलं नाही," एवढ्याच समाधानाने व "कालांतरनं बदल होईल" हया आशेनं मी गप्प बसत होतो. पण हया वेळी मात्र तीही ऐकायला तयार नाही. तिचं म्हणणं एकच... "स्वयंपाकाला बाई नको" म्हणण्यात माझं काहीही चुकलं नाही. "मी क्षमा करा, आम्हाला घरात घ्या म्हणणार नाही." आजपर्यंत कारण नसतानाही केवळ लहानं म्हणून सुन म्हणून मी नमतं घेत आले. पण आता मात्र घेणार नाही. माझ्या गरजेच्या दिवसात हयांनी कधी मदत न करताही, मी सहन करीत आले. आता तर गरजेचे दिवस त्यांचेच आहेत. त्यांना आपली गरज असली तर येऊ देत त्यांना आपल्या घरी ! पूर्वीचं काहीही मनात न ठेवता त्यांची सगळी सेवा करीन मी ! पण ज्या घरावर तुझ्या नावाची पाटी आहे व ज्या घरात आपल्या दोघांच्या शब्दाला किंमत आहे, तिथेच मी राहीन !

इतकं ठामपणानं नीला बोलते मात्र नि नंतर एकटीच रडत बसते.

स्वतंत्र झालो म्हणून ती आनंदी, उत्साही मुळीच नाही. काका, तिची फार उमेद होती की, आपण घर एकत्र ठेवून दाखवू म्हणून ! त्यासाठी तिने पंधरा वर्षे धडपड केली, त्याग केला, अनेक गोष्टी सहन केल्या नि शेवटी अपयशच माथी आले हेच तिला फार मनाला लागलं आहे.'

'अरे, ते यश तुम्ही चौघांनी मिळून मिळवायला हवं. तिच्या एकटीच्या कष्टांनी कसे मिळवता येईल ?'

जनरेशन गॅपचा दोष दोन्ही पिढ्यांकडं असू शकतो. वृद्ध म्हणून घरातल्या मोठ्या माणसांना आदर, प्रेम, मान निश्चित मिळायला हवा, पण याच गोष्टींची अपेक्षा तरुण पिढीलाही असते याचा विचार वृद्धांनीही करायला नको का ? आपले दिवस, आपले कायदेकानू तरुणांवर लादण्याच्या प्रयत्नास सुख कुणालाच लागत नाही. आपापल्या परीनं सगळेच दुःखी !

अ सा ही वि चा र ह वा !

सुधाच्या मुलानं वेगळं बिऱ्हाड केलं. ऐकूनच मला गलबलून आलं. सुधा माझी बालमैत्रीण, आम्ही ग्रॅज्युएट झालो नि लगेच तिचं लग्न झालं. एका विदेशी कंपनीत नोकरी करणाऱ्या तरुण इंजिनिअरशी ! देशोदेशी तिला हिंडता येईल, विविध देश तिला पाहता येतील. याचं तेव्हा आम्हाला केवढं अप्रूप वाटलं होतं ! लग्नानंतर पंधरा दिवसांनी दोघे अमेरिकेला गेली. तेथेच त्यांच्या हनीमून झाला. सासूबाई बिऱ्हाड लावून द्यायला गेल्या होत्या.

परंतु एकंदरीत मात्र तिच्या संपूर्ण आयुष्याचा आढावा घेताना असं वाटतं की, तिला आयुष्यात तसं सुख लागलेच नाही. पहिली पंधरा वर्षे कार्य ती नवऱ्याबरोबर देशोदेशी हिंडली. परंतु त्यातही ती आम्हा स्थिरस्थावर झालेल्या मैत्रिणींचं " बरं आहे बाई " म्हणत असे, त्यावरून हे विचवासारखं

पाठीवर बिऱ्हाड ठेवण्यात तिची फारच परवड झाली असावी, मुलांच्या शिक्षणाची ओढाताण झालीच. पंधरा वर्षांनंतर तर तिला मुलांच्या शिक्षणासाठी भारतातच स्थायिक व्हावं लागलं. मुलांच्या परीक्षा, अभ्यास इ. चे महत्त्वाचे दिवस सांभाळून अधून-मधून ती नवऱ्याकडं जाऊन येत असे. पण त्यातही तिचीच मानसिक, शारीरिक ओढाताण जास्त होत असे. आठ-दहा वर्षं अशी गेली असतील. नोकरी संपत येऊ लागल्यावर तिच्या यजमानांनीच आता बदली नाकारायचे ठरविले व त्यानुसार घरी यऊन राहिले. त्यानंतर मुलीचे लग्न केलं. तिचे सणावार पाहिले, बाळंतपण इ. उरकल्यावर जीवनातील एक महत्त्वाचा टप्पा पार केल्याचं समाधान त्यांना होतं. आता मुलाच्या लग्नाचे विचार घरात होऊ लागले असतानाच तिच्या यजमानांचं हृदयविकाराच्या तीव्र झटक्यानं आकस्मिकपणे निधन झालं. समंजस, शहाणी सुधा हयाही अपघातातून त्यामानानं लवकर सावरली. वडिलांच्या मृत्यूमुळं मुलाचं लग्न काही महिन्यांनी लांबला असेल, परंतु तिनं तिथंही विवेक दाखविला. त्याच्या भावी जीवनावर परिणाम होऊ नये म्हणून लवकरच लग्न करून दिलं.

त्याच्या लग्नाला चार महिने होताहेत तोच 'ही' बातमी आल्यानं माझ्यासारख्या तिच्या मैत्रिणींना, हितचिंतकांना तिची काळजीच वाटू लागली व आताही हिच्या जीवनात सुख नाही, हयाबद्दल खेद वाटू लागला. काहीशी सहानुभूतीच्याच भावनेने, तिचे सांत्वन करायलाच मी तिच्याकडे गेले, तर तिचे विचार ऐकून अवाक् तर झालेच, पण माझ्याही विचारांना बरेच खाद्य घेऊन परत आले.

सुधा म्हणाली, 'अग, तो नाही वेगळा झाला, मीच त्याला वेगळं राहायला लावलं. काहीसं बळजबरीनेच म्हणालीस तरी हरकत नाही. तेसुद्धा माझं व सुनेचं पटत नाही, म्हणून नव्हे तर तसं करण्यामागे माझे काही ठाम विचार आहेत.' मी चकित होऊन पहातच राहिले.

'सुधाकर असतानाच आमचं असं फार पूर्वीपासून बोलणं चालत असे की, एकुलता एक मुलगा आहे, म्हणून त्याला आपल्याच जवळ रहायला लावायचं नाही. त्याची इच्छा असेल तर त्याला मिलिटरीत पाठवायचं परदेशी, किंवा परक्या गावी नोकरीला जायला आडकाठी करायची नाही आणि काहीच नाही झालं व हयाच गावी जरी राहिला तरी त्याला स्वतंत्र बिऱ्हाड

करून द्यायचं. आपलं घर मोठं आहे, म्हणून त्याला इथंच रहायला लावायचं नाही. त्याच्यासाठी स्वतःच्या मालकीची दुसरी जागा घेण्याइतके काही आमच्याकडे पैसे नव्हते. परंतु थोडीफार शिल्लक टाकली. तो नोकरीला लागल्यास लग्न होईपर्यंतच्या दोन वर्षांच्या काळातील त्याचा सगळा पगार बाजूला ठेवला. दोन्ही मिळून जागेचे पहिले पैसे भरले आणि आता मासिक हप्ता तो दरमहा त्याच्या पगारातून भरेल. झालं इतकंच की, त्याचं लग्न होण्यापूर्वी, बिऱ्हाड थाटून देण्यापूर्वीच सुधाकर आम्हाला सोडून गेले. तुला हयाबाबतीत माझं कौतुक करायचं तर कर की, त्यांच्या निधनानंतरही मी आमचा विचार बदलला नाही, तर त्याप्रमाणेच वागले.'

काही वेळ सुधा थांबली, मनाशीच हसली व म्हणाली, 'तुला सांगायला हरकत नाही. पण सुधाकरांच्या निधनानंतर मी आमच्या विचारांशी जास्तच चिकटून राहिले. कारण, मला माझे पहिले दिवस आठवले. माझ्या सासूबाई तशा स्वभावानं फार चांगल्या. पण अनेक विधवा स्त्रियांच्याबाबतीत मी जे ऐकलं होतं, अजूनही एकते, सभोवताली पाहते, ते त्यांच्याकडून प्रत्यक्षात अनुभवलेही !

आम्ही नवविवाहितच होतो. शक्यतो दोघांच्या सहवासाच्या प्रयत्नात असायचो. पण माझ्या सासूबाई सुधाकर घरी यायच्या वेळी चहा-खाणे करून तयार रहायच्या. बेल वाजल्यावर दार उघडायलाही स्वतः जायच्या. कधी मी म्हटले, 'सुधाकर म्हणत होते, अमका पदार्थ बरेच दिवसात खाल्ला नाही.' तर लगेच म्हणायच्या, 'मग कर की उद्या.' प्रत्यक्षात मात्र मी करायला लागण्यापूर्वी त्यांचा करून झालेला असायचा. नंतर म्हणायच्या 'आणखी चार दिवस माझ्या हातचं त्याला खायला मिळेल, मग आयुष्यभर तुझ्याचं हातचं खायचं आहे त्याला !' जेवण झाल्यावर रात्री काही तरी विषय काढून गप्पा मारीत रहायच्या. मग आम्हा दोघांची चुळबुळ सुरू होई. दार बंद केल्यावर एक पाच-दहा मिनिटांनी त्यांची हाक ठरलेली. 'तुझं हे कामाचं पुस्तक दिवाणखान्यातील टेबलावर ठेवलं आहे. सकाळी शोधत बसशील म्हणून मुद्दाम आताच सांगितले.' कुणाला वाटलं असतं, आई उठण्यापूर्वी मुलगा ऑफिसला जातो. ठरवल्या वेळेपेक्षा आम्हाला उठायला उशीर हा ठरलेलाच. उठून घाईघाईनं स्वयंपाकघराकडं चहाचं आंधण ठेवायला जायला

लागावं की, डायनिंग टेबलापाशी सासूबाई चहा पीत बसलेल्या दिसायच्या. म्हणायच्या, 'तुमचाही करून ठेवला आहे. टीकोझीखाली किटली आहे बघ !'

सुधाकर मला नेहमी म्हणायचे, 'तू म्हणूनच एवढं समजूतदारपणे वागते आहेस. दुसऱ्या एखादीनं अर्थाचा अनर्थ केला असता, आकाश-पाताळ एक केले असतें.' सुधाकरना कौतुक करू देत माझे, पण माझाही संताप व्हायचाच. एखादे वेळी तोलही जायचा. त्यांच्या हृया वर्चस्व गाजविण्याचा, लुडबुड करण्याचा त्रास वाटायचाच, आणि म्हणून मी म्हटले की, सुधाकर गेल्यावर, आमचा आधीचा विचार मी अधिक पक्का केला. जे मी अनुभवलंय, इतरांचे ऐकलेय, ते आपल्याही सुनेला सोसायला लागू नय. न जाणो, एखाद्या वेळेस त्याच भूमिकेत आपण गेल्यावर आपलेही आचार-विचार तसेच हक्क गाजविण्याचे, ताबा मिळविण्याचे व्हायचे !'

'लोक म्हणतात, सून भांडून वेगळी झाली. मुलगा बाईल्या झाला. वडिलांच्या माघारीसुद्धा आईला सोडून निघून गेला, वगैरे वगैरे.'

'अग, सर्वसाधारण समाजाला नेहमीच्या चाकोरीशिवाय काही सुचतं का ? आणि मी सांगते तुला, ही चाकोरीसुद्धा आपण माणसंच निर्माण करतो. मला पाश्चत्य संस्कृतीचा फार अभिमान आहे, असं समजू नकोस. पण आपण आपल्या संस्कृतीला चिकटून राहण्याच्या नावाखाली फार स्वार्थीपणाने वागतो. आपल्या एकत्र कुटुंबातील भावनिक ओलावा, एकोपा निःसंशय चांगला आहे. पण त्यासाठी आपण नवीन पिढीला आपल्याच वर्चस्वाखाली ठेवतो त्यांना भावनिक व आर्थिक दोन्ही बाबतीत परावलंबी बनवतो. त्यांच्या स्वतंत्रपणे निर्णय घेण्याच्या क्षमतेचे पंखच छाटून टाकतो. आपल्या अधिकारात व वर्चस्वात समाधान मिळवतो. परंतु माझ्या मते खरं समाधान मुलं खऱ्या अर्थानं आपल्या पायावर उभी राहिलेली पाहण्यात आहे. दूरान्वयानं बाल-संगोपनातीलच हा भाग आहे. आपली मुलं स्वावलंबनानं, स्वकर्तृत्वानं संसार करू शकतात, येणाऱ्या अडचणींना सक्षमतेने तोंड देऊ शकतात, हे पाहण्यात नाही का आनंद ? हयासाठी मला फार वाटते की, पाश्चात्य व पौर्वात्य संस्कृती एका भांड्यात घालाव्यात, खूप हलवाव्यात व त्यांच्या मिश्रणानं तयार झालेले रसायन हे भावनिक ओलावा टिकवून धरणारेही असेल व प्रत्येकाचे व्यक्ति-

भत्त्व स्वतंत्रपणे व संपूर्णपणे खुलविणारेही असेल. म्हणजे मग पाश्चात्यांसारखे मुले वयात आली की, त्यांना वाऱ्यावर सोडूनही द्यायचे नाही व आपल्या-सारखे, मुलांना दोन-तीन मुले झाली तरी त्यांच्यावर भावनिक दडपण आणून आपल्या आज्ञेतही ठेवायचं नाही.

'त्यासाठी मला तरी असं वाटतं, प्रत्येक नवविवाहित दांपत्यास आई-वडिलांच्या आसपास परंतु स्वतंत्र बिऱ्हाड थाटायला मिळावे. नवीन व जुन्या दोन्ही दांपत्यास परस्परांची किंमत कळेल. गरज, उपयोग कळेल. म्हटले तर जवळ, म्हटले तर दूर ! दोन्हीचे फायदे मिळतील. अर्थात दूर रहाण्यातील काही तोटेही सहन करावे लागतील. परंतु तसे सहज जाण्याच्या टप्प्यातील असल्यामुळे तोटयाची झळ फारशी पोहचणार नाही.'

सुधासारखा विचार परिस्थिती अनुकूल असूनही किती जणांना सुचतो ?

म ला ल ग्न क रा य चं य !

एक साठीच्या वयाचे गृहस्थ एकदा मार्गदर्शन केंन्द्रावर आले. त्यांना पाहूनच मनात मी काहीशी खट्टू झाले की, हया एवढया माणसाला काय वैवाहिक मार्गदर्शन करणार मी ? व ते ते कितपत ऐकून घेणार ? त्यानंतर आपल्या वागण्यात सुधारणा ती कधी करणार ? परंतु मनातले विचार मनातच ठेवून कर्तव्यबुद्धीने त्यांना, 'या, बसा' करून मी त्यांना काम विचारले. सर्वसामान्य वृद्धाप्रमाणेच त्यांनी सगळे आत्मपुराण सांगायला सुरुवात केली. मी मूळ...हया गावचा इथपासून सुरुवात करून विवाह केव्हा झाला, पत्नी कुठली, काय, दिसायला कशी, मुले किती व आता सध्या कशी सुस्थितीत आहेत, नोकरी कुठे व किती प्रामाणिकपणे कामसूपणे केली वगैरे सगळया सविस्तर गोष्टी सांगायला सुरुवात केली. काही वेळ त्यांना बोलू देऊन मी मधेच त्यांना प्रश्न विचारला, 'पण आजोबा, तुम्हाला माझ्याकडून काय मदत पाहिज ? तुम्ही केंद्रावर कशासाठी आलात ?' न लाजता रोक-ठोकपणे ते म्हणाले, 'आता वर्णन केलेली माझी पत्नी वर्षापूर्वीच वारली व

मला आता पुन्हा लग्न करायचं आहे.'

'आमचे काय वधू-वर सूचक मंडळ आहे का ?' ही मनात आलेली प्रतिक्रिया दाबून शांतपणे मी त्यांना म्हटले, 'मग त्यात आम्हाला काहीही मदत करता येणार नाही. तुम्ही त्यासाठी एखाद्या वधू-वर सूचक मंडळाकडे जा.'

'वधू-वर सूचक मंडळात मी गेलो तर "मला लग्न करायचं आहे." म्हटल्यावर सगळीजण कुचेष्टा करतील, म्हातारचळ लागलाय म्हणून, परंतु मला विवाह वैवाहिक संबंधासाठी करायचा नाही. त्याबाबतीत आयुष्यभर पत्नीने व मी भरपूर सुख-समाधान उपभोगले आहे. पूर्ण तृप्त आहे मी त्याबाबतीत, परंतु तिनेच मला सवय लावून ठेवली आहे. सर्व गोष्टींची चर्चा करायची, मोकळेपणाने गप्पा मारायच्या, हसून-खेळून वागायचे. मला मुले सुना चांगली आहेत, माझे काहीही कमी करीत नाहीत. लेक-जावई गावातच असतात. अधून-मधून येऊन माझी आस्थेने चौकशी करतात. माझ्या लेकीचे व सुनेचेही प्रेम आहे. ते पाहूनही मला समाधान वाटते. परंतु हया सर्वांशी वागत असताना मनात कुठे तरी मोठी दरी निर्माण झालेली जाणवते. सगळी जण प्रेमाने, आदराने वागतात. पण दोन हात दूर राहूनच. त्यासाठी माझ्याशी बरोबरीने वागणारी, चेष्टामस्करी करणारी, मधली ही दरी ओलांडून जवळ येऊन प्रेम करणारी माझी पत्नी मला पाहिजे. ते तर शक्य नाही. म्हणून तिच्या तोडीस तोड असणारी दुसरी एखादी व्यक्ती मला त्या जागा पाहिजे.'

'पण आजोबा, तुमच्या बरोबरीची एखादी बहीण, भाऊ, मित्र किंवा तत्सम कुणी असेल ना ?'

'आहेत ना, पण बहीण-भावाशी भांडण नसले तरी वेगवेगळ्या गावाना राहण्यामुळे, वेगवेगळ्या क्षेत्रात व वेगवेगळ्या पातळीवर नोकरी करण्यामुळे आमची विश्वे वेगळी असल्याचे जाणवते. त्यामानाने रोज भेटणारा मित्रच जास्त जवळचा वाटतो. परंतु सुदैवाने त्याची पत्नी अजून आहे. माझ्यामुळे त्यांच्या संसारसुखात मी कशाला बिब्बा घालू. तरी तो समजून बराच वेळ माझ्याकडे येऊन बसतो. तरीसुद्धा त्याच्या माझ्या प्रकृतीमुळे, इतरांच्या सोयी-गैरसोयींचा विचार करता, कुठे तरी त्याला एक वेळेचे बंधन पडतेच. पत्नीही कशी केव्हाही पहाटे जाग आली, रात्री लौकर झोप आली नाही

रात्रंदिन, अहर्निश जवळ असते व त्यासाठी मला ती पाहिजे.'

'पण आजोबा, ही जी तुमची पत्नीशी जवळीक आहे, तो केवळ पति-पत्नी ह्या नात्याने निर्माण झालेली नाही, तर तुमच्या चाळीसहून अधिक वर्षांच्या सहवासातून एकमेकांचे जे खऱ्या अर्थाने मीलन झाले त्यातून निर्माण झालेली आहे व जी स्त्री पत्नी म्हणून तुमच्या घरी आता यईल तिचे व्यक्तिमत्व पूर्णतः वेगळ्या प्रकारे घडलेले असेल. ती तुम्हाला अपेक्षित असलेला, मैत्रीचा प्रेमाचा हात देऊ शकेल, याची शक्यता फारच कमी आहे, अशावेळी इतर समस्या अनेक प्रकारच्या निर्माण होऊ शकतील. त्यापेक्षा बहीण-भावांशी जरी काही विशिष्ट परिस्थितीमुळे मध्यंतरीच्या काळात दुरावा निर्माण झाला असला तरी मूळ बालपणीचा पाया चांगलाच भावनिक दृढतेचा, ओलाव्यांचा आहे. त्याच्या आधारे सुरुवात करून तुम्हाला मध्यंतरीच्या आयुष्यातीलही काही साम्यस्थळे शोधून काढता येतील. शिवाय तुम्ही परस्परांच्या घरी मुक्कामाला जाऊनही तुमची मुख्य समस्या तुम्हाला सोडवता येईल.'

आजोबांना हा विचार काही पूर्णतः पटला असे वाटत नव्हते. परंतु त्यांच्या मनातील विचार अव्यवहार्य, फारच अडचणीत टाकणारा व अनेक समस्या निर्माण करणारा आहे हे मात्र निश्चितच पटले असावे.

का मा च्या शो धा त-आ जी बा ई

'मला काहीतरी काम मिळवून द्याल का ?' हा प्रश्न एका तरुणीने नव्हे तर साठ वर्षांच्या वृद्ध स्त्रीने विचारला.

'तुम्ही आधी कुठं काम करत होतात ? कुठून निवृत्त झालात...? विचारण्याचा हेतू असा की त्याला अनुसरून, साधारण त्याच क्षेत्रातील काम पाहाता यावे.

'आजपर्यंत मी कधीच कुठे नोकरी केली नाही. पण त्याचा अर्थ माझी कुवत नव्हती असे नाही, तर चाळीस वर्षांपूर्वी स्त्रियांनी नोकरी करणे

तितकेसे समाजमान्य नव्हते. पैसा अपुरा पडत होता. दर महिन्याला ओढाताण होत होती, तरी आमच्या काळात स्त्रीने नोकरी करणे कमीपणाचे मानले जाई. विशेषत: पुरुषांना लोक विचारीत "तू बांगड्या भरल्यास का ?" त्यामुळे कधीच कुठे नोकरी केली नाही.'

'मग आता निवृत्तीच्या, विश्रांतीच्या काळात कशाला बाहेर पडायचं आहे ?'

'त्याचं काय आहे, सगळंच सांगते तुम्हाला सविस्तर. माझ्या यजमानांना निवृत्त होऊन दहा वर्षे तरी झाली असतील. आम्हाला एकच मुलगा व एकच मुलगी.

'वा ! त्याबाबतीत मात्र आधुनिक आहात.'

'हं ! काहीसे आहोत. पण माझी काही मुले गेलीही.

'हे निवृत्त होण्यापूर्वी, दोनही मुलांची लग्ने झालेली होती. मुलीच्या मुलाची मुंजही झाली होती व सुनेचे दुसरे बाळंतपणही झाले होते. म्हणजे आमची जबाबदारी सर्वस्वी संपली होती. आमच्या दोघांची प्रकृती चांगली. सून नोकरी करत होती. आम्ही मुलांना सांभाळत होतो. सगळं कसं व्यवस्थित छान, अगदी दृष्ट लागण्यासारखं चालू होतं. ह्यांचे प्रॉव्हिडंट फंडाचे पैसे आले तर काहींनी सुचविले गुंतवून ठेवा, तुम्हाला बऱ्यापैकी व्याज मिळेल. पण काय करायचे आहे व्याज तरी ! तशी आम्हाला हातखर्चाला पुरेल अशी ह्यांना पेन्शन मिळत होती. मुलांचा संसार व्यवस्थित चालू होता. सूनही चांगली होती, आहेही ! म्हणून आम्ही दोघांनी माझे लेक-सून, जावई ह्या सर्वांच्या अनुमतीने ठरविले की, चांगले घर बांधायचे. मुख्य रक्कम लागते ती ह्यांच्या फंडाची होईल व नंतरचे हप्ते मुलगा भरेल. म्हणजे खऱ्या अर्थाने घर सर्वांचे होईल. आमच्या माघारी तरी पैसा मुलालाच मिळायचा. नंतर याच पैशाची किंमत कमी झाल्यावर देण्यापेक्षा वेळच्या वेळी दिलेला अधिक चांगला. आम्हालाही मोठ्या घराचा उपभोग घेता येईल. मुलालाही सुरुवातीपासूनच मोठ्या घराचा फायदा मिळेल.

मनात योजल्याप्रमाणे सगळे कसे छान सुरळीत झाले, कुठेही तक्रार नाही, कुरबूर नाही, काही नाही. सकाळचे स्वयंपाकपाणी, आले-गेले, डबे वगैरे सगळे मी पहात होते. नातवंडांना शाळेतून आणायला पोहोचवायला रिक्षा,

सायकल सोयीप्रमाणे ठरविली जात होती. तरी कधी शाळा लवकर सुटली, उशीरा भरली, पोचविणारा आला नाही, तर माझे मालक ते काम करत होते. मुलगा-सून निर्धास्त होते. तसे ते नेहमी म्हणत असत. कधीही ती उर्मटपणाने, वावगे वागली नाही. सकाळी साडेनऊला बाहेर पडायची, तर त्यापूर्वी घरातले केरवारे, कपबश्या, मोऱ्या अशी सगळी वरची कामे, मुलांचे होईल तेवढे, असे सगळे करायची व संध्याकाळी आल्यावर म्हणायची, "दिवस-भर तुम्हाला कैद होते, आता तुम्हाला कुठे बाहेर जायचे ते जाऊन या, मी पाहते घरातले."

'अजूनही तिच्या वागण्यात काहीही फरक पडला नाही. पण आमच्याच परिस्थितीत गेल्या चार वर्षांत फरक पडला आहे. इतक्या धडधाकट प्रकृतीचे मालक पण एकाएकी पॅरॅलिसिसचा अॅटॅक आला व लोळागोळा होऊन अंथरुणावर पडले आहेत. मुलाने सुनेने त्यांच्या औषधपाण्याला, पथ्य-पाण्याला कुठेही काही कमी केले नाही. कोण जे सांगेल तो प्रत्यक उपाय त्यांना बरे वाटावे म्हणून करतात. पण मलाच दिसतंय, त्यांची आर्थिक ओढाताण होतेय. डॉक्टरचे बिल दर महिन्याला बरेच मोठे येते. शिवाय मला सकाळी त्यांची सगळी स्वच्छता करावी लागते. त्यामुळे पूर्वीसारखे स्वयंपाक-पाणी करता येत नाही. नातवंडे मोठी झाली आहेत. जेवणाच्या दृष्टीने मोठ्यातच जमा झाली आहेत. म्हणजे साडेनऊच्या आत सहा माणसांचा स्वयंपाक, त्या चौघांचे वेगवेगळे डबे, हघांच्या पथ्याचे, असे सगळे सुनेला करायला जमत नाही, म्हणून स्वयंपाकाला बाई ठेवली आहे. त्यामुळे तो खर्च तर बऱ्यापैकी वाढलाच पण शिवाय सुनेची तडतड होतेच. ती बाई ठोक काम तेवढे करणार. इतर सगळे तिलाच पहावे लागते. शिवाय तिच खाडे करणे, सुट्ट्या घेणे, उशीरा येणे, हे सगळे प्रकार आहेतच. नातवंडांची अभ्यासाची महत्त्वाची वर्षे म्हणजे वहघा, पुस्तके फी हे तर वाढतेच, पण त्याशिवाय त्या क्लासेसच्या मोठाल्या फिया !'

'तुम्ही म्हणता ते सगळं खरं आहे आजी ! पण तुमच्या मुलाचा व सुनेचा पगारही गेल्या दहा वर्षांत बऱ्यापैकी वाढला असेल ना ? तो काय पूर्वीचाच आहे का ?'

'निश्चितच नाही. वाढला असेल नक्कीच ! पण मी आमचे दिवस

विसरले नाही. महागाई दसपट वाढली तर महागाईभत्ता एकपट वाढतो. म्हणजे तो पुरा पडतच नाही.'

किती सूक्ष्म विचार आहेत हया आजीबाईंचे! मला त्यांचे कौतुक वाटले व त्यांच्या सुनेचा हेवा वाटला. नाहीतर साधारणपणे म्हतारी माणसे ही लेकसुनेने कष्टाने, खर्चाने कितीही केले तरी एक तर त्याची किंमत नसते किंवा ते करायलाच पाहिजे, त्याचे कर्तव्यच आहे ते, अशी अधिकार-वाणी असते.

'बरं, आजीबाई तुम्हाला कशाप्रकारचे काम पाहिजे? शिवाय आजो-बांच्या शुश्रुषेतून वेळ कधी होणार? तुम्हाला तरी थोडी विश्रांती नको का? आणि हया सगळ्यातून वेळ काढून तुम्ही केलेल्या कामाचा तुम्हाला आर्थिक मोबदला तो काय मिळणार व त्याने तुमच्या सुनेला कितीशी मदत होणार?'

'तुम्ही म्हणता ते बरोबर आहे. पण असे पहा की, दुपारचा वेळ मला पूर्ण मोकळा असतो. घरातही कुणी नसते. आजोबाही झोपलेले असतात. त्या वेळात मला घरातल्या-घरात करता येण्याजोगे काम मिळाले तर हवे आहे. आणि हया कामाने सुनेच्या मिळकतीला हातभार लावायचा नाही, तर माझा विचार असा आहे की, मलाच वरखर्चाला चार पैसे हाताशी राहतील. हे आजारी पडल्यास हयांची पेन्शनही आम्ही मुलाजवळ देऊ लागलो. तेवढेच औषधपाण्याला होतील म्हणून! शिवाय हे आजारी असताना, मी एकटी कुठे जाणार आहे व कशाला लागताहेत मला पैसे असाही विचार! पण आता जाणवते की, कुणी पोरीबाळी, नवीनवरी, लेकुरवाळी घरी भेटायला आली तर तिच्या हातात घालायला पैसे नकोत का आपल्या हाताशी...? त्यासाठी सुनेकडे मागायला नको वाटते. मागितले तरी देईलही! मलाच मागवत नाही. बाकीचे सगळे आहेर मुलगा-सून व्यवस्थित सांभाळताहेत. अगदी वर नावसुद्धा स्वत:चे घालीत नाहीत तर आमचेच घालतात...! पण अशा घरी आलेल्या लोकांचाच काहीसा पाहुणचार करण्यासाठी हाताशी पैसे हवेत. शिवाय घरातच नातवंडाचे वाढदिवसाला किंवा इतरही वेळी कौतुक करावेसे वाटले तर ते पैसे त्यांच्याच आईबापाजवळ मागायचे का?'

आजीबाईंचा प्रश्न त्यांना भेंडसावत होताच. त्यातून मार्ग तर काढा-यला हवाच. पण काय काम सुचविणार त्यांना? दुपारच्या वेळात दोन मुले

सांभाळायला सांगू ? नेमकी तेवढी तीन तासापुरेशी मिळतील ? आजीबाईंना तेवढी तरी ऊठबस होईल का ? आणि आजोबांच्यासाठी जास्त वेळ द्यायला लागला की घरसोड नाही का होणार ? शिवणकाम, भरतकामाचं काम घ्यायला सांगू ! म्हणजे वेळेचं बंधन राहणार नाही. पण त्याला त्यांचे डोळे बोटे साथ देतील का...? का आजीबाईंच्या अपरोक्ष त्यांच्या सुनेचीच गाठ घेऊन त्यांना सांगू की, दर महिन्याला तुम्हाला जमेल ती रक्कम आजींजवळ देऊन ठेवा. "असू देत" म्हणून ठेवा. त्याचा हिशोब विचारू नका. इतकी सून चांगली आहे तर ती काही हयाचा विपरीत अर्थ घेणार नाही. एखादी गोष्ट नाही सुचत ..! तशी ही तिच्या हातून राहिली असेल. नाही तर तिनेच केव्हाच केलं असतं हे !

पो क ळी

मानसशास्त्रीय मार्गदर्शन करणारी लीना नावाची माझी मैत्रीण तिच्या क्लिनिकच्या वेळात माझ्याकडे आलेली पाहून मी चकितच झाले. 'का ग ? आज केस नाही वाटतं तुझ्याकडे ?' मी थट्टा केली. 'नाही, एक केस येणार आहे. म्हणून मुद्दाम पळून आले. रिसेप्शनिस्टला सांगितलंय. डॉक्टरांना महत्त्वाचं काम असल्यामुळे जावं लागलं म्हणून सांग व अपॉईंटमेंट एवढ्यात देऊ नकोस.' (जराशी थांबून म्हणाली) 'बाकी ती काय स्वस्थ बसतेय. रात्री दहानंतर किंवा सकाळी सातच्या आतही फोन करेलच.'

'बरीच वैतागलेली दिसते आहेस, तिच्यामुळे !'

'होय, इतके रडगाणे गात बसते व भयंकर वेळ खाते.'

'हयात काय नवल ? आपले कामच तसे आहे. लोकांच्या तक्रारी व दुःख ऐकून घेणे, हे तर मुख्य. अनेकदा त्यामुळे त्यांना हलके वाटते. आणि आपले पुढले काम हलके होते, नाही का ?'

'हो. पण ! त्यानंतर आपण सुचविलेले मार्ग ते अंमलात आणतात किमान प्रयत्न करतात, व त्यामुळेच आपल्यालाही पुढे जायला उत्साह वाटतो.

नाही का ?'

हया बाई जवळपास साठीच्या, त्यांचे यजमान सत्तरीचे. दोघेही आलटून पालटून येतात व परस्परांच्या सतत तक्रारी व कागाळ्याशिवाय एकेक गोष्ट किती वेळा सांगतात ? मधेच आपण म्हणावं की, 'होय. मला माहीत आहे.' की लगेच तत्परतेने म्हणतात, 'तिने सांगितले ना ? (किंवा त्यांनी सांगितले ना ?) ते चुकीचं आहे. माझी बाजू ऐकून घ्या.' 'तुम्हीच सांगितले आहे म्हटले तरी, 'नाही, पण तेव्हा माझे एक महत्त्वाचे सांगायचे राहिले आहे आता ऐका.' असे म्हणून पुन्हा अथपासून इतिपर्यंत रेकॉर्ड सुरू होते. आपण दुर्लक्ष केलेले किंवा इतर काही काम तर राहूच देत, पण हालचाल केलेलीही खपत नाही. काहीही बोलले नाही तरी म्हणतात तुम्ही सांगा काय करावे मी ! कसे वागावे ? तुमचा अभ्यास आहे हया क्षेत्रातला ? वयाने लहान असलात तरी मानेन मी तुमचे !' प्रत्यक्षात मात्र एखादे वाक्य उच्चरावे, की तेवढेच धरून बसतात. परवा एकदा मी त्या बाईंना म्हटले की, 'सोडून द्या हो ! प्रत्येक बारीक-सारीक गोष्ट मनावर घेऊ नका. तुम्हाला आता चाळीस वर्षांच्या सहवासाने त्यांच्या सवयी, लकबीसुद्धा माहीत आहेत. प्रत्येकच हालचाल काही हेतुपुरस्सर केली जात नाही माणसाची शिवाय वयापरत्वे काही बदल होतो.'

तर बाई ! केवढं तोंड सोडलं त्यांनी ! 'मी त्यांना पुरती ओळखून आहे. त्यांच्या प्रत्येक गोष्टीचा अर्थ कळतो बरं मला आणि वय काय फक्त त्यांचंच वाढलं आहे, माझं नाही का वाढलं ?' वगैरे वगैरे. पुरी वैतागले आहे ग बाई मी ! कितीही हट्टी म्हातारी माणसं ! येतात कशाला मार्गदर्शनाला ? आम्ही काय बोलवायला जातो का हयांना !'

'आज मात्र तूच एक केस झाल्यासारखी वाटते आहेस मला.' असं म्हणून तिला त्या विचारातून बाहेर काढण्याचा मी प्रयत्न केला. दोघीही मोकळेपणाने हसलो व त्यानंतर बोलण्याचा मक्ता मी घेतला.

'अग, म्हातारपणी निवृत्तीनंतर येणारी ही पोकळी जास्त वाईट असते. एक तर म्हातारपणी जबाबदाऱ्या संपलेल्या असतात. करण्यासारखे काहीही उरलेलं नसते व शरीरही पूर्वीसारखे साथ देत नाही. मग बसून-बसून करायचे काय ? तर उगाळायच्या पूर्वीच्याच गोष्टी. म्हातारपण आले तरी

मान्यतेची प्रेरणा काही म्हातारी होत नाही. म्हणून मग स्वतःच्याच प्रौढीच्या गोष्टी सतत सांगायच्या. अशा वेळी नवराबायकोच परस्परांना म्हटलं तर साथ देतात; म्हटलं तर मनातले चांगले-वाईट विचार बोलायला, टोचून बोलायला तेंवढेच दोघे परस्परांना असतात. दोघेही हळवे झालेले असतात. कुणाचंच कुणाला सहन होत नाही.' 'बोलू नका, गप्प बसा' म्हटले तर वाटते. 'इतके वर्षे मी सहन केले, आता तरी मोकळेपणाने बोलून घेऊ दे ! अग माझ्या माहितीत एक जोडपे असे आहे की, त्या पुरुषाला साठीच्या वयात कॅन्सर झाला. सारखा कण्हायचा. दवाखान्यात ठेवू नका म्हणायचा. मरण जवळ आलं आहे, तर घरीच राहू देत म्हणायचा. स्पंजिंग-ड्रेसिंग, करायला बायको जवळ जायची तर चक्क तिला ढकलून द्यायचा. पुढे पुढे जोर नव्हता, तर मान फिरवायचा. ती खोलीत आलेली खपायची नाही. तिचा भयंकर राग करायचा, तिरस्कार करायचा. शेवटी तिला जवळचे लोक म्हणायचे, 'तू खोलीच्या बाहेर बसून काय करायचे ते कर. तू सांगशील तशी त्यांची सेवा आम्ही करू.' पण तिला वाटे, किती दिवसांचा सोबती आहे कुणास ठाऊक ? सतत त्याच्याकडे पहात रहावे. शक्यतो सगळी सेवा आपणच आपल्या हातांनी करावी.

मुलाबाळांना, जवळच्या नातेवाईकांना मोठे कोड की, आतापर्यंत सुखी असलेल्या हचा जोडप्याला अचानकपणे म्हातारपणीच का अशी भांडणाची सुरसुरी येते ? पण लीना, मला असं स्पष्ट वाटते की, तू सांगितलेल्या केसच्या बाबतीत काय किंवा मी सांगितलेल्या केसच्या बाबतीत काय त्यांच्यातील हा वैवाहिक विग्रह (मार्शल डिस्कॉर्ड) पूर्वीपासूनच असणार. फक्त आजपर्यंत अनेक जबाबदाऱ्या पूर्ण करताना, अनेक सामाजिक दडपणांच्या व बंधनांच्या गराड्यात असताना त्या दोघांनी सोयीस्करपणे आपले मार्ग असे आखले असतील की, त्यांचे मार्ग परस्परांना छेदून पलीकडे जाणार नाही. मतभेद नाहीत म्हणजे जनरीतीप्रमाणे ते सुखी, आनंदी ठरले. अर्थात माझ्या या मताचा पडताळा आपल्या हचा केसवरून करता येणार नाही. कारण हचा वयात पूर्वायुष्याबद्दल हचा व्यक्ती आपल्याला खरं ते सांगणार नाहीत. सांगितलं तरी इतक्या खोलवर रुजलेल्या कीडीवर उपाय करणे तर त्याहून कठीण ! शिवाय सुधारणा दिसायला लागायला तर किती वेळ लागेल. तो-

पर्यंत कदाचित हें सर्व कष्टच निरर्थक झालेले असतील. तेव्हा आपल्याजवळ मार्ग एकच की, आपल्याकडे येणाऱ्या विवाह विग्रहाच्या केसेसच्या म्हातारपणीच्या संबंधांचें निरीक्षण करायचे व त्यावरून माझें मत खरे की खोटे ठरते, ते पहायचे.'

शक्य असते तर तरुणपणीच या पतिपत्नींनी घटस्फोट घेतला असता पण प्रत्यक्षात न उतरलेला घटस्फोट मनात मात्र खदखदत असतो. म्हातारपणी त्याचे स्वरूप असे प्रकट होते. विवेकाने एकमेकांना सांभाळून घेत उरलेले आयुष्य सुखाने घालवणे दोघांच्याच हाती असते. कमतरता असते ती फक्त विवेकाची !

मराठी मानसशास्त्र परिषद
पहिले अधिवेशन
देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद.
दि. २८ व २९ जून १९८५
येथे वाचलेला निबंध

•

वैवाहिक मार्गदर्शन– एक उदयोन्मुख शास्त्र

वैवाहिक मार्गदर्शन हे अधुनिक काळातील केवळ एक फॅड आहे किंवा पाश्चात्यांचे केलेले केवळ अंधानुकरण आहे, असे ठामपणे केलेले विधान ऐकले की, माझ्यासारखी त्या क्षेत्रात तळमळीने काम करणारी व्यक्ती निश्चितच अंतर्मुख होऊच विचार करू लागते. त्याचे फायदे-तोटे आवश्यकता, अनावश्यता यांचा विचार करून ते विधान पडताळून पाहू लागते.

सध्याच्या दिवसात विभक्त, घटस्फोटित जोडप्यांचे प्रमाण वाढल्यासारखे वाटते. नव्हे, कोर्टातील घटस्फोटांच्या अर्जांची गेल्या दहा वर्षांतील संख्या विचारात घेतल्यास चढता आलेखच आढळतो आणि मग त्याचा दोष ठेवला जातो तो स्त्रियांचे शिक्षण, स्त्रियांचे अर्थार्जन, स्त्रीमुक्तीचे आंदोलन, समानतावाद इत्यादींवर एका महाभागाने तर मला असे स्पष्टपणे म्हटले की, "तुमच्या हया भग्न कुटुंबांना (Broken Homes) खरे कारणीभूत स.

अण्णासाहेब कर्वे आहेत.' त्यांच्या आत्म्याला कोण यातना होतील हे विधान ऐकून !

सनातनी विचारांकडून आधुनिक विचारांकडे संक्रमण

हया सर्वांवरून एक गोष्ट मात्र निश्चितपणे स्पष्ट होते की, पूर्वीही पति-पत्नींमधे मतभेद होत असत. परंतु स्त्री अशिक्षित असल्याने, तिला आपल्या स्थैर्याचे, स्वातंत्र्याचे कायदे-नियम माहीत नव्हते. आर्थिक-सामाजिक दृष्टीने ती स्वतंत्र होऊ शकत नव्हती व त्यामुळे प्रत्येक स्त्री पतिव्रता होण्याचा आविर्भाव करून एखादी सरिता सागरात एकरूप होते त्याप्रमाणे पतिराज हेच आपले सर्वस्व मानून, आपले स्वत्व सर्वस्वी त्यांच्या जीवनात झोकून देत असे.

पण म्हणजे हयाचा अर्थ असा का की, वरील महाभागाचे उद्‌गार बरोबर आहेत ? खरंच का, स्त्रीशिक्षणाची सोय करून म. फुले, म. कर्वे इ. महात्म्यांनी महान चूक केली आहे ? निश्चितच नाही. खरं तर एकाच ध्येयाकडे जाणाऱ्या दोन भिन्न मार्गांसारखे मानवी जीवन सुखी करण्याचे हे केवळ दोन भिन्न मार्ग आहेत. भिन्नता मार्गात आहे, ध्येयात नाही. तरीसुद्धा आधुनिक मार्ग हा उच्चतर ध्येयाकडे नेणारा आहे, अधिक मानवतावादी आहे. स्त्री-पुरुष दोघांनाही 'एक मानव' म्हणून वागविणारा आहे.

सनातनी विचारात, स्त्रीने आपले स्वत्व समर्पण करून मतभेद निर्माण होऊ द्यायचे नाहीत व पतीचे जीवन संपूर्ण सुखी करावयाचे व त्यातच आपलेही जीवन सुखी झाल्याचे मानावयाचे. आधुनिक विचारांनुसार दोघांनीही समानतेने ध्येयप्राप्तीचा प्रयत्न करावयाचा. साहजिकच इप्सित-ध्येय लवकर साध्य होईल. किंबहुना सनातनी मार्गाने सुखाच्या डोंगराच्या पायाशी जायला जमत होते, असे म्हटले, तर आधुनिक मार्गाने शिखरावर सहजपणे जाता येईल. कारण मार्गक्रमण दुहेरी शक्तीने होणार आहे.

सुखी वैवाहिक जीवन

पति–पत्नी एकमेकांच्या खांद्याला खांदा लावून समानतेने ध्येयप्राप्ती करीत असताना दोघांनीही एकमेकांना समानतेने वागविणे, एकमेकांचा योग्य तो आदर करणे, एकमेकांवर पुरेसा विश्वास टाकणे, तसेच परस्परांचा विश्वास संपादन करणे, परस्परांवर प्रेम करणे निश्चितच आवश्यक असते. सुखी वैवाहिक जीवन हे कुणाच्याही जाती-धर्मावर अवलंबून नसते, तर वैवाहिक जीवनात प्रवेश करणाऱ्या प्रत्येकाची मानसिक पार्श्वभूमी, त्याची समायोजनाची क्षमता, व पती किंवा पत्नीला समजावून घेण्याची, त्याच्याही भूमिकेतून विचार करण्याची क्षमता यावर अवलंबून असते. समायोजन म्हणजे केवळ आपले मन मारून सबंधित व्यक्तीशी मिळते घेणे नव्हे, तर चांगल्या–वाईटाचा समतोलपणे, वस्तुनिष्ठपणे विचार करून आवश्यकतेप्रमाणे स्वत:-मधे किंवा परिस्थितीमधे योग्य ते बदल करणे म्हणजे समायोजन होय.

विवाह म्हणजे केवळ शरीरमीलन नसून व्यक्तींच्या व्यक्तिमत्त्वातील विविध पैलूंचे ते मीलन आहे. वैवाहिक समायोजन ही एकदा घडून जाणारी व त्यानंतर अपरिहार्य रहाणारी घटना नाही, तर ती एक प्रगतिशील प्रक्रिया आहे. त्यात अनेक वेळा चढउतार होत असतात व तसे होत असतानाच पती-पत्नींमधील परस्परसंबंधावर त्यांच्या भोवतालच्या परिस्थितीचेही इष्टअनिष्ट परिणाम होत असतातच. दोघांच्या वैवाहिक समायोजनावर विपरित परिणाम झाल्यास वैवाहिक मार्गदर्शकाची मदत घेणे अगत्याचे असते.

अलिकडे अशा प्रकारच्या मार्गदर्शनाची गरज वाढली असे वरकरणी दिसत असले तरी बदलती सामाजिक परिस्थितीच त्याला कारण आहे

वैवाहिक मार्गदर्शन

वैवाहिक मार्गदर्शन ही एक अध्ययन प्रक्रिया आहे अशी तिची परि-

भाषा केली जाते. ह्या प्रक्रियेत आपला विकास परिपक्वतेपर्यंत करण्याची व आपल्या गुणांचा प्रकट स्वरूपात उपयोग करण्याची योग्य संधी व्यक्तीला दिली जाते. वैवाहिक मार्गदर्शनाची प्रामुख्याने सहा ध्येये आढळतात–

वैवाहिक मार्गदर्शनाची ध्येये

१) व्यक्तीची समस्या तिला स्वतःला समजावून देणे.
२) समस्या सोडविण्यास वस्तुनिष्ठ विचार करण्यास प्रवृत्त करणे.
३) सर्व पातळ्यांवर संवाहन (कम्युनिकेशन) वाढवणे.
४) दुसऱ्याला दुखविणाऱ्या अभिवृत्ती बदलणे.
५) आत्मप्रतिष्ठा वाढविणे.
६) काहीतरी इष्ट कार्य करून जीवन सार्थकी लावणे.

वैवाहिक जीवनातील कोणत्याही लहानमोठ्या समस्येवर वैवाहिक मार्गदर्शक शास्त्रशुद्ध, अभ्यासपूर्ण व त्याचबरोबर वस्तुनिष्ठपणे, कलात्मकतेने आणि सहृदयतेने विचार करून मार्ग सुचवू शकतो. मात्र आपल्या समाजात अजून त्याचे म्हणावे तितके महत्त्व पटलेले नाही त्यामुळे निदर्शनास आलेल्या कोणत्याही संस्थेकडे 'घरोघरी असं काही ना काही असतंच' म्हणून आपली दुर्लक्ष करण्याची प्रवृत्ती असते. परंतु त्यामुळे समस्येची मूळे खोलवर रुततात दृढतर होतात व त्यानंतर त्या समस्येचा नायनाट करणे दुरापास्त होते... मार्गदर्शकाकडे जाण्याची ही कथा! त्याने सुचविलेले मार्ग अंमलात आणणे तर ह्याहीपेक्षा कठीण! कारण व्यक्तीच्या सदोष अभिवृत्ती, विचार, वर्तन-प्रकार तो बदलावयास सांगतो व व्यक्तीच्या दृष्टिकोनातून ते सदोष नसतातच

वैवाहिक मार्गदर्शनाची गरज

अनेक निमित्तमात्र गोष्टींमुळे 'वैवाहिक-सुख-समाधान' हे ध्येय

साध्य करण्याच्या प्रत्येक टप्प्यावर हचा पांथस्थांना योग्य व विविध प्रकारच्या मार्गदर्शनाची आवश्यकता असते. अन्यथा ध्येयप्राप्ती तर दूरच राहो पण पहिल्यादुसऱ्या पायरीवरून खाली कोसळणारी जोडपीच दिसतात, तर काही भांडत भांडतच आणखी काही पायऱ्या चढतात, पण कोणत्याही पायरीवरून त्यांचा तोल ढळण्याची शक्यता तितकीच असते.

वैवाहिक मार्गदर्शन हे केवळ वैवाहिक नाती बिघडल्यावर (घटस्फोटाची वेळ आल्यावर) करायचे असते असे नाही. तर–

१) विवाहाचा विचार ठरल्यावर किंवा विवाह ठरल्यावर

२) नवविवाहित अवस्थेत (विवाहाला एक ते बारा वर्षं झालेली असताना)

३) मुलांची बाल्यावस्था चालू असताना.

४) मुलांच्या किशोरावस्थेतील समस्यात्मक वर्तनामुळे वैवाहिक संबंधावर ताण येऊ लागला असताना.

५) पत्नीच्या ऋतुस्त्राव थांबण्याच्या कालखंडात, व

६) वृद्धावस्थेत मार्गदर्शनाची आवश्यकता भासते. याशिवाय काही वैवाहिक नैमित्तिक समस्यांमुळे कोणत्याही प्रकारचा भावनिक ताण निर्माण झाल्यास वैवाहिक मार्गदर्शनाची गरज भासते.

वैवाहिक मार्गदर्शनाचे प्रकार

वैवाहिक मार्गदर्शन प्रामुख्याने चार प्रकारे केले जाते. १) रचनात्मक (Constructive) :- ज्यावेळी वैवाहिक कुसमायोजन सामाजिक, आर्थिक धार्मिक घटकांमुळे निर्माण होते त्यावेळी मार्गदर्शक केवळ त्यांच्या समस्येचे विश्लेषण करून थांबत नाही, तर त्यांना सक्रिय मदत करून समस्या निर्माण करणारे बाह्यघटक दूर करण्याचा प्रयत्न करतो.

२) गतिमान : (Dynamic) ;— विवाह आणि कुटुंब हे दोन घटक अविभाज्य आहेत. काही वेळा पति-पत्नींमधील कलहाला, दुराव्याला संपूर्ण

कुटुंब किंवा कुटुंबातील एखादी व्यक्ती कारणीभूत असते. अशा वेळी मार्गदर्शकाचे कार्य हे पतिपत्नींपुरेसे मर्यादित रहात नाही.

३) वैकासिक : (Deovelopmental) :— काही वेळा एकंदर परिस्थितीचा विचार करता मार्गदर्शक स्वत:च त्या दांपत्यासाठी निर्णय घेत असतो. केवळ त्यांच्यापुढे सर्व परिस्थितीची उकल करून थांबत नाही.

उपसंहार

सुमारे दोन शतकांपूर्वी ज्याप्रमाणे मनोविकृत व्यक्ती आणि तिच्या विकृतीचे स्वरूप घराच्या चार भिंतींमधे दडविले जाई, त्यासंबंधी तज्ज्ञाकडून मदत घेण्याची कल्पना समाजात अमान्य होती, त्याप्रमाणेच आधुनिक काळात वैवाहिक मार्गदर्शकाकडे जाणे संबंधित दांपत्याला अपमानास्पद वाटते. किंबहुना मार्गदर्शकाकडे जाणे याचा अर्थ वैवाहिक संबंध पराकोटीच बिघडले आहेत असाही गैरसमज समाजात आढळतो. मात्र व्यक्तीच्या कोणत्याही स्वरूपाच्या लहान-मोठ्या समस्येच्या वेळी वैवाहिक मार्गदर्शनाचा उपयोग होतो. अनेकवेळा असेही निदर्शनास येते की, व्यक्तीगत जीवनातील काही भावनिक समस्या दडपून ठेवल्यामुळे त्यांची परिणती शारीरिक विकार, वर्तन समस्या, मुलांच्या वर्तनसमस्या इत्यादि गोष्टीत होते... ह्या बाह्य लक्षणांवर कितीही उपाय केले तरी मूलभूत कारणाचे निराकरण होईपर्यंत ही लक्षणे सौम्य तर होत नाहीतच. किंबहुना तथाकथित उपाय चालू असूनही वर्तनलक्षण अधिकाधिक तीव्र होतात.

समाजात वैवाहिक मार्गदर्शकांचे चार प्रकार :

१) मनोचिकित्सा शास्त्रज्ञ (Psychiatrist)

२) लिंगविषयक तज्ज्ञ (Sexologist)


३) कायदेपंडित (Advocate)

४) चिकित्सा मानसशास्त्रज्ज्ञ / सल्ला मानस शास्त्रज्ञ (Clinical Psychologist/Counsellor)

यापैकी पहिले दोन मूलतः वैद्यकशास्त्रज्ञ, तिसरे कायदेपंडित व चौथे मानसशास्त्रज्ञ. आपल्या समस्येच्या स्वरूपाचा विचार करून यांपैकी कुणाची मदत घ्यायची ते ज्या-त्या व्यक्तीने ठरविणे अगत्याचे असते.

ॐ ॐ ॐ





संदर्भ :

1) Mabel Fonseca : Counselling for Marital Happiness (1966) Manaktalas, Bombay.

2) Solvador Minuchin : Familes and Family Therapy— : 1974, Tavistock Publications.

3) J. M. Fuster : Personal Counselling, 'Bombay Psycholgist,' A Journal of the Psychological Association, Vol. 1, No. 1., oct. 1978.